आवृत्ती -२

सत्यमेव जयते

# बलवर्धक घटक व नागरी उपाययोजना नियमपुस्तिका, २०२३

भारत निवडणूक आयोग
**Election Commission of India**
निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

# बलवर्धक घटक व नागरी उपाययोजना नियमपुस्तिका, २०२३

भारत निवडणूक आयोग
निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१
दस्तऐवज क्र. : ३२४.६. ईपीएस : एम ए : ०११ : २०२३

**अनुक्रमणिका**


| **प्रकरण/प्रारंभिक** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|
| प्रकरण–एक–परिचय | १ |
| प्रकरण–दोन–तंत्रज्ञान | २ |
| प्रकरण–तीन–संदेशवहन योजना | १५ |
| प्रकरण–चार–तक्रार व्यवस्थापन प्रणाली | २४ |
| प्रकरण–पाच–सामाजिक प्रसारमाध्यमासह प्रसारमाध्यम | ३० |
| प्रकरण–सहा–मनुष्यबळ व्यवस्थापन | ३८ |
| प्रकरण–सात–मनुष्यबळ क्षमता उभारणी | ४७ |
| प्रकरण–आठ–राज्य पोलीस मनुष्यबळाचे आदान-प्रदान करण्यासाठी त्यांचा आंतरराज्यीय समूह करणे. | |
| प्रकरण–नऊ–तैनात केलेल्या मनुष्यबळास (पोलीस दलासह) प्रेरणा देणे व त्यांचे कल्याण | |

**संक्षिप्त रूपे**

| | |
|---|---|
| AC | विधानसभा मतदारसंघ |
| ADGP | अपर पोलीस महासंचालक |
| AERO | सहायक मतदार नोंदणी अधिकारी |
| AIR | आकाशवाणी/नभोवणी |
| AMF | आश्वासित किमान सेवा |
| ARO | सहायक निवडणूक निर्णय अधिकारी |
| ASD | अनुपस्थित, स्थलांतरित व मृत |
| BLO | बूथस्तरीत अधिकारी |
| BSNL | भारत संचार निगम लिमिटेड |
| CAPF | केंद्रीय सशस्त्र पोलीस दल |
| CCTV | क्लोज्ड सर्किट टेलिविजन [ सी सी टी व्ही ] |
| CD | कॉम्पॅक्ट डिस्क |
| CEO | मुख्य निवडणूक अधिकारी |
| CSC | सामाईक सेवा केंद्र |
| CSO | नागरी समाज संघटना |
| DCC | जिल्हा संपर्क केंद्र |
| DEMP | जिल्हा निवडणूक व्यवस्थापन आराखडा |
| DEO | जिल्हा निवडणूक अधिकारी |
| DM | जिल्हा दंडाधिकारी |
| ECI | भारत निवडणूक आयोग |
| EEM | निवडणूक खर्च संनिरीक्षण |
| EMB | निवडणूक व्यवस्थापन संस्था |
| ERMS | मतदार यादी व्यवस्थापन यंत्रणा |
| EPIC | मतदार ओळखपत्र |
| ER | मतदार यादी |
| ERO | मतदार नोंदणी अधिकारी |
| EVM | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र |
| FLC | प्रथम स्तरीय तपासणी |
| FS | भरारी पथक |
| GE | सार्वत्रिक निवडणुका |
| GIS | भौगोलिक माहिती यंत्रणा |
| HR | मानव संसाधन |
| IP | आंतरजाल नियम |
| IT | माहिती तंत्रज्ञान |
| LA | विधानसभा |
| LOR | कायदा व सुव्यवस्था अहवाल |
| MCC | आदर्श आचार संहिता |
| MCMC | माध्यम प्रमाणन व संनिरीक्षण समिती |

| | |
|---|---|
| MHA | गृह व्यवहार मंत्रालय |
| MoU | सामंजस्य करार |
| MoD | संरक्षण मंत्रालय |
| NCC | राष्ट्रीय छात्र सेना |
| NGO | अशासकीय संघटना |
| NGRS | राष्ट्रीय तक्रार निवारण सेवा |
| NRI | अनिवासी भारतीय |
| NSS | राष्ट्रीय सेवा योजना |
| NVSP | राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टल |
| PC | लोकसभा मतदारसंघ |
| PS | मतदान केंद्र |
| PSU | सार्वजनिक क्षेत्र युनिट |
| PwD | विकलांग व्यक्ति/दिव्यांग व्यक्ति |
| PWD | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| RO | निवडणूक निर्णय अधिकारी |
| SAKSHAM | सक्षम उपयोजन |
| SAT | उपग्रह |
| SCC | राज्य संपर्क केंद्र |
| SEMP | राज्य निवडणूक व्यवस्थापन योजना |
| SMS | लघु संदेश सेवा |
| SP | पोलीस अधीक्षक |
| SRTC | राज्य मार्ग परिवहन महामंडळ |
| SST | स्थैतिक संनिरीक्षण पथक |
| SVEEP | पद्धतशीर मतदार जागृती व निवडणूक सहभाग कार्यक्रम (स्वीप) |
| UT | संघ राज्यक्षेत्र |
| VHA | मतदार मदत ॲप |
| VST | व्हिडिओ संनिरीक्षण पथक |
| VVT | व्हिडिओ दर्शक पथक |
| VVPAT | मतदान पोचपावती/व्हिव्हिपीएटी |

# बलवर्धक घटक व नागरी उपाययोजना

## नियमपुस्तिका

## प्रकरण एक

## परिचय

### १.१ बलवर्धक घटक व नागरी उपाययोजना

भारत निवडणूक आयोगाचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण यांखाली निर्भय व निःपक्ष निवडणुकाचे संचालन करणे हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे, ही बाब आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये सर्वत्र प्रशंसली जाते. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तैनातीच्या बाबतीत मनुष्यबळाच्या वाढत्या मर्यादांमुळे उद्‌भवणारी आव्हाने, तसेच, नजीकच्या भविष्यातील कोट्यवधी लोकांच्या आशा-आकांक्षा विचारात घेऊन, आयोगाने, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलेतर मनुष्यबळाच्या अधिकाधिक प्रभावी वापर करून, म्हणजेच संरचनात्मक आणि नियोजित रीतीने नागरी/समांतर उपाययोजना करून निवडणूक प्रक्रिया अधिक बळकट करण्यासंदर्भात निवडणूक यंत्रणांना निदेशित केले आहे.

आयोगाने, नागरी/समांतर उपाया संदर्भात आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलेतर मनुष्यबळाचा प्रभावी वापर करण्याच्या बाबतीत, वेळोवेळी, पुढीलप्रमाणे अनेक सूचना/निदेश जारी केलेले आहेत :—

१. **तंत्रज्ञान.—** संनियंत्रणासाठी आणि तक्रार निवारणासाठी वेबप्रसारण, (वेबकास्टिंग) सीसीटीव्ही, स्थिर डिजिटल कॅमेरे, ध्वनिचित्र मुद्रण, लघुसंदेश संनियंत्रण, दक्ष नागरिक उपाययोजन (सीव्हीजील) अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करणे.

२. **समाजमाध्यमांसह प्रसारमाध्यमे.—** निर्भय, निःपक्ष, स्वायत्त, समावेशक, सर्वज्ञात, नैतिक, सहभागितापूर्ण, दक्षतापूर्ण, अनुचित घटनामुक्त निवडणुकांना पाठबळ देणे.

३. **मनुष्यबळ व्यवस्थापन.—** निवडणुकांच्या अनेकविध कामांसाठी आवश्यक मनुष्यबळाची पूर्व-पडताळणी आणि वेळेत नेमणूक करणे.

४. **मनुष्यबळाची क्षमताबांधणी.—** प्रमाणिकृत, उच्च दर्जाचे आणि गरजेनुरूप प्रशिक्षण देणे.

५. **मनुष्यबळ नेमणूक योजना.—** पूर्णतः गोपनीयपणे आणि अनपेक्षित तत्त्वाने (जसे की यादृच्छिकीकरणाने) आगाऊरीत्या आणि परिणामकारक नेमणूक नियोजन करणे.

६. **नियुक्त मनुष्यबळाचे कल्याण व प्रेरणा (पोलीस दलासह) .—** उच्च नैतिक आणि कमाल कार्य समाधान.

७. **संपर्क योजना.—** भक्कम व पूर्णतः तपासलेली संपर्क योजना (उपग्रह फोन, बिनतारी संदेश, इत्यादी)

८. **तक्रार व्यवस्थापन यंत्रणा.—** ठराविक कालमर्यादित आयएफएससीशी व्यवहार करणारे कार्यक्षम कॉल सेंटर्स आणि नियंत्रण कक्ष.

९. **राज्य पोलीस मनुष्यबळाचे आदन-प्रदान करण्यासाठी आंतरराज्यीय तुकडी असणे.—** पूर्व-निर्धारित पद्धतीने राज्य पोलीस मनुष्यबळाचे आदान-प्रदान करणे.

विद्यमान संकलनात, निवडणूक अधिकाऱ्यांना व्यावहारिक वापरासाठी एकाच सर्वसमावेशक निदेशपुस्तकामध्ये आयोगाच्या सर्व विद्यमान सूचनांचा सारसंग्रह करणे अपेक्षित आहे. निवडणुकांच्या यशस्वी आयोजनासाठी या उपाय-योजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यामध्ये सहाय्यभूत होण्यासाठी या उपाययोजनांच्या प्रत्येक वर्गवारीतील तपशिलांचा आराखडा तयार केला आहे.

# प्रकरण दोन

## तंत्रज्ञान

निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी तंत्रज्ञान हे एक प्रभावी साधन आहे. बलवर्धक घटक व केंद्रीय सशस्त्र पोलीस दलेतर उपाययोजना म्हणून असलेली त्याची भूमिका तितकीसी जोरकस होऊ शकणार नाही. हे तंत्रज्ञान निर्भय, निःष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांची सुनिश्चिती करण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या भूमिकेला सहाय्यभूत/पूरक आहे.

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या उपलब्धतेची मर्यादा विचारात घेता, अगोदरच असे ठरविण्यात आले आहे की, अतिसंवेदनशील मतदान केंद्रावरील मतदानप्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी निदान सूक्ष्म निरीक्षक, व्हिडिओ कॅमेरे, सीसीटीव्ही किंवा वेबप्रसारण (वेबकास्टींग) यांसारख्या एका किंवा अधिक केंद्रीय सशस्त्र पोलीस दलेतर उपाययोजनांची तजवीज केली जाईल. तथापि, ज्या मतदान केंद्रावर केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची नियुक्ती केली आहे तेथे सुद्धा मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी वरील उपाययोजना केल्या जाऊ शकतील. तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांची योग्य सुरक्षितता आणि सुरक्षाविषयक खातरजमा करण्यासाठी, असे ठरविण्यात आले आहे की, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वखार (वेअर हाऊस)/ सुरक्षित कक्ष हे सीसीटीव्हीच्या संनिरीक्षणाखाली असावेत आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना भौगोलिक स्थानाचा मागोवा घेणारी प्रणाली (जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली) बसविण्यात यावी. मतदानाच्या अगोदरच्या दिवशी व मतदानाच्या दिवशी प्रत्येक पुढच्या टप्प्यावर ताज्या घडामोडी मिळवण्यासाठी लघुसंदेश सेवा (एस एम एस) संनियंत्रण यंत्रणेचा वापर केला जाऊ शकेल.




सी व्हीजील (दक्ष नागरिक) उपयोजक हे निवडणूक काळामध्ये आदर्श आचार संहितेच्या/खर्चाच्या उल्लंघनाची माहिती कळविण्यासाठी वापरले जाते. अशा प्रकारे, निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यामध्ये तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावते. एक केंद्रीय सशस्त्र दलेतर बलवर्धक घटक म्हणून तंत्रज्ञानाच्या उपयोगितेच्या विविध पद्धतींचा तपशील पुढीलप्रमाणे दिला आहे :

### २.१ वेबप्रसारण (वेबकास्टिंग)

निवडणुकांच्या आयोजनात कार्यक्षमता आणि पारदर्शकता आणण्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षात घेता, असे ठरविण्यात आले आहे की, सर्व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांमध्ये व संवेदनशील क्षेत्रातील सर्व मतदान केंद्रामध्ये किंवा उप-मतदान केंद्रासह एकूण मतदान केंद्रापैकी किमान ५० टक्के मतदान केंद्रात, यापैकी जिथे जास्त असेल तेथे, वेबप्रसारणीची (वेबकास्टींगची) व्यवस्था करण्यात येईल. निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ याच्या नियम ९३(१) नुसार, मतदान केंद्रांमध्ये वेबप्रसारणाला (वेबकास्टींगला) केवळ निवडणूक यंत्रणेकडूनच पाहता येण्यासाठी मर्यादित केले आहे.

**वेबप्रसारणाचा (वेबकास्टिंगचा) अर्थ :**

सामान्यतः वेबकास्टींग म्हणजे आंतरजालावर (इंटरनेटवर) ध्वनिचित्रमुद्रणाचे (व्हिडिओचे) थेट प्रसारण होय. ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रातील संपूर्ण दिवसाच्या कार्यवाहीचे ध्वनिचित्रमुद्रण (व्हिडिओ) करून ते निवडक ठिकाणी पाहता येण्यासाठी (उदा. भारत निवडणूक आयोग/मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय/जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय/निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय/नियंत्रण कक्ष) अशा प्रकारे थेट प्रसारित केले जाते. या प्रक्रियेत ध्वनिचित्रमुद्रण (व्हिडिओ) कॅमेरा हा आंतरजालाशी जोडलेला असणे गरजेचे असते. वेबकॅम, संगणक/लॅपटॉपला जोडलेला कॅमेरा, आयपी कॅमेरा, इत्यादी आंतरजालाशी जोडता येण्याजोगा कोणताही ध्वनिचित्रमुद्रण (व्हिडिओ) कॅमेरा वेब प्रसारणाकरिता वापरला जाऊ शकेल.

**वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगचे) उद्दिष्टे :**

मतदान प्रक्रियेचे वेबप्रसारण (वेबकास्टिंग) करण्याची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

- भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि नियंत्रण कक्षातील टेहाळणी पथक यांच्याकडून मतदान कार्यवाहीचे वास्तव दर्शनी अवलोकन केले जावे.
- निवडणूक प्रक्रियेचे प्रभावीपणे संनिरीक्षण करणे आणि समाजकटक व उपद्रवी व्यक्तींवर जरब बसविणे, मतदारांच्या मनात विश्वास रूजविणे; मतदान प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व सहभागिता आणणे.

**मतदान केंद्रावर वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगची) व्यवस्था करणे :**

(अ) मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी, वेबप्रसारणाचे काम एखादा सेवा पुरवठादार/अभिकरण/संस्था यांना भाडे तत्त्वावर/बाह्यस्त्रोत यंत्रणा तत्त्वावर देऊ शकतील आणि संबंधित राज्य/संघ राज्य क्षेत्राच्या वित्तीय कार्यपद्धत/त्यांच्या राज्याचे नियम यांना अनुसरून कंत्राटाचे शुल्क/दर निश्चित करू शकतील. यासाठी नेमण्यात येणारे अभिकरण/संस्था कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्नित असू नये; कोणत्याही राजकीय पक्षाविषयी सहानुभूती बाळगणारे किंवा त्यांचे समर्थक असू नये ; निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवारांची किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांची जवळची नातेवाईक असू नये; आणि ती कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने भाडेतत्त्वावर घेतलेली असू नये.

(ब) पर्यायाने बहुतेक मतदान केंद्र शाळांमध्ये असल्यामुळे जिल्हा निवडणूक अधिकारी, वेबप्रसारणासाठी (वेबकास्टींगसाठी) त्या ठिकाणची आंतरजाल (इंटरनेट) जोडणी वापरू शकतो आणि शाळांमधून किंवा शासकीय कार्यालयांकडून डेस्कटॉप किंवा लॅपटॉप उसनवारीवर घेऊ शकतील किंवा मतदान केंद्रामध्ये काही दिवस वापरण्यासाठी भाडेतत्त्वावर घेऊ शकेल. जोडणी नाही किंवा आंतरजालाचा (इंटरनेटचा) अभाव आहे अशा मतदान केंद्रामध्ये तात्पुरत्या स्वरूपात लॅन्डलाईन किंवा मोबाईल ब्रॉडब्रॅन्ड जोडणी देता येऊ शकेल. आय पी कॅमेरे किंवा कॅमेरा असलेले मोबाईल डिव्हाईसेस आणि इंटरनेट जोडणी उपलब्ध असल्यास, या बाबी वेबप्रसारणासाठी (वेबकास्टींगसाठी) मतदान केंद्रात पुरविण्यात येऊ शकतील.

(क) भारत निवडणूक आयोगाने सूचविलेल्या तांत्रिक विनिर्देशांनुसार वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगची) व्यवस्था करण्यात यावी. राज्य/जिल्हा समन्वय अधिकाऱ्याने संगणकीकरण, सायबर सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञान यांसाठी मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान पथकासह भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वेबप्रसारणाची (वेबकास्टिंग) सुयोग्य व्यवस्था करण्यात आली असल्याची आणि मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधीच्या रंगीत तालमीच्या वेळी, निवडणूक प्रक्रियेचे विनाव्यत्यय थेट प्रसारण होत असल्याची खात्री करावी. मतदानाच्या दिवशी थेट प्रसारण पाहता यावे यासाठी नियंत्रण कक्षांचीही उभारणी पुरेशा अगोदर करण्यात यावी.

(ड) वेबप्रसारणासाठी (वेबकास्टिंगसाठी) मतदान केंद्रे सुनिश्चित करताना, मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व अतिसंवेदनशील मतदान केंद्रे, संवेदनशील क्षेत्रातील सर्व मतदान केंद्रे, बुथ ताब्यात घेण्याचा पूर्वेतिहास आणि इतर गैरव्यवहार, सर्वसाधारण कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, भ्रष्टाचार व निवडणूकविषयक गुन्ह्यांच्या संभाव्य कृती, आंतरजाल (इंटरनेट) जोडणीची उपलब्धता व इतर संबंधित घटक या सर्व बाबी विचारात घ्याव्यात.

**वेबप्रसारणासाठी (वेबकास्टिंगसाठी) कर्मचाऱ्यांची आवश्यकता व प्रशिक्षण :**

आय. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये-मतदानाच्या दिवशी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात, थेट प्रसारण पाहता यावे यासाठी, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील माहिती तंत्रज्ञान पथक, पुरेशा अगोदरच व्यवस्था करील आणि वेबप्रसारण (वेबकास्टिंग) व नियंत्रण कक्षातील टेहाळणीकरिता जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या पथकास प्रशिक्षित करील.

जे. जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात /निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामध्ये–जितक्या मतदान केंद्रांचे वेबप्रसारण (वेबकास्टिंग) करण्याचे नियोजित केले असेल. त्यानुसार, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या/ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये एक किंवा अधिक माहिती तंत्रज्ञान कर्मचाऱ्यांची गरज असेल. या प्रयोजनासाठी, जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमधील माहिती तंत्रज्ञान विभागातील उपलब्ध मनुष्यबळ उसनवारीवर घेण्यात येईल आणि त्यांना आगाऊ प्रशिक्षित करण्यात येईल.

के. मतदान केंद्रांमध्ये–जेथे वेबप्रसारण (वेबकास्टिंग) करण्याचे नियोजित केले असेल, अशा मतदान केंद्रातील केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना वेबप्रसारणाचे (वेबकास्टिंगचे) प्रशिक्षण देण्यात यावे. खाजगी अभिकरणाद्वारे वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगची) व्यवस्था करण्यात येत असल्यास, त्यासाठी अतिरिक्त मतदान अधिकाऱ्याची आवश्यकता असणार नाही. यास्तव नेमलेले अभिकरण आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरविल. मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाचे माहिती तंत्रज्ञान पथक, नेमलेल्या अभिकरणाद्वारे पुरविलेल्या तांत्रिक साहाय्यावर देखरेख ठेवील.

**मतदानाच्या दिवशी आणि मतदान प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रामध्ये वेबप्रसारणासाठी(वेबकास्टिंगसाठी) वापरावयाचा कॅमेरा बसवणे :**

(अ) कॅमेरा हा जमिनीपासून साधारण ७-८ फूट अशा पुरेशा उंचीवर स्थिर व भक्कम आधाराने बसविला असल्याची किंवा वॉल माउंटेड स्टँन्ड सारख्या साधनांवर स्थिर स्थितीत बसविला असल्याची खात्री करण्यात यावी.

(ब) कॅमेरा अशा प्रकारे बसविण्यात यावा की, ज्यामुळे, निवडणूक प्रक्रियेच्या पुढील बाबी विस्तीर्ण स्वरूपात सुस्पष्टपणे चित्रित करण्यात येऊन, पारेषित करण्यात येतील :—

(एक) मतदान अधिकाऱ्याकडून मतदाराची ओळख पटविण्याची प्रक्रिया ;

(दोन) मतदारांच्या बोटावर पक्की शाई लावणे ;

(तीन) मतदाराची ओळख पटल्याची खात्री झाल्यावर सह केंद्राध्यक्षाकडून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट चालू करणे ;

(चार) कोणत्याही परिस्थितीत मतदानाची गोपनीयता भंग होणार नाही, यादृष्टीने मतदान युनिट दिसणार नाही, पण मतदान युनिटच्या कक्षात मतदाराने जाऊन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदान युनिटमध्ये मतदान करण्याची प्रक्रिया ;

(पाच) शक्य असल्यास, मतदान प्रतिनिधींची उपस्थिती ;

(सहा) मतदान समाप्त होण्याच्या वेळी, रांगेतील मतदारांना चिठ्ठ्या/टोकनचे केले जाणारे वाटप ;

(सात) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (मतदान युनिट/नियंत्रण युनिट) व्हीव्हीपीएटी वापरले असल्यास, मोहोरबंद करण्याची प्रक्रिया आणि मतदान प्रतिनिधींना नमुना १७-सी च्या प्रती देणे.

(क) मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान केंद्रावर वेब कॅमेरा/लॅपटॉप बसविण्यात यावेत आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगची) सराव फेरी करण्यात यावी. मतदानाच्या दिनांकासह मतदान केंद्राचे नाव व क्रमांक कॅमेऱ्यामध्ये निरंतरपणे टिपले जाईल अशा पद्धतीने लावावे. बुथस्तरीय अधिकारी व संबंधित क्षेत्रीय अधिकारी वरील विनिर्दिष्ट सूचनांप्रमाणे वेबप्रसारणाची (वेबकास्टिंगची) व्यवस्था

करण्यात आली असून, ते यथोचितपणे कार्य करत असल्याचे प्रमाणपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदान केंद्रनिहाय सादर करतील. वरील प्रमाणपत्रांच्या आधारे, जिल्हा निवडणूक अधिकारी, आयोगाकडे पाठविण्याच्या दृष्टिने एक एकत्रित अहवाल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला सादर करील.

(ड) निवडणूक निर्णय अधिकारी, "तुम्ही वेब-कॅमेरा/सीसीटीव्ही संनिरीक्षणाखाली आहात" असा आशय असलेली काळ्या रंगाची अक्षरे प्रकाशित पिवळ्या रंगावर लिहिलेली असतील, अशा पद्धतीचे ३० इंच × १८ इंच आकाराचे पत्रक तयार करील आणि ही पत्रके मतदान बुथच्या आतील व बाहेरील बाजूस विविध ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करण्यात येतील.

(ई) ही पत्रके कोणत्याही प्रकारची जाहिरात, वेबप्रसारणासाठी (वेबकास्टिंगसाठी) वापरलेल्या पत्रकात/चौकटीत दर्शविण्यात येत नसल्याची खात्री करण्यात यावी.

**वेबप्रसारणाच्या (वेबकास्टिंगच्या) ध्वनिचित्रणांचे (व्हिडिओचे) अभिलेखन करणे :**

वेबप्रसारण (वेबकास्टिंग) केल्याच्या सर्वच बाबतीत, कार्यवाहीचे ध्वनिचित्रण (व्हिडिओ) इतर कोठेही न ठेवता, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियंत्रण कक्षात अभिलेखन करून ठेवणे अनिवार्य असेल. जिल्हा निवडणूक अधिकारी हा, अशा अभिलेखन केलेल्या ध्वनिचित्रमुद्रणाचा (व्हिडिओचा) अभिरक्षक असेल. एखाद्या मतदान केंद्राच्या संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास, मतदानाच्या पुढील दिवशी छाननीच्या वेळी पाहता येण्यासाठी अभिलिखित चित्रफितीपैकी, हव्या त्या कालावधीतील चित्रफिती निवडणूक अधिकाऱ्याला उपलब्ध करून दिल्या जातील.

**२.२ ध्वनिचित्रमुद्रण (व्हिडिओ) कॅमेरे व अंकीय (डिजीटल) कॅमेरे :**

आयोगाच्या स्थायी अनुदेशांच्या आणि निवडणूक कायद्यांच्या उल्लंघनाची नोंद ठेवण्यासाठी; आणि त्याच्या सुधारित उपाययोजनांच्या प्रभावाचे मूल्यमापन करण्यासाठी; प्रत्येक मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यानच्या अतिसंवेदनशील घटना; केवळ सार्वत्रिक प्रचाराच्या कालावधीच नाही तर, मतदानाचा दिवस, मतदान नोंदविलेल्या मतपेट्या/इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व इतर साधने यांची वाहतूक व संकलन प्रक्रिया, मतमोजणी प्रक्रिया व निकाल घोषित करण्याची प्रक्रिया इत्यादी बाबींचे ध्वनिचित्रमुद्रणाच्या माध्यमातून जतन करण्याची व्यवस्था करील.

निवडणूक निर्णय अधिकारी, ध्वनिचित्रमुद्रण पथकाला कामकाजाचा क्रम ठरवून देत असताना, मतदारांची संख्या, मतदारसंघाचा आकार, संवेदनशील मतदान केंद्रांची संख्या, बुथ ताब्यात घेण्याचा व भ्रष्टाचाराचा मागील इतिहास, सर्वसाधारण कायदा व सुव्यवस्था परिस्थिती, भ्रष्ट आचरणाची व निवडणूक विषयक गुन्ह्यांची व तत्संबंधित घटकांची संभाव्यता इत्यादी बाबी विचारात घेईल.

निवडणूक निर्णय अधिकारी, आपल्या मूल्यमापनाच्या आधारे, उपरोक्त घटक विचारात घेऊन, आवश्यक असणाऱ्या व्हिडिओ पथकांची संख्या निश्चित करील. आयोगाने विधानसभा/लोकसभा मतदारसंघासाठी कमाल किंवा किमान व्हिडिओ पथकांची संख्या विहित केलेली नसून, ही बाब सर्वस्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वविवेकावर सोडली आहे.

कार्यवाहीवर देखरेख ठेवण्यासाठी शक्य तितक्या मतदान केंद्रावर ध्वनिचित्र मुद्रण (व्हिडिओ) कॅमेरे वापरण्यात यावेत. ज्या मतदान केंद्रावर सूक्ष्म निरीक्षक व्हिडिओ कॅमेरे किंवा वेबप्रसारण (वेबकास्टींग) प्रणाली वापरण्यात येत नाही, अशा केंद्रामध्ये डिजिटल कॅमेरे वापरण्यात येतील.

**कॅमेरे/ध्वनिचित्रमुद्रक/छायाचित्रकार यांची सूची :**

एक. जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्ह्यात/शासकीय विभागांत उपलब्ध असलेले सर्व व्हिडिओ कॅमेरे व स्थैतिक कॅमेरे, तसेच ध्वनिचित्रमुद्रक/छायाचित्रकार यांची सूची तयार करील.

दोन. याच बरोबर, जिल्हा निवडणूक अधिकारी, बाजारातून व्हिडिओ व स्थैतिक कॅमेरे भाड्याने घेईल. आणि बाजारातील प्रचलित दराआधारे भाडे शुल्क निश्चित करील. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून नेमण्यात येणारे खाजगी ध्वनिचित्रमुद्रक किंवा छायाचित्रकार हे, कोणत्याही राजकीय पक्षाचे व्यक्ती नसावेत; निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवारांचे किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांचे हितचिंतक किंवा समर्थक किंवा जवळचे नातेवाईक नसावेत; आणि कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नेमलेले नसावेत.

तीन. कोणत्याही जिल्ह्यात व्हिडिओ कॅमेरे किंवा स्थैतिक कॅमेऱ्यांची कमतरता असल्यास, शेजारील जिल्ह्यातून गरज भागाविली जाईल. आणि विभागीय आयुक्त किंवा मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्ह्यांमधील अशा व्हिडिओ कॅमेऱ्यांच्या देवाण-घेवाणीची व्यवस्था करतील.

**ध्वनिचित्रमुद्रकांना/छायाचित्रकारांना प्रशिक्षण :**

ध्वनिचित्रमुद्रण/छायाचित्रण करणे या प्रक्रिया कशा प्रकारे कराव्यात व कोणत्या घटना जाणीवपूर्वक कॅमेराबद्ध कराव्यात यासंबंधात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून ध्वनिचित्रमुद्रकांना/छायाचित्रकारांना प्रशिक्षण देण्यात येईल. मतदानाला बाधा पोहचविणाऱ्या संवेदनशील घटनांची नोंद घेणे हा या आयोजनामागील उद्देश असून, दैनंदिन कामाप्रमाणे केवळ कॅसेट किंवा कॅमेरा मेमरी भरून ध्वनिचित्रफित किंवा छायाचित्रे काढणे. असा उद्देश नाही, याची ध्वनिचित्रमुद्रकांना/छायाचित्रकारांना जाणीव करून देण्यात यावी.

**मतदान दिवसाच्या अगोदर कोणत्या बाबी कॅमेराबद्ध कराव्यात :**

(अ) मंत्र्यांनी, मान्यताप्राप्त पक्षांच्या प्रमुख राष्ट्रीय/राज्यस्तरीय नेत्यांनी आणि निवडणुकीत उतरलेल्या पक्षाच्या स्टार प्रचारकांनी हजेरी लावलेल्या/संबोधित केलेल्या बैठका.

(ब) दंगली किंवा दंगलसदृश्य परिस्थिती किंवा अराजकता, दगडफेक, झुंडशाही इत्यादी.

(क) हिंसात्मक घटना, साधन संपत्तीचे नुकसान, लुटमार जाळपोळ, शस्त्रास्त्रे नाचवणे इत्यादी.

(ड) मतदारांना धमकी देणे.

(ङ) मतदारांना साडी, धोती, घोंगडे इत्यादी वस्तुंचे वाटप करून प्रलोभन देणे/लाच देणे.

(च) मोठ-मोठी कट आऊट्स इत्यादीद्वारे खर्चाचे प्रदर्शन.

(छ) संशयास्पद/गुन्हेगारी नोंदी असलेल्या उमेदवारांच्या हालचाली व कृत्ये.

(ज) उमेदवारीचे नामनिर्देशन, छाननी व उमेदवारी मागे घेणे, यांसारख्या महत्त्वाच्या घटना.

(झ) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची तयारी.

(य) निवडणूक खर्चाच्या संनियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी

सर्व दृश्य (व्हिडिओ) व अंकीय (डिजिटल) चित्रण दिनांक व वेळेसह केले पाहिजे, जेणेकरून वास्तविक वेळ व दिनांकाची पडताळणी करता येते.

**मतदानाच्या दिवशी कॅमेऱ्याने काय चित्रित करावे व काय करू नये :**

मतदानाच्या दिवशी पुढील चित्रण केले पाहिजे :

(क) मतदारांना धमकावण्याचा प्रयत्न.

(ख) मतदारांना प्रलोभन/लाच देण्याचा प्रयत्न

(ग) मतदान केंद्राच्या १०० मीटर्सच्या आत प्रचार

(घ) मतदान केंद्र हस्तगत करणे.

(ङ) मतदान कक्षाची स्थाननिश्चितीकरण व मतदान कक्षात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बसवणे (मतदान सुरू होण्यापूर्वी)

(च) मतदान केंद्रातील आश्वासित किमान सुविधा

(छ) मतदान प्रतिनिधींची उपस्थिती

(ज) मतदान केंद्राध्यक्षाद्वारे अभिरूप मतदान व प्रतिज्ञापन पूर्ण करणे.

(झ) जेथे व्हीव्हीपीएटी वापरले असेल तेथे अभिरूप मतदानाच्या दरम्यान वापरलेल्या मतदान पत्रिका पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीतून (व्हीव्हीपीएटीतून) काढून टाकणे व मोहोरबंद करणे.

(य) अभिरूप मतदानाचा निपटारा करणे.

(ट) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मोहोरबंद करणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मोहोरेवर मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेणे.

(ठ) मतदारांची ओळख पटविण्याची पद्धती

(ड) पक्क्या शाईचा वापर

(ढ) रांगेतील मतदार

(ण) मतदान बंद होण्याच्या वेळी व रांगेतील मतदारांना चिठ्ठ्यांच्या वाटपाकरिता रांगेची लांबी.

(त) मतदान केंद्रावरील कोणत्याही स्वरूपाचा वाद.

(थ) क्षेत्र अधिकारी, निरीक्षक व इतर निवडणूक पदाधिकारी किंवा उमेदवारांसह कोणत्याही महत्त्वाच्या व्यक्तींची भेट.

(द) कोणतेही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बदलत असल्यास, आणि अभिरूप मतदान घेणे व नवीन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र.

(ध) मतदान केंद्रावर कोणतीही अनिष्ट घटना घडल्यास, मतदानाच्या दिवशी पुढील चित्रण करू नये.

  (क) कोणत्याही पद्धतीने कॅमेराद्वारे मतदानाची गोपनीयता भंग होणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे.

  (ख) मतदान कक्षातील मतदारांनी मतांचे चित्रण कोणत्याही परिस्थितीत कॅमेराने करू नये. सर्व चलचित्रण व छायाचित्रण हे दिनांक व वेळेच्या नोंदी केले पाहिजे, जेणेकरून वास्तविक वेळ व दिनांकांची पडताळणी करता येईल.

**मतदान प्रक्रिया संपल्यानंतर कॅमेरात काय चित्रित करावे :**

(क) सुरक्षित कक्षात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवल्यानंतर सुरक्षा कक्ष बंद व मोहोरबंद करणे.

(ख) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोजणीसाठी बाहेर काढण्यापूर्वी सुरक्षित कक्ष उघडताना

(ग) मतमोजणी प्रक्रिया.

**चलचित्रकार व छायाचित्रकार यांच्याकरिता जेवण :**

चलचित्रकाराला जेवण पुरविले जाईल आणि चलचित्रकार /छायाचित्रकार हे निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवाराकडून किंवा राजकीय पक्षाकडून किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांचे आतिथ्य स्वीकारणार नाही याची खात्री करून घ्यावी. सर्व (व्हिडिओ) चल चित्रण पथके वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्याच्या वैयक्तिक देखरेख व मार्गदर्शनाखाली असावेत.

**चलचित्रण/स्थिर छायाचित्रण जतन करणे :**

जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या सुरक्षित ताब्यात सीसीटीव्ही, व्हिडिओ व स्थिर छायाचित्रण कॅमेराने केलेले चित्रण व्हिडीओ ध्वनिफीत, सीडी, पेन ड्राइव्ह किंवा इतर संचय साधन यांमध्ये ठेवले जाईल. निवडणूक याचिका दाखल करण्याचा कालावधी संपेपर्यंत आणि निवडणूक याचिका दाखल झाल्यास, निवडणूक याचिकेचा निपटारा होईपर्यंत या चित्रणाच्या (रेकॉर्डिंग) नोंदी ठेवल्या जातील; (कृपया या बाबतीतील आयोगाचे जारी केलेल्या अद्ययावत सूचना पहाव्यात.)

**चलचित्रण (रेकॉर्डिंग)/छायाचित्रण याची छाननी केली जाईल आणि व्हिडिओग्राफर/छायाचित्रकार छाननीच्या वेळी उपस्थित असतील :**

जर, मतदान केंद्रावर व्हिडिओग्राफी/फोटोग्राफी केलेली असेल तर, त्या मतदान केंद्राच्या बाबतीत कोणतीही तक्रार आली असल्यास, छाननीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी व निरीक्षकांनी त्याची दखल घेतली पाहिजे. व्हिडिओग्राफर/फोटोग्राफर छाननीच्या वेळी उपस्थित राहतील, जेणेकरून निवडणूक निर्णय अधिकारी व निरीक्षकाला आवश्यक वाटल्यास, ते त्याचे कोणतेही स्पष्टीकरण मागू शकतात.

## २.३ सीसीटीव्ही :

सीसीटीव्ही हे अतिशय प्रभावी साधन म्हणून वापरले जाऊ शकते, विशेषतः संवेदनशील क्षेत्रात, जेथे धोका समजला जातो किंवा निवडणूक कायद्याचा भंग करण्याचे प्रमाण ऐतिहासिकदृष्ट्या खूप जास्त आहे. पोलीस सीसीटीव्ही कॅमेरा 'नाक्यांवर' केलेल्या तपासणीवर लक्ष ठेवण्यासाठी देखील वापरू शकतात. केंद्रीय सशस्त्र पोलीस बलेत्तर उपाय योजना म्हणून, सीसीटीव्हीचा वापर करत असताना, व्हिडिओ आणि स्थिर छायाचित्र घेण्याच्या वापरासाठी वर नमूद केलेल्या सर्व सूचना/मानदंडाचे सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या बाबतीत देखील काटेकोरपणे पालन होईल, याची खात्री करणे आवश्यक आहे.

भरारी पथक/संनिरीक्षण पथकाद्वारे केलेल्या तपासणीची सीसीटीव्ही व्याप्ती :

➢ भरारी पथकाद्वारे वापरल्या जाणाऱ्या सर्व वाहनांवर सीसीटीव्ही कॅमेरा/वेबकॅम्स किंवा भरारी पथकाने मध्ये अडवलेल्याचे चित्रण करण्यासाठी व्हिडिओ कॅमेरा (उपलब्धता व आर्थिक व्यवहार्यता लक्षात घेऊन) बसवलेली असली पाहिजेत.

➢ त्याच्या क्षेत्रातील बेकायदेशीर दारू, लाचेच्या वस्तू, किंवा मोठ्या प्रमाणात असलेली रोख रक्कम, शस्त्रे व स्फोटक पदार्थ व समाजविघातक घटकांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी खर्चाचे संवेदनशील भागात/वस्त्यांमध्ये उभारलेल्या तपासणी नाक्यांवर स्थिर संनिरीक्षण पथकांद्वारे तपासणीची संपूर्ण प्रक्रिया, व्हिडिओ किंवा सीसीटीव्हीमध्ये बंदिस्त केले जाईल.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या सुरक्षा व सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही चित्रण (कव्हरेज) :**

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या (इव्हीएमच्या) उचित सुरक्षा व सुरक्षिततेसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या (ईव्हीएमच्या) गोदामात सीसीटीव्ही लावला पाहिजे.
- प्रथम स्तरीय तपासणीनंतर ईव्हीएमच्या सुरक्षिततेसाठी, प्रथम स्तरीय तपासणी झालेले ईव्हीएम असलेली सुरक्षित कक्षाचे प्रवेशद्वार २४ × ७ सीसीटीव्ही व्याप्ती (कव्हरेज) मध्ये असेल.
- मतदान झालेल्या ईव्हीएमच्या सुरक्षिततेसाठी, सुक्षित कक्ष २४ × ७ सीसीटीव्ही व्याप्तीखाली(कव्हरेजखाली) असेल.

**छायाचित्र / वेबकास्टिंग /सीसीटीव्ही/व्हिडिओग्राफी/आधारसामग्रीचा संचय करणे/ठेवून घेणे :**

छायाचित्र/वेबकास्टिंग/सीसीटीव्ही/व्हिडिओग्राफी आधारसामग्रीच्या संचय/ठेवून घेण्याच्या बाबतीतील पुढील निदेशांची खात्री केली पाहिजे—

(क) आयोगाच्या आदेशांचे पालन करून, मतदान केंद्राच्या आतील तयार केलेला वेबकास्टिक आधारसामग्री व व्हिडिओग्राफी आधारसामग्री / छायाचित्रण निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ९३(१) अन्वये संबंधित निवडणुकीच्या अहवालाचा एक भाग बनतील आणि त्याच्या सुरक्षिततेसाठी योग्य खबरदारी घेऊन संग्रही ठेवले जातील. ध्वनीमुद्रित योग्यरीतीने मोहोरबंद करून, सीडी किंवा इतर योग्य संचय साधनामध्ये आणि सहज पुनः प्राप्तीसाठी निर्देशांकित करून ठेवले जाईल आणि इतर सर्व निवडणूक संबंधी अहवालाच्या बाबतीत म्हणून, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या सुरक्षित ताब्यात दिले जाईल. जिल्हा निवडणूक अधिकारी माहितीची उघडकीस न आल्याची व चोरी न झाल्याची खात्री करील.

(ख) वरील आधारसामग्री सुरक्षित कक्षात ट्रंकमध्ये ठेवली जाईल. जो इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी सुरक्षित कक्षापेक्षा वेगळ्या दस्तऐवजांकरिता नेमून दिलेला असेल. जेथे, त्या

निवडणुकीशी संबंधित सर्व सांविधिक दस्तऐवज संग्रही ठेवले असतील. प्रमाण नमुन्याचे अनुपालन करून एकरूप सांकेतांक क्रमांकाने व्हिडिओ चित्रणाची सीडी/संचय साधन निर्देशांकित केले जाईल. चित्रित केलेल्या प्रसंगाचे / घटनेचे राज्य / जिल्हा / विधानसभा मतदार संघ / ध्वनिमुद्रिताचा दिनांक / ठिकाण / चित्रित केलेल्या घटनांचा सारांश निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ९४(ख) अन्वये साधनसामग्री एक वर्षाच्या कालावधीसाठी राखून ठेवली जाईल व त्यानंतर नष्ट करण्यात यावी.

(ग) साधनसामग्रीची प्रत छाननी प्रक्रियेदरम्यान संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सुरक्षित कोठडीत ठेवण्यात येईल. आवश्यकता असल्यास, ती प्रत छाननी प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर नष्ट केली जाईल.

(घ) सीडी मोहोरबंद जशीच्या तशी ठेवावी, जेणेकरून दुसऱ्या सीडीमध्ये आशयाची प्रतिलिपी करता येणार नाही. संचयाकरिता सीडी पाठवण्यापूर्वी आकस्मित पुसून टाकणे, संपादन, किंवा हातचलाखी, इत्यादींपासून प्रतिबंधित करण्यासाठी फीतीने आच्छादित केले जाईल. तसेच त्याच प्रकारची सावधगिरी इतर प्रकारचे संचय साधन, जर वापरले असल्यास, घेतली जाईल.

(ङ) निवडणूक प्रक्रियेची विविध टप्प्यांचे चित्रण (मतदान केंद्राशी संबंधित नाही) जसे की, चित्रिकरण / सीसीटीव्हीद्वारे, उमेदवारांचे नामनिर्देशन, छाननी, उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागे घेणे, इत्यादी, संबंधित निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांची मुदत समाप्त होईपर्यंत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या ताब्यात सुरक्षित ठेवली जाईल.

(च) निवडणूक खर्चाचे संनियंत्रण गट, भरारी पथके, स्थिर संनिरिक्षण पथके, इत्यादींनी केलेले उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचार उपक्रमाचे व्हिडिओचित्रण निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ८ महिन्याची मुदत संपेपर्यंत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या ताब्यात सुरक्षित ठेवले जाईल.

(छ) साधनसामग्री / ध्वनीमुद्रित (रेकॉर्ड) च्या प्रतींसाठी किंवा अशी साधनसामग्री / ध्वनीमुद्रित (रेकॉर्ड) तपासणीसाठी अर्ज मिळाल्यावर, वरील (ङ) च्या प्रकरणात निवडणूक निकाल जाहीर झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत, आणि वरील (च) च्या प्रकरणात निवडणूक निकाल जाहीर झाल्याच्या ८ महिन्यांच्या आत, पुढील सुविधांना परवानगी दिली जाईलः

मागणीवरून स्थिर छायाचित्र किंवा व्हिडिओ ध्वनिमुद्रिताच्या प्रती, उमेदवाराला मोफत व रु. ३०० प्रती सीडी/ संचय साधन (सीडी/संचय साधनाच्या किंमतीशिवाय) इतर कोणत्याही व्यक्तीला देयकाचा भरणा केल्यावर दिले पाहिजे. पुढीलप्रमाणे निरीक्षणाला परवानगी दिली जाऊ शकते. व्हिडिओ सीडी / संचय साधने जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा, यथास्थिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात निरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिले जाईल.

सीडी/ संचय साधनांतील आशयाची अधिप्रमाणता व खरेपणाची कोणतीही हमी कोणत्याही परिस्थितीत घेतली जाणार नाही. आणि ती "जशीच्या तशी" आधारावर उपलब्ध करून दिली जाईल.

सीडी / संचय साधनाचे कोणतेही फुटेज किंवा नुकसान किंवा विकृतीकरण टाळण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रभावी पर्यवेक्षणाची सुनिश्चिती केली पाहिजे. त्याचबरोबर मोठ्या संख्येने अनेक व्यक्तींना एकाचवेळी निरीक्षण करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

संबंधित निवडणुकीच्या बाबतीत किंवा निवडणूक गुन्हे इत्यादी संबंधित कोणत्या व्हिडिओ चित्रणात असू शकते, अशी कोणतीही निवडणूक याचिका किंवा कोणतीही इतर याचिका / तक्रार इत्यादी ४५ दिवस किंवा, यथास्थिति ८ महिन्यांच्या विहित कालावधी संपल्यावर दाखल केली आहे का, याची खात्री करून घेतली पाहिजे. जर निवडणूक याचिका किंवा कोणतीही इतर याचिका इत्यादी, प्रलंबित नसेल तर, त्या प्रयोजनासाठी विहित केलेल्या नेहमीच्या प्रक्रियेचे पालन करून चित्रण नष्ट केले जाईल. जर, निवडणुकीच्या बाबतीतील कोणतीही निवडणूक याचिका किंवा कोणतीही इतर याचिका इत्यादीच्या कोणत्याही सक्षम न्यायालयात दाखल केली असेल जी, (ङ) व (च) मध्ये नमूद साधनसामग्रीशी (डाटा) संबंधित असेल, तर अशी साधनसामग्री (डाटा) अशा प्रकरणाचा निपटारा होईपर्यंत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या ताब्यात सुरक्षित ठेवला जाईल.

## २.४ (एसएमएस) लघुसंदेश संनियंत्रण पद्धति

एक. लघुसंदेश संनियंत्रण पद्धती (एसएमएस) आधारित मतदान व्यवस्थापन पद्धती मतदानापूर्वीच्या दिवशी व मतदानाच्या दिवशी विविध महत्त्वाच्या टप्प्यांवरील चालू घडामोडीची माहिती मिळविण्यासाठी वापर केला जाऊ शकतो.

दोन. मतदान केंद्राध्यक्ष / मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (मतदान केंद्राशी संलग्न) / क्षेत्र अधिकारी यांनी पूर्व नियोजित वेळेत निर्णायक प्रसंग / महत्त्वाचे टप्पे / मतदानाच्या दिवशीचे उपक्रमांचे पूर्व स्वरूपित लघुसंदेश (एसएमएस) त्याच्या स्वतःच्या भ्रमणध्वनीवरून मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी /निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील केंद्रीय सर्व्हरवर पाठविणे आवश्यक आहे.

तीन. सूचक वेळापत्रक व पाठवावयाच्या संदेशाचे प्रकार पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | महत्त्वाचा टप्पा | लघुसंदेश केव्हा पाठवावा |
|---|---|---|
| १ | सर्व्हरवर वरील फोन क्रमांकाची विधिग्राह्यता करणे | मतदान पथकाला पाठविण्यापूर्वी |
| २ | मतदान पथकातील कर्मचारी वर्ग पोहोचला | मतदानाच्या दिवसाच्या आधीच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदान कक्षातील कर्मचारी पोहोचला की लगेच |
| ३ | (क) मतदान प्रतिनिधी,<br>(ख) केंद्रीय सशस्त्र पोलीस बल<br>(ग) सूक्ष्म - निरीक्षक<br>(घ) डिजीटल कॅमेरा / व्हिडीओ कॅमेरा यांची उपस्थिती | अभिरूप मतदानाला (मतदानाच्या दिवशी) प्रारंभ होण्यापूर्वी |
| ४ | अभिरूप मतदानाचे आयोजन | मतदानाला प्रारंभ होण्यापूर्वी व अभिरूप मतदान (मतदानाच्या दिवशी) पूर्ण झाल्याच्या नंतर |
| ५ | मतदानाची सुरुवात | मतदानाला सुरूवात तात्काळ केल्यानंतर |
| ६ | मतदानात व्यत्यय / पुन्हा सुरू केले | मतदानाच्या दिवशी मतदानात व्यत्यय आल्यावर / पुन्हा सुरू केल्यावर तात्काळ |
| ७ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात समस्या | तात्काळ |
| ८ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रतिस्थापन असल्यास | तात्काळ |
| ९ | दोन तासाने / अंतिम मत दिल्याचा अहवाल | मतदानाच्या दिवशी म.पू. ९ पासून २ तासाने अहवाल देणे / मतदान बंद झाल्यावर तात्काळ |
| १० | मतदान बंद करण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेत रांगेतील उर्वरित मतदारांची संख्या | मतदान बंद करण्याकरिता निश्चित केलेल्या वेळेत |
| ११ | मतदान बंद झाले | मतदान बंद झाल्यावर तात्काळ |
| १२ | मतदान कक्षातील कर्मचारी निघून गेला | तात्काळ मतदान पथक निघून गेल्यावर |

चार. संबंधित अधिकाऱ्यांना बीएसएनएल / सेवा पुरवठा करणाऱ्यांनी एकापाठोपाठ क्रमांकांच्या मालिकेतील सीम कार्ड पुरविले पाहिजे. ते शक्यतो भ्रमणध्वनीसह (जीएसएम भ्रमणध्वनी) सुसज्जित असले पाहिजे. त्यांना स्वरूपित संदेश विशेष क्रमांकावरून पाठविला पाहिजे. संदेश मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील केंद्रीय सर्व्हरमध्ये थेट संग्रहित केला जाईल.

पाच. मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात समर्पित ४ ते ५ व्यक्तींचा गट ( अनुदेशक/ सहायक अनुदेशक ) अपूर्ण किंवा चुकीचे संदेश हाताने प्रमाणित केले पाहिजेत.

सहा. संबंधित अधिकाऱ्यांना प्रमाणित स्वरूपित संदेश कसे वापरावे याचे योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांना मतदानाच्या पूर्वी व मतदानाच्या दिवशी त्यांच्या संदर्भासाठी प्रमाणित स्वरूपित संदेशांची छोटी पत्रिका ( खिश्याच्या आकारमानाची ) आगाऊ दिली जाऊ शकते. लघुसंदेशाचे स्वरूप व वाक्यरचना योग्यरीत्या बनवलेली असू शकते जेणेकरून, जीएसएम मोडेम प्रणालीद्वारे प्राप्त संदेश आधारसामग्रीमध्ये ( डाटाबेसमध्ये ) स्वयंचलितपणे रुपांतरीत व अद्ययावत केला जाऊ शकतो आणि मतदान केंद्राच्या ऑनलाईन संनियंत्रणाकरिता सर्व हितसंबंधित व्यक्तींना उपलब्ध करून दिले जाऊ शकते. पुढील प्रमाणित वाक्यरचना स्वीकारली जाऊ शकते :

| महत्त्वाचे टप्पे | लघुसंदेश एसएमएस वाक्यरचना |
|---|---|
| फोन क्रमांक विधिग्राह्यीकरण | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदारसंघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] ( बदली मतदार ) पीव्ही उदाहरणार्थ पी१, ए८ पी १५ पीव्ही. |
| मतदार पक्ष पोहोचला | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीआर उदाहरणार्थ पी१, ए८ पी १५ पीआर. |
| मतदान प्रतिनिधी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, सूक्ष्म-निरीक्षक, डिजिटल कॅमेरा, व्हिडिओ कॅमेरा | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीए [मतदान प्रतिनिधीचा क्रमांक] सी [केंद्रीय सशस्त्र पोलीस दल होय/नाही] एम [सूक्ष्म निरीक्षक होय/नाही] डी [डिजिटल कॅमेरा होय/नाही] व्ही [व्हिडिओ कॅमेरा होय / नाही]. |
| आयोजित अभिरूप मतदान | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] एमसी. |
| मतदान चालू | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीएस. |
| मतदानात व्यत्यय / मतदान चालू झाले | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीआय पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ)] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीआर |
| तासाने / अंतिम मत दिले | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] व्हीसी ८००<br>पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] व्हीएम ४७० व्हीएफ ४३०. |
| मतदान बंद | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीसी. |
| मतदान पक्ष निघून गेला | पी [ संसदीय मतदार संघाचा क्रमांक ( लोकसभा मतदार संघ )] ए [ विधानसभा मतदार संघाचा क्रमांक] पी [मतदान केंद्राचा क्रमांक ] पीडी. |

सात. एसएमपीपी (लघु संदेश पीअर ते पीअर पोर्ट) हा भ्रमणध्वनी आणि सर्व्हरमधील आंतरपृष्ठ असेल.

आठ. लघुसंदेश आधारित मतदान संनियंत्रण प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी, परवाना असलेले सॉफ्टवेअर मिळवायचा आहे व मतदान केंद्रांमध्ये योग्य नेटवर्क कव्हरेज असले पाहिजे.

नउ. दुर्गम प्रदेशात, संपर्काकरिता इतर पर्यायी व्यवस्था केली पाहिजे [ संदेश वाहक /दूरध्वनी फोन / नेटवर्क कव्हरेज असलेल्या जवळच्या ठिकाणचा भ्रमणध्वनी फोन मार्फत माहिती पोहचविणे].

दहा. मतदान केंद्राच्या ठिकाणी नेटवर्क कव्हरेज निश्चित केल्यानंतर बीएसएनएल / सेवा पुरवठाका कडे आगाऊ सिम कार्डची मागणी केली पाहिजे आणि निर्धारित क्रमांकाचे सिम कार्डस अधिकाऱ्यांना पुरविले जाईल. मुख्य निवडणूक अधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सिम कार्डचे शुल्क प्रदान करावे लागेल.

अकरा. भ्रमणध्वनी फोनकरिता किमान मर्यादा आगाऊ निश्चित केली जाऊ शकते. अधिकाऱ्यांना मतदान दिवसाच्या अगोदर अनावश्यक कॉल न करण्यासाठी काटेकोर सूचना दिल्या पाहिजेत अन्यथा रक्कम संपूर्णतया खर्च होईल.

बारा. एकदा सिम कार्ड क्रमांक नेमून देण्यात आले की क्रमांक संपर्क योजनेत समाविष्ट केले जातील.

## २.५ सी-व्हीजील ॲप

निवडणूक कालावधीच्या दरम्यान आदर्श आचार संहितेचा भंग केल्याची / खर्चाच्या उल्लंघनाची माहिती नागरिकांना कळविण्यासाठी सी-व्हिजील हे एक ऑनलाईन ॲप आहे. हे उपयोजक जागरूक नागरिकांना, आदर्श आचारसंहितेच्या / खर्चाच्या उल्लंघनाच्या घटनांचे दृश्य पाहिल्यानंतर काही मिनिटातच दक्ष नागरिकांना थेट माहिती पाहण्याची मुभा देते. त्यांना तेथील विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात धावपळ करत जाण्याची आता गरज नाही. त्यांना फक्त एक छायाचित्र काढावे लागेल किंवा व्हिडिओ चित्रण करावे लागेल, कृत्याचे वर्णन करावे लागेल आणि भ्रमणध्वनी ॲपद्वारे अपलोड करावे लागेल यामुळे भरारी पथकाला घटनास्थळी काही मिनिटातच पोहोचता येणे शक्य होईल. भरारी पथकाला वेळेत कारवाई करता यावी यासाठी, उपयोजक ॲपमधूनच केवळ स्वयंस्थानदर्शक ठिकाणाचे थेट छायाचित्र / व्हिडिओ दाखवून डिजिटल पुराव्यांची सुनिश्चिती करण्यास मुभा देत. हे उपयोजक (ॲप्लिकेशन) सतर्क नागरिकाला जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा क्षेत्र पडताळणी युनिट (भरारी पथके / स्थिर संनिरीक्षण पथके) यांच्याशी जोडते. त्यामुळे एक जलद व अचूक वृतांत कृती व संनियंत्रण प्रणाली तयार होते.

एक नागरिक छायाचित्र किंवा २ मिनिटाचा व्हिडिओ काढतो. छायाचित्र / व्हिडिओ भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे स्वयंचलित ठिकाण निर्देशनासह ॲपवर टाकला जातो. त्याच्या यशस्वी सादरीकरणानंतर, त्या नागरिकाची ओळख पटविण्यासाठी विशिष्ट ओळखपत्र व त्याच्या भ्रमणध्वनीवर अनुवर्ती अद्ययावत प्राप्त होईल.

**टप्पा १**

एकदा नागरिकाने तक्रार नोंदविली की, जिल्हा नियंत्रण कक्षात जेथे क्षेत्र युनिटला नेमून दिलेले आहे तेथे, माहिती बीप होते. क्षेत्र युनिट भरारी पथके, स्थिर संनिरीक्षण पथके, राखीव पथके इत्यादींचे बनलेले असते. प्रत्येक क्षेत्र युनिटकडे भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारित 'सी व्हिजिल' अन्वेषक नावाचे भ्रमणध्वनी उपयोजक (ॲप्लिकेशन) असेल, जे क्षेत्र युनिटला भौगोलिक माहिती प्रणाली व नौकानयन तंत्रशास्त्र व कारवाई करण्यास अनुमती देईल.

**टप्पा १**

क्षेत्र युनिटने तक्रारींवर कारवाई केल्यानंतर, क्षेत्र अहवाल, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे निर्णय व निकालासाठी अन्वेषक ॲपमार्फत ऑनलाईन पाठविला जातो. घटना बरोबर आढळल्यास, भारत निवडणूक आयोगाच्या राष्ट्रीय तक्रार पोर्टलवर पुढील कारवाईसाठी माहिती पाठवली जाते व जागरूक नागरिकाला १०० मिनिटांच्या आत त्याबद्दल कळविले जाते.

**टप्पा १**

१०० मिनिटांतील स्थितीची काळमर्यादा खाली दिल्याप्रमाणे आहे.

| **५ मिनिट** | **५ मिनिट** | **५ मिनिट** | **१५ मिनिट** | **३० मिनिट** | **५० मिनिट** |
|---|---|---|---|---|---|
| जागरूक नागरिक छायाचित्र / व्हिडिओ घेतील | नागरिक छायाचित्र / व्हिडिओ सी व्हिजिल मार्फत टाकतील | पडताळणीकरिता जिल्हा नियंत्रण कक्ष क्षेत्र युनिटकडे तक्रार करील | क्षेत्र पथक स्थळावर पोचणे | क्षेत्र युनिटाला कारवाई करणे व अहवाल सादर करणे. | निवडणूक निर्णय अधिकारी स्थिती कळविण्यासाठी वेळ घेईल. |

२.६ **वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली मार्गनिरीक्षण** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीच्या एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी (उदा. कारखान्यापासून राज्यापर्यंत, आंतरराज्यात, राज्यांतर्गत इत्यादी) कोणत्याही वाहतुकीकरिता या टोकापासून त्या टोकापर्यंत सुरक्षा शिष्टाचाराची सुनिश्चिती करून, केवळ वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली मार्गनिरीक्षण असलेले वाहन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीच्या ये-जा करण्यासाठी वापरले पाहिजे असा निर्णय घेण्यात आला आहे. वाहनांच्या वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली मार्गनिरीक्षणावर जिल्हा निवडणूक अधिकारी रोजच्या रोज लक्ष ठेवतील व मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे यादृच्छिकपणे निरीक्षण करण्यात येईल. तसेच मतदानाच्या दिवशी गरजेच्या आधारावर बदलून देण्यासाठी क्षेत्र अधिकाऱ्याने राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी वाहून नेताना हाताळणी सुव्यवस्थित करण्यासाठी, असा निर्णय घेण्यात आला आहे की :—

(क) सर्व राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाहतूक करताना रोजच्या रोज काळजीपूर्वक लक्ष ठेवले जाईल, ज्यासाठी राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी असलेली सर्व क्षेत्र अधिकाऱ्यांच्या वाहनांमध्ये वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली मार्गनिरीक्षण बसविणे अनिवार्य असेल.

(ख) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी घेऊन जात असलेले वाहनांमध्ये वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली-सक्षम /वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली मार्गनिरीक्षण आधारे भ्रमणध्वनी ॲपमार्फत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीच्या हालचालींच्या वास्तविक वेळ मार्गानिरीक्षण व निरीक्षण केले जाईल. या प्रयोजनासाठी, 'इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र नियंत्रण कक्ष' जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच मुख्य निवडणूक अधिकारी स्तरावर उभारण्यात येतील जेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि मतदान पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणीची वाहतूक वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली निरीक्षण व संबंधित माहिती तंत्रज्ञानाची पायाभूत सुविधा / आवेदन (ॲप्लिकेशन) मार्फत निरीक्षण व मार्गनिरीक्षण केले जाईल.

(ग) संबंधित राज्य / केंद्रशासित प्रदेशात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदान पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीच्या वाहतूक करताना चोवीस तास निरीक्षण ठेवण्यासाठी पाळ्या लावून 'इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र नियंत्रण कक्षात' पुरेसा कर्मचारीवर्ग नियुक्त केला जाईल.

(घ) जिल्हा निवडणूक अधिकारी नोंदणी क्रमांक व राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी घेऊन जाणाऱ्या सर्व वाहनांचा तपशील क्षेत्र अधिकाऱ्यांच्या नावासह जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्ष व निरीक्षकांना कळवेल.

(ङ) जिल्हा निवडणूक अधिकारी प्रभावी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली आधारित मार्गनिरीक्षण आणि राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीसहीत, जिल्ह्यातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणीच्या संनियंत्रणाकरिता जबाबदार असतील. मतदानाच्या दिवशी त्यांच्या वाहनातून राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी घेऊन जाताना क्षेत्र अधिकाऱ्याने काय करावे व काय करू नये :—

- क्षेत्र अधिकारी नेमून दिलेल्या ठिकाणावरून, आवश्यकता असेल तेथे, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी किंवा सुरक्षित कक्षासाठी वगळता, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी अधिकृत वाहनांबाहेर काढू नये.

- क्षेत्र अधिकारी नेमून दिलेल्या ठिकाणावरून आवश्यकता असेल तेथे निवडणुकीच्या उद्देशाने किंवा सुरक्षित कक्षासाठी वगळता, राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी घेऊन जात असलेले वाहन नेमून दिलेल्या क्षेत्र / मार्गाच्या बाहेर घेऊन जाऊ शकत नाही.

- क्षेत्र अधिकारी कोणत्याही निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराकडून किंवा राजकीय पक्षाकडून किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांकडून आतिथ्य स्वीकारणार नाहीत.

- क्षेत्र अधिकारी मतदान समाप्त झाल्यानंतर त्याच दिवशी स्वीकृती केंद्रावर राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र / मतदार पडताळणीयोग्य कागदी परीनिरीक्षण निशाणी जमा करील.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदार संघात प्रचाराच्या अतिरिक्त खर्चावर, रोख किंवा लाचेच्या भेट वस्तूंचे वितरण, बेकायदेशीर शस्त्रास्त्र, स्फोटक पदार्थ, दारू किंवा समाज विघातक घटक, इत्यादींच्या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी, स्थिर संनिरीक्षण पथके व भरारी पथकांनी वापरलेल्या सर्व वाहनांमध्ये जीपीआरएस मार्गनिरीक्षण युनिटसह बसविले जाऊ शकते/लावले, जेणेकरून पथकाने वेळेवर कारवाई केल्याचे कळेल.

# प्रकरण तीन

# संदेशवहन योजना

## ३.१ सर्वसाधारण तरतुदी

३.१.१ निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक बहुविध हितसंबंधित व्यक्तींचे योगदान समाविष्ट असते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, प्रभावी व कार्यक्षम होण्यासाठी सर्व हितसबंधित व्यक्ती यांचे समन्वय आवश्यक आहे. प्रभावी समन्वय साधण्यासाठी स्पष्ट, सर्वसमावेशक परंतु सोपी संदेशवहन योजना अपरिहार्य आहे. संदेशवहन योजना सावधपणे तयार केल्या पाहिजेत जेणेकरून, सर्व हितसंबंधित व्यक्तींचा संदेशवहनाचा मार्ग स्पष्ट होईल. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय संदेशवहन योजना हा अनुक्रमे राज्य निवडणूक व्यवस्थापन योजना व जिल्हा निवडणूक व्यवस्थापन योजनेचा अपरिहार्य भाग आहे.

३.१.२ संदेशवहन योजना तयार करण्याची व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य स्तरीय व जिल्हा स्तरीय नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. योग्य माहिती अद्यावत करणे, पायाभूत सुविधांच्या आवश्यकतेचे नियोजन करणे, योजनेचे पालन करण्यासाठी हितसंबंधित व्यक्तींना पुढील योजनेप्रमाणे प्रशिक्षण देणे, नियंत्रण कक्ष सुसज्ज करणे आणि तत्परतेने पाठपुरावा करणे, वेळेवर माहिती योग्य मार्गाने पसरवणे हे चांगल्या संदेशवहन योजनेचे अत्यावश्यक वैशिष्ट्य आहे.

३.१.३ टाकावरून संदेशवहन हे वरिष्ठांच्याकडून आलेले निदेश व सूचनांच्या स्वरुपात असतील आणि तळापासून अहवाल व विनंतीच्या स्वरुपात येतील. भारतीय निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या संबंधित पुस्तिका व सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार, निवडणूक प्रक्रियेसंबंधी महत्त्वाची माहिती विहित सांविधिक नमुन्यात सादर केली पाहिजे. निवडणूक प्रक्रियेच्या नियमित संनियंत्रणासाठी, या प्रयोजनार्थ विकसित केलेल्या सोप्या व स्पष्ट नमुन्यातील अहवाल हितसंबंधितांमध्ये सहभागी करणे आवश्यक आहे.

३.१.४ योजना तयार करत असताना सर्व हितसंबंधित व्यक्तींचे दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल इत्यादी माहिती मिळवून अद्ययावत आधार सामग्री तयार करणे आवश्यक आहे. एक सुलभ छोटी दूरध्वनी दर्शिका किंवा संबंधित हितसंबंधित व्यक्तींचा तपशील असलेली संपर्क पुस्तिका सर्व संबंधितांना उपलब्ध करून दिली जाऊ शकते. संपर्क कसा आणि कोणाशी साधू शकतो हे स्पष्ट नमूद केलेले असले पाहिजे. माध्यामांना स्पष्टपणे नमूद केले पाहिजे जेणेकरून मतदानाच्या दिवशी नेटवर्कच्या मध्ये येणारा अनावश्यक अडथळा टाळता येईल.

३.१.५ दुर्गम किंवा डोंगराळ प्रदेशात, संपर्क व्यवस्था नसलेले क्षेत्र (शॅडो क्षेत्र) व संदिग्ध क्षेत्र (ग्रे क्षेत्र) आधीच शोधून ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून अशा सर्व क्षेत्रात उपग्रहाद्वारे फोन (सॅटेलाईट फोन), बिनतारी, वॉकी-टॉकी यांसारखी संपर्काच्या पर्यायी साधनांची व्यवस्था करता येईल. या प्रयोजनार्थ पोलीस व वन विभागाच्या पायाभूत सुविधा व विशेषज्ञाचा प्रभावीपणे वापर केला जाईल. भ्रमणध्वनी अनुबंधन (कनेक्टिव्हिटी), इंटरनेट अनुबंधन (कनेक्टिव्हिटी) व अनुबंध (कनेक्टिव्हिटी) नसलेल्या क्षेत्रांचा प्रभावीपणे क्षेत्र आराखडा तयार करण्यासाठी भारत संचार निगम (बीएसएनएल) व इतर खाजगी सेवा पुरवठादारासोबत बैठका घ्यावा लागतील.

३.१.६ भारतीय निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार माहिती कधी व कुणाला उपलब्ध करून द्यायची हे देखील निश्चित करणे आवश्यक आहे. याच्या सोबत या स्वरुपाबाबत हितसंबंधितांना स्पष्टपणे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विविध संपर्काच्या संपूर्ण प्रवाहात नियंत्रण कक्ष हा महत्त्वाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. सर्व कर्मचाऱ्यांना ज्यांची नियुक्ती नियंत्रण कक्षात झाली आहे त्यांना नियमित प्रशिक्षण दिले पाहिजे.

३.१.७ सर्व निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने निरीक्षक नियुक्त केले आहेत ते निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करत आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचनांचे निरीक्षकांच्या सर्व महत्त्वाच्या दृष्टीकोनाचा सुस्पष्ट संवाद यांचे पालन होत आहे की नाही हे सतत सुनिश्चित करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाद्वारे निरीक्षकांची नियुक्ती केली जाते. निवडणूक प्रक्रियेच्या विशिष्ट कार्यांसाठी विविध नोडल अधिकाऱ्यांना भारत निवडणूक आयोगाचे विविध कायदे, नियम व सूचनांबद्दल परिपूर्ण प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रति वेदनाचे स्वरुप प्रारंभी परिचीत असणे आवश्यक आहे. नोडल

अधिकाऱ्यांमार्फत सर्व संबंधित अधिकाऱ्यांशी सतत संवाद साधला पाहिजे व नोडल अधिकाऱ्यापासून निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून भारत निवडणूक आयोगाला, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे कार्यक्षमतेने पालन करणे आवश्यक आहे.

३.१.८ भारत निवडणूक आयोगाद्वारे निर्देशित केल्यानुसार मतदान पक्षांना संदेशवहनाच्या विहित पद्धतींमार्फत विहित नमुन्यात वेळेवर अहवाल पाठविण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांना विशेषतः जेव्हा दिव्यांग व्यक्ति, वयोवृद्धांशी संबंधित मतदार असतील तेव्हा सौहार्दाची संवाद पद्धतीचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

३.१.९ माध्यमांशी संवाद साधण्यासाठी, प्रवक्ते राज्य, जिल्हा व मतदारसंघाच्या स्तरावर अधिकृत असले पाहिजेत. निवडणूक घोषणा, इत्यादींसारख्या महत्त्वाच्या घटनांवर पत्रकार परिषदा आयोजित कराव्या लागतात, अधिकृत प्रवक्त्यांद्वारे माध्यमांना संक्षिप्त माहिती नियमितपणे द्यावी लागते जेणेकरून, केवळ योग्य माहिती माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचविली जाईल. माहितीचा पुरेसा आणि योग्य प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी जेव्हा जेव्हा आवश्यक आहे तेव्हा तेव्हा, नियमितपणे व तत्परतेने प्रसिद्ध पत्रक द्यावी लागतील.

३.१.१० सुरळीत सहकार्य निष्पक्षपणे प्रक्रिया पार पाडण्यासाठी तक्रारींचे निवारण व भारताच्या निवडणूक आयोगाने दिलेल्या विविध अनुदेशांची त्यांना माहिती देऊन पक्षांमध्ये सुरळितपणे सहकार्य असल्याची, तक्रार निवारण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी राजकीय पक्षांशी नियमितपणे संवाद साधला पाहिजे. राजकीय पक्ष किंवा उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या कोणत्याही तक्रारीची तत्परतेने दखल घेतली पाहिजे व प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर विश्वास ठेवण्यासाठी कायद्यानुसार निर्णय त्यांना स्पष्टपणे कळविला पाहिजे.

३.१.११ मतदारांशी, जे निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचे हितसंबंधित आहेत, त्यांच्याशी साध्या व समजण्याजोग्या पद्धतीने वारंवार संवाद साधला पाहिजे. सक्रिय मतदारांच्या सहभागाला सक्षम करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाद्वारे प्रदान केलेल्या विविध सुविधा जसे की, सी विजिल, इत्यादींच्या नाविन्यपूर्ण पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग उपक्रमाद्वारे प्रसार करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या तक्रारींचे मदतवाहिनी हेल्पलाईन क्रमांक आणि ॲप्सच्या माध्यमातून तात्काळ निराकरण करावे लागेल. मतदारांच्या तक्रारी व सूचना हाताळण्याऱ्या लोकांना चांगल्या संवादाच्या वर्तनाने संवेदनशीलता दाखविली पाहिजे.मतदारांशी संबंध जोडण्यासाठी ट्विटर, फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, युट्यूब आणि मोठ्या प्रमाणात संदेश यांसारख्या समाजमाध्यमांचा सतत वापर करावा लागेल. वयोवृद्ध, दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी मतदारांना त्यांचा सोपवलेला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असेल.

## ३.२ संदेशवहनाचे स्तर

१. राष्ट्रीय स्तर

२. राज्य स्तर

३. जिल्हा स्तर

४. मतदारसंघ स्तर

५. मतदान केंद्र स्तर

## ३.३ हितसंबंधित व्यक्ती

| | **राज्य स्तर** | **जिल्हा स्तर** |
|---|---|---|
| १ | मुख्य निवडणूक अधिकारी (सी ई ओ) | जिल्हा निवडणूक अधिकारी (डी ई ओ) |
| २ | भारतीय निवडणूक आयोगाचा राज्य स्तरीय निरीक्षक<br>• विशेष निरिक्षक<br>• विशेष पोलीस निरीक्षक | भारतीय निवडणूक आयोग निरीक्षक<br>• सामान्य निरीक्षक<br>• पोलीस निरीक्षक<br>• खर्च निरीक्षक |

| | | |
|---|---|---|
| ३ | शासकीय प्रशासन<br>क. राज्य शासन :—<br>• मुख्य सचिव (सी एस)<br>• गृह विभागाचा सचिव<br>• पोलीस महासंचालक (डी जी पी)<br>• उत्पादन शुल्क विभाग<br>• राज्य परिवहन महामंडळ<br>• माहिती व जनसंपर्क विभाग<br>• आरोग्य व कुटुंब कल्याण<br>• वीज महामंडळ<br>• पेयजल पुरवठा<br>• शहरी/ग्रामीण विकास विभाग<br>• सार्वजनिक बांधकाम विभाग<br>ख. राज्य स्तरीय केंद्र शासन विभाग/एजन्सी :—<br>• आयकर<br>• वस्तू व सेवा कर<br>• अंमलबजावणी संचालनालय<br>• टपाल विभाग<br>• रेल्वे<br>• नागरी विमान वाहतूक-भारतीय विमानतळ प्राधिकरण<br>• सीमा रस्ते संघटना<br>• सामान्य राखीव अभियंता दल<br>• भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण | शासकीय प्रशासन<br>क. राज्य शासन :—<br>• पोलीस विभाग (वरिष्ठ पोलीस अधीक्षक/पोलीस अधीक्षक)<br>• उत्पादन शुल्क विभाग<br>• राज्य परिवहन महामंडळ/प्रादेशिक परिवहन कार्यालय<br>• माहिती व जनसंपर्क विभाग<br>• आरोग्य व कुटुंब कल्याण/मुख्य वैद्यकीय अधिकारी<br>• वीज महामंडळ<br>• पेयजल पुरवठा<br>• शहरी/ग्रामीण विकास विभाग<br>• सार्वजनिक बांधकाम विभाग<br>ख. राज्य स्तरीय केंद्र शासन विभाग/एजन्सी :—<br>• आयकर<br>• वस्तू व सेवा कर<br>• अंमलबजावणी संचालनालय<br>• टपाल विभाग<br>• रेल्वे<br>• नागरी विमान वाहतूक-भारतीय विमानतळ प्राधिकरण<br>• सीमा रस्ते संघटना<br>• सामान्य राखीव अभियंता दल<br>• भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण |
| ४ | नोडल अधिकारी<br>• नोडल अधिकारी, मनुष्यबळ व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, प्रशिक्षण व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, माल व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, वाहतूक व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, संगणकीकरण, सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान आणि वेबकास्टींग<br>• नोडल अधिकारी, पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग<br>• नोडल अधिकारी, पोलीस कायदा व सुव्यवस्था (एल & ओ) संवेदनशीलतेचे निर्देशन (व्ही एम) आणि सुरक्षा योजना<br>• नोडल अधिकारी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, आदर्श आचार संहिता<br>• नोडल अधिकारी, खर्चाचे संनियंत्रण | नोडल अधिकारी<br>• नोडल अधिकारी, मनुष्यबळ व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, प्रशिक्षण व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, माल व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, वाहतूक व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, संगणकीकरण, सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान आणि वेबकास्टींग<br>• नोडल अधिकारी, पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग<br>• नोडल अधिकारी, पोलीस कायदा व सुव्यवस्था (एल & ओ) संवेदनशीलतेचे निर्देशन (व्ही एम) आणि सुरक्षा योजना<br>• नोडल अधिकारी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे व्यवस्थापन<br>• नोडल अधिकारी, आदर्श आचार संहिता<br>• नोडल अधिकारी, खर्चाचे संनियंत्रण |

| | | |
|---|---|---|
| | • नोडल अधिकारी, इलेक्ट्रॉनिकली (इलेक्ट्रॉनिक मार्गाने) पारेषित (पाठवलेली) टपाली मतदान यंत्रणा, टपाली मतपत्रिका, मतपत्रिका<br>• नोडल अधिकारी, प्रसारमाध्यम/प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती<br>• नोडल अधिकारी, संदेशवहन योजना<br>• नोडल अधिकारी, मतदारांची यादी<br>• नोडल अधिकारी, तक्रार निवारण आणि मतदार हेल्पलाईन<br>• नोडल अधिकारी, निरीक्षक | • नोडल अधिकारी, इलेक्ट्रॉनिकली (इलेक्ट्रॉनिक मार्गाने) पारेषित (पाठवलेली) टपाली मतदान यंत्रणा, टपाली मतपत्रिका, मतपत्रिका<br>• नोडल अधिकारी, प्रसारमाध्यम/प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती<br>• नोडल अधिकारी, संप्रेषण योजना<br>• नोडल अधिकारी, मतदारांची यादी<br>• नोडल अधिकारी, तक्रार निवारण आणि मतदान हेल्पलाईन<br>• नोडल अधिकारी, निरीक्षक |
| ५ | सार्वजनिक उपक्रम : भारतीय संचार निगम लिमिटेड, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड | सार्वजनिक उपक्रम : भारतीय संचार निगम लिमिटेड, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड |
| ६ | खाजगी (भ्रमणध्वनी सेवा प्रदाता)<br>• एअरटेल<br>• जीओ<br>• वोडाफोन–आइडिया इत्यादी | खाजगी (भ्रमणध्वनी सेवा प्रदाता)<br>• एअरटेल<br>• जीओ<br>• वोडाफोन–आइडिया इत्यादी |
| ७ | प्रसारमाध्यम | प्रसारमाध्यम |
| ८ | राजकीय पक्ष/उमेदवार | राजकीय पक्ष/उमेदवार |
| ९ | नागरिक | नागरिक |
| १० | नागरी समाज | नागरी समाज |
| ११ | भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड/इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, लिमिटेड अधिकारी/अभियंता | भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड/इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, लिमिटेड अधिकारी/अभियंता |

| | विधानसभा मतदारसंघ (एसी)<br>निवडणूक निर्णय अधिकारी स्तरीय | मतदान केंद्र स्तरीय |
|---|---|---|
| १ | निवडणूक निर्णय/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी (आर ओ/ए आर ओ) | परिमंडल दंडाधिकारी/परिमंडल अधिकारी |
| २ | भारतीय निवडणूक आयोग निरीक्षक :—<br>• सामान्य निरीक्षक<br>• पोलीस निरीक्षक<br>• खर्च विषयक निरीक्षक | क्षेत्र दंडाधिकारी/क्षेत्र अधिकारी |
| ३ | परिमंडल दंडाधिकारी/परिमंडल अधिकारी | मतदान केंद्राध्यक्ष |
| ४ | क्षेत्र दंडाधिकारी/क्षेत्र अधिकारी | सर्व मतदान अधिकारी |
| ५ | राजकीय पक्ष/निवडणूक लढवणारे उमेदवार | सर्व सुरक्षा कर्मचारीवर्ग |
| ६ | प्रसारमाध्यम | मतदान केंद्र स्तरीय अधिकारी |
| ७ | मतदार | निकटतम संप्रेषण पद्धती |
| ८ | नागरी समाज | निकटतम पोलीस ठाणे/चौकी |

| | | |
|---|---|---|
| ९ | खर्च संनियंत्रण पथके :—<br>• सहायक खर्च निरीक्षक (ए ई ओ)<br>• चित्रिकरण (व्हिडिओ) संनिरीक्षण पथक (व्ही एस टी)<br>• चित्रीकरण (व्हिडिओ) अवलोकन पथक (व्ही व्हि टी)<br>• लेखांकन पथक (ए टी)<br>• तक्रार संनियंत्रण नियंत्रण कक्ष व कॉल सेंटर<br>• प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती व पैसे किंवा मोबदला देऊन प्रक्षेपित केलेल्या बातम्या<br>• भरारी पथके (एफ एस)<br>• स्थिर संनिरीक्षण पथक<br>• खर्च संनियंत्रण कक्ष | मतदार सहायता केंद्र (व्ही ए बी)/मदत कक्ष |
| १० | अनुपस्थित मतदारांकरिता मतदान गट | मतदार |
| ११ | भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड/इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड अधिकारी/अभियंता. | |

**३.४ संपर्काचे जाळे पुढील उद्देशांकरिता निवडणुकीच्या कालावधीत वापरले जाते :**

**मतदानापूर्वीचा कालावधी**—हा असा कालावधी आहे जेव्हा निवडणुकांचे नियोजन केले जाते आणि पुढील कामांसाठी संपर्काच्या जाळ्याची (नेटवर्कची) आवश्यकता आहे :

१. मतदान केंद्राच्या प्रत्यक्ष स्थितीची माहिती—क्षेत्र अधिकारी व जिल्हा महसूल अधिकाऱ्यांकडून जिल्हा व राज्य स्तरावर.

२. मतदान केंद्रावरून मतदानाच्या दिवशी जिल्हा नियंत्रण कक्षांना संबंधित मतदानाच्या प्रगतीची माहिती देण्यासाठी संपर्काच्या साधनांबाबत माहिती.

३. मतदान केंद्रापर्यंत आणि मतदान पक्षांच्या येण्याजाणाऱ्या वाहतुकीच्या संभाव्य मार्गाची माहिती.

४. स्थानिक पोलिसांकडून मतदान क्षेत्रांच्या स्थितीची माहिती.

५. क्षेत्र अधिकाऱ्यांचे त्यांच्या क्षेत्रातील मतदान केंद्राच्या संवेदनशीलतेचे मुल्यांकन.

६. मतदान केंद्रनिहाय सुरक्षा दलांच्या तैनातीसाठी प्रारूप योजना तयार करणे.

७. उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा, अवैध दारू व रोख रकमेच्या वाहतुकीचा आणि या क्षेत्रातील सर्वसाधारण कायदा व सुव्यवस्थांचा माग काढणे.

८. निवडणूक संबंधित तक्रारींची पावती, प्रत्यक्ष पडताळणी व त्यांचे निवारण.

९. मानवी संसाधनाच्या उपलब्धतेसंबंधी माहिती, निवडणुकीशी संबंधित विविध कामांसाठी तैनात करणे.

१०. मतदान केंद्रावर मतदान पक्षांना पाठवल्याची व आपापल्या मतदान केंद्रावर सुरक्षित पोहोचल्याची माहिती.

११. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकडून व उमेदवारांकडून पूर्वीच्या गुन्हेगारीबाबतची देखिल माहिती.

**मतदानाचा दिवस**—निवडणूक घेण्यासाठी पुढील बाबींकरिता विश्वसनीय संपर्क जाळ्याची (नेटवर्कची) आवश्यकता आहे :

१. अभिरुप मतदानाच्या अहवाल देणे व मतदानाची सुरुवात.

२. ठराविक अंतराने मतदानाच्या टक्केवारीचा अहवाल देणे.

३. मतदान केंद्रातील कोणत्याही आपात्कालीन परिस्थितीचा अहवाल देणे—इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा बिघाड, सुरक्षा विषयक धमकी, मतदान कर्मचारी कल्याण, इत्यादी व विलंब न करता दिलेला प्रतिसाद.

४. कायदा व सुव्यवस्थेचे दिवसभर संनियंत्रण करणे व आवश्यकता असेल तेथे योग्य सुरक्षा उपाययोजना करणे.

५. अहवाल योग्य स्तरावर देण्याकरिता मतदानाच्या दिवशी निवडणूक खर्चाचे व आदर्श आचार संहितेचे पालन केल्याचा संनियंत्रण करणे.

**मतदानानंतरचा कालावधी**—मतदान प्रक्रियेच्या पाठपुराव्यात एक चांगले संवाद जाळे ( नेटवर्क ) पुढील उद्देशांसाठी काम करते :

१. मतदान पथक मुख्यालयात परत येत असताना त्यांचे मार्गनिरीक्षण करणे.

२. मतदान पूर्ण झाल्यानंतर पुरूष व सामग्रीच्या अंतिम स्थितीवर अहवाल देणे.

३. मतदान संपल्यानंतर सांविधिक अहवाल राज्य व भारत निवडणूक आयोगाला पाठविणे.

४. मोजणी होइपर्यंत सुरक्षा कक्षाच्या स्थितीचे संनियंत्रण करणे व अहवाल देणे.

**मतमोजणी दिवस**—मतमोजणीच्या दिवशी सुरक्षित व विश्वासार्ह संप्रेषण प्रणाली आवश्यक आहे :

१. भारतीय निवडणूक आयोगाने विहित केल्यानुसार मत मोजणीच्या निकालांचा अहवाल देणे.

२. निवडणूक निरिक्षकांकडून भारत निवडणूक आयोगाला अहवाल देणे.

३. मतमोजणी सभागृहातील मतमोजणीच्या प्रक्रियेचा पाठपुरावा करणे.

४. मतमोजणीच्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीचे संनियत्रण करणे व योग्य उपाययोजना करणे.

**३.५ संदेश वहन मार्गाने माहितीचा प्रसार खालीलप्रमाणे :**

खालून वर चढत्या क्रमाने :

- सांविधिक अहवाल ( कायदा व सुव्यवस्था याचा अहवाल, आदर्श आचार संहिता, मालमत्तेचे विरुपण, खर्चाचे संनियत्रण, उमेदवारांचे नामांकन व प्रतिज्ञापत्रे, मतमोजणीचा निकाल व गुन्हेगारी पूर्वेतिहास इत्यादी. ).
- ( मतदान कर्मचारीवर्ग/सुरक्षा कर्मचारीवर्ग ) वाहतूक योजना, प्रशिक्षण योजना, अनुपस्थित मतदारांकरिता टपाली मतपत्रिका योजना ( ८०+ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती व अत्यावश्यक सेवा ), मतमोजणी योजना इत्यादी कर्मचाऱ्यांना तैनात करण्याची योजना.
- विश्लेषणात्मक अहवाल [संवेदनशील मतदान केंद्राची गंभीरता व प्रत्यक्ष स्थिती, संपर्क व्यवस्था नसलेले—संदिग्ध क्षेत्र ( शॅडो-ग्रे )]
- दैनंदिन अहवाल ( मेळावा, सभा, निवडणूक वाहने, ध्वनीक्षेपके इत्यादीना परवानगी दिली, मतदान छायाचित्र ओळखपत्र वितरण, मतदार माहिती पावती वितरण इत्यादी. ).
- अनुपालन अहवाल ( प्रथम स्तरीय तपासणी, इलेक्ट्रॉनिक मतदान तयार करणे, राजकीय पक्षांसोबत व निवडणूक लढवणारा उमेदवारांसोबत बैठका इत्यादी मतदानाच्या दिवसाचा अहवाल ).

**बल वर्धक घटक व नागरी उपाययोजना नियमपुस्तिका**

उतरत्या क्रमाने खाली :

अनुदेश, निदेश, अधिसूचना इत्यादी

**माहितीच्या प्रवाहासाठी 'एन्कोर' ॲप्लीकेशन उपाययोजनाचा वापर करणे.**

| | |
|---|---|
| **उमेदवाराचे नामनिर्देशन** | • विविध निवडणूक प्रक्रियेत वापरली जाणारी उमेदवारांची आधारभूत माहिती तयार करण्यासाठी नामनिर्देशन नमुन्याचे डिजिटलीकरण करणे. |
| **शपथपत्राचे पोर्टल (प्रवेशद्वार)** | • हे पोर्टल नागरिकांना निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी आणि त्यांची प्रतिज्ञापत्रे/शपथपत्रे पाहण्याची परवानगी देते. |
| **उमेदवारांची छाननी करणे व त्याला अंतिम रुप देणे** | • स्वीकृत केलेले/नामंजूर केलेले/ मागे घेतलेले नामनिर्देशनपत्रे चिन्हांकित करण्याची आणि नमुना ७ ला अंतिम रुप देण्याची प्रक्रिया. |
| **निवडणूक परवानगी** | • परवानगी मोड्यूल हे उमेदवार राजकीय पक्ष किंवा उमेदवाराचा कोणताही प्रतिनिधी यांना परवानगीसाठी अर्ज करू देते. |
| **वास्तविक मतदान संख्या** | • मतदानाच्या दिवशी दर दोन तासांनी वास्तविक मतदान संख्येचा अहवाल देण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने केलेले काम. |
| **निवडणूक मतमोजणी** | • मतमोजणी आणि निकाल प्रसारित करण्यासाठी फेरीनिहाय आकडेवारीची नोंद घेण्याकरिता या उपाययोजनाचा वापर करण्यात येतो. |
| **खर्च संनियंत्रण** | • खर्चाच्या ऑनलाईन उपयोजनामध्ये (ॲप्लीकेशन मध्ये) उमेदवाराने जाहीर सभा, फलके, निशाण्या, वाहन यावर केलेला खर्च आणि उमेदवाराच्या खर्चाची कमाल मर्यादा यावर लक्ष ठेवण्याची व्यवस्था करणे. |
| **निर्देश पत्रक** | • ह्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतमोजणी नंतर ज्यात निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून प्रत्येक निवडणुकीच्या तपशीलाचा समावेश असतो, असे निर्देशपत्रक ऑनलाईन भरणे शक्य होते. |

## ३.६ मतदानाच्या दिवशीच्या संसूचना

| अधिकारी | काम | माध्यम | यांना सूचना देणे |
|---|---|---|---|
| निवडणूक निर्णय अधिकारी | १. मतदान केंद्रावर मतदान पथकाचे आगमन.<br>२. अभिरुप मतदानास प्रारंभ.<br>३. अभिरुप मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे प्रतिस्थापन कोणतेही असल्यास.<br>४. अभिरुप मतदान पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष मतदानास प्रारंभ.<br>५. प्रत्यक्ष मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बदलणे, कोणतेही असल्यास.<br>६. दोन ताशी वास्तविक मतदान संख्येचा अहवाल.<br>७. मतदान शांततेत पार पडले.<br>८. मतदान बंद झाल्यानंतर/संपल्यानंतर अंतिम वास्तविक मतदान संख्येचा अहवाल.<br>९. मतदान केंद्रावरून प्रस्थान करणे.<br>१०. संकलन केंद्रावर पोहोचणे.<br>११. मतदान नोंदविलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि इतर मोहोरबंद पाकिटे जमा करणे.<br>१२. कायदा व सुव्यवस्थेची स्थिती. | (एसएमएस) लघु संदेश आणि दूरध्वनि संदेश | क्षेत्र अधिकारी |
| क्षेत्रीय अधिकारी | वरीलप्रमाणे सर्व | लघु संदेश आणि दूरध्वननी संदेश | क्षेत्रीय अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| क्षेत्रीय अधिकारी | वरीलप्रमाणे सर्व | लघुसंदेश आणि दूरध्वनी संदेश | निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक नियंत्रण कक्ष |
| निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक नियंत्रण कक्ष | वरिलप्रमाणे सर्व<br>(निरिक्षक व संबंधित पोलीस उप अधीक्षक/पोलीस अधीक्षक यांना कायदा व सुव्यवस्था अहवाल पाठविण्यात येईल.) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने एन्कोअर मधील विविध माहिती वेळोवेळी अद्यावत केली पाहिजे. | लघुसंदेश आणि दूरध्वनी संदेश/एन्कोर | जिल्हा निवडणूक अधिकारी |
| जिल्हा निवडणूक अधिकारी | वरीलप्रमाणे सर्व | लघुसंदेश आणि दूरध्वनी संदेश आणि ई-मेल इत्यादी | मुख्य निवडणूक अधिकारी |
| मुख्य निवडणूक अधिकारी | वरीलप्रमाणे सर्व | लघुसंदेश आणि दूरध्वनी संदेश आणि ई-मेल इत्यादी | भारताचे निवडणूक आयोग |
| निवडणूक निर्णय अधिकारी | जोडपत्र-४४ मध्ये (निवडणूक निर्णय अधिकारी यांची नवीनतम हस्तपुस्तिका-२०२३)मतदानाच्या दिवशी आयोगाला अहवाल सादर करण्यासाठीचे प्रपत्र.<br>• मतदानाच्या दिवशी दुपारी १:०० वाजता<br>• मतदानाच्या दिवशी मतदान संपल्यानंतर संध्याकाळी ७:०० वाजता.<br>• मतदानाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ७:०० वाजता.<br>(सर्व मतदान पथके संकलन केंद्रावर पोहोचल्यानंतर आणि सर्व मतदान केंद्राध्यक्षांच्या दैनंदिनीची छाननी केल्यानंतर). | ई-मेल/फॅक्स | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे मुख्य निवडणूक अधिकारी |

## मतदान दिवसाच्या संसूचनेचा क्रमदर्शक तक्ता



## प्रकरण चार

## तक्रार व्यवस्थापन प्रणाली

जर सार्वजनिक तक्रारी वेळेवर आणि रितसर नियमाने व्यवस्थापित करण्यात येत असतील आणि सोडविण्यात येत असतील, तर निर्भय आणि निःपक्ष निवडणुकांच्या दृष्टीने एक उत्कृष्ट 'सौम्य उपाययोजना' प्रस्थापित होऊ शकते. यामुळे मतदानाच्या दिवसातील त्रास कमी करता येईल. तसेच जाणीवपूर्वक केलेले राजकीय अपराध शक्य तितके कमी करता येतील. यासाठी चांगल्या प्रकारे सुसंरचित तक्रार व्यवस्थापन प्रणाली (सी एम एस) ची तीव्र गरज आहे. तिची अंमलबजावणी करण्यासाठी भारताच्या निवडणुक आयोगाने २५ जानेवारी, २०१९ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त' मतदार मदत कक्ष-१९५० सुरु केला आहे आणि याशिवाय ऑनलाईन तक्रारी दाखल करण्यासाठी आणि त्यांचे जलद गतीने निवारण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान उपयोजनेने (आय टी ॲप्लीकेशन) आणि मंच (प्लॅटफॉर्म) विकसित करण्यत आले आहेत.

पुढील गोष्टींची स्थापना करून वर नमूद केलेली उद्दीष्टे साध्य करण्यात येत आहेत.

**एक.** सक्रिय संपर्क केंद्र

**दोन.** २४×७ कार्यक्षम नियंत्रण कक्ष

पुढीलपैकी कोणत्याही माध्यमातून तक्रारी प्रप्त होऊ शकतात.

तक्रारीचे माध्यम

- ऑनलाईन (संपर्क केंद्राद्वारे हाताळण्यात आल्या)
  - १९५०
  - व्ही एच ए
  - सक्षम भारत निवडणूक आयोग
  - राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टल
  - ई-व्हिजिल
- प्रत्यक्ष (ऑफलाईन) (संपर्क केंद्राद्वारे हाताळण्यात आल्या)
  - ऑनलाईन
  - मेलद्ववारे
  - व्यक्तीद्वारे

संपर्क केंद्राद्वारे हाताळण्यात आल्या

## ४.१ सक्रिय संपर्क केंद्र

भारताचा निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकरी यांच्या स्तरावर सक्रिय संपर्क केंद्रे स्थापन केली आहेत. जी राष्ट्रीय संपर्क केंद्र (एन सी ओ सी), राज्य संपर्क केंद्र (एस सी सी) व जिल्हा संपर्क केंद्र (डी सी सी) म्हणून ज्ञात आहेत. ही संपर्क केंद्रे, मदत कक्ष क्रमांक १९५० वरून मतदार मदत उपयोजक, सक्षम (ई सी आय) व भारताचे निवडणूक आयोग आणि राष्ट्रीय मतदार (एन जी एस पी) सेवा-पोर्टल यांच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेली माहिती अभिप्राय, सूचना आणि तक्रारी हाताळतात जिल्हा संपर्क केंद्राच्या सक्रियतेच्या बाबतीतील विशेष प्रकरणे पुढील प्रमाणे आहेत :—

एक. मसुदा प्रकाशनाच्या दिनांकापासून एस एस आर दरम्यान मतदार यादीच्या अंतिम प्रकाशनाच्या दिनांकापर्यंत जिल्हा संपर्क केंद्र कार्यान्वित करण्यात येतील.

दोन. जिल्हा संपर्क केंद्र हे मतदान सुरु होण्याच्या दिनांकापासून मतदान समाप्त होईपर्यंत कार्यरत असेल

तीन. जर मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला जिल्हा संपर्क केंद्राची गरज आहे असे वाटत असेल तर, इतर कोणत्याही मोहिमेदरम्यान देखील जिल्हा संपर्क केंद्र कार्यान्वित करता येईल.

चार. जिल्हा संपर्क केंद्र कार्यरत नसेल तेव्हा त्या उर्वरित कालावधीत १९५० या मदत दूरध्वनी क्रमांकावरून आलेले सर्व संदेश राज्य संपर्क केंद्राला प्राप्त झाले आहेत, याची सुनिश्चिती करण्यात यावी.

### ४.१.१ मदत दूरध्वनी क्रमांक १९५० वरून प्राप्त होणारे संदेश/दूरध्वनी या बाबतीतील पहिला मुद्दा

मोफत (हेल्पलाईन) मदत दूरध्वनी क्रमांक १९५० हा निवडणूक सेवांच्या संदर्भात मदत हवी असणाऱ्या सर्व नागरिकांसाठी "संदेशाचा पहिला मुद्दा" आहे ही प्रणाली एक प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा पुरविते, ज्यात तक्रारदार (आय एफ एस सी) भारतीय वित्तीय प्रणाली संकेतांक मागू शकतो. हे संदेश (कॉल्स) (संगणक, स्कॅनर/प्रिंटर, किमान १ एम बी पी एस इत्यादींची आंतरजाल जोडणी यांनी) पूर्णपणे सुसज्ज असलेल्या संपर्क केंद्रावर प्राप्त झाले आहेत. सर्व संदेश राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टल (एन जी एस पी) वरील सौम्य कौसल्य (सॉफ्टस्किल्स) प्रशिक्षित जिल्हा संपर्क केंद्र/राज्य संपर्क केंद्र/राष्ट्रीय संपर्क केंद्र याच्या प्रतिनिधीद्वारे दूरध्वनी क्रमांक, नाव आणि इतर संबंधित तपशीलांसारख्या संपूर्ण तपशीलाशी जोडण्यात आले आहे. जर ही बाब तक्रारीशी संबंधित असेल तर, जिल्हा तक्रार केंद्र तक्रारदाराला तक्रार ओळख क्रमांक (आय डी) देईल आणि जर भ्रमणध्वनी क्रमांक नोंदणीकृत असेल, तर, राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलद्वारे तक्रारदाराला एक स्वयं लघुसंदेश पाठविला जाईल. निवडणुकीच्या कालावधीत २४×७ पारदर्शक यंत्रणेच्या सुनिश्चितीसाठी (कॉल लॉग) संदेशाचे क्रम लेख अभिलेखित केले जातात. प्रतिसादाच्या गुणवत्तेवर संनियंत्रण ठेवण्यासाठी संदेशाचे खालील प्रकारे वर्गीकरण केले जाते.

एक. (राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टल द्वारे देण्यात आली असेल असा) मतदार पडताळणी (कॉल्स) संदेश.

दोन. मतदान केंद्र तपशीलांशी संबंधित चौकशी.

तीन. निवडणुकांविषयी चौकशी

चार. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राविषयी चौकशी

पाच. मतदानाच्या दिनांकाविषयी चौकशी

सहा. ई-व्हिजिल विषयी चौकशी

सात. आदर्श आचार संहितेसंबंधी चौकशी

आठ. सादर केलेल्या अर्जाच्या सद्यःस्थितीविषयी चौकशी

### ४.१.२ मतदार हेल्पलाईन ॲप (व्हि एच ए)

हे ॲप्लिकेशन गुगल प्ले स्टोअरवर आणि आय ओ एस स्टोअर वर उपलब्ध आहे. गाऱ्हाणी आणि तक्रारी या पोर्टलवरून ऑनलाईन सादर करता येतील. नोंदणीकृत सदस्याला त्याच्या/तिच्या विश्वसनीयतेद्वारे लॉगीन करता येईल आणि मतदार यादीतील नोंदणीशी संबंधित जी कोणत्याही स्वरुपाची तक्रार असेल ती तक्रार आणि मतदान कालावधी मधील

आदर्श आचार संहितेशी संबंधित तक्रार देखील नोंदवता येईल. त्यांना घटनेचे वर्णन करावे लागेल आणि फोटो (छायाचित्र)/ व्हिडिओ (चित्रण) या स्वरुपातील माहिती ( अटॅचमेंटस्) देखील अपलोड करता येईल. आदर्श आचार संहिता आणि अनुदेशांचा सारसंग्रह इत्यादीसहीत विविध नियमपुस्तिका देखील उपलब्ध आहेत. मतदार हेल्प लाईन ॲप (व्ही एच ए) आणि सक्षम-इसीआय ॲप मार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी (पुढील कार्यवाहीसाठी) थेट राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलवर पोहचतात. मतदान कालावधीतील आदर्श संहितेच्या उल्लंघनाशी संबंधित जी कोणत्याही स्वरुपाची तक्रार असेल ती तक्रार नोंदवू शकतात. त्यांना घटनेचे वर्णन करावे लागेल आणि ते फोटो/व्हिडिओच्या स्वरुपात जोडून देखील अपलोड करू शकतात. आदर्श आचार संहिता आणि त्यासंबंधीच्या सूचनांचे सारसंग्रह इत्यादींसह विविध नियमावली देखील तेथे उपलब्ध आहेत. मतदार मदतप्रणाली ॲप आणि सक्षम भारताचे निवडणूक आयोग यांद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारी पुढील प्रक्रियेसाठी थेट राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलवर पोहोचतात.

### ४.१.३ सक्षम भारताच्या निवडणूक आयोगाचे ॲप

सक्षम भारताच्या निवडणूक आयोगाचे ॲपचा (उपयोजक) समावेश केल्याने वापरकर्त्याला मतदाना दरम्यान भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे प्रदान केलेल्या विविध सुविधा मिळण्यासाठी विकलांग व्यक्ती म्हणून त्यास स्वतःची नोंदणी करता येते. यात वापरकर्त्याला हे मतदार हेल्पलाईन ॲप प्रमाणे तक्रारी नोंदवण्याची देखील मुभा मिळते.

### ४.१.४ राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टल (एन जी एस पी)

राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावरील नागरिक, मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार, प्रसार माध्यमे आणि निवडणूक अधिकारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाने राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टल दिले आहे. हे अखंड आणि एकात्मिक मदत डेस्क-नि-संदेश केंद्र-नि-एक खिडकी प्रणाली आहे. राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलची वैशिष्टे संक्षेपात खालीलप्रमाणे :

प्रत्येक कॉल लॉगइन करण्यासाठी एकेरी स्त्रोत

प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी → जिल्हा
निवडणूक अधिकारी → मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या पर्यंत आपोआप माहिती पोचवणे.

प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी/मुख्य निवडणुक अधिकारी आणि भारताच्या निवडणूक आयोगाचे अधिकारी यांच्या सर्व तक्रारी हाताळण्यासाठी खाते उघडणे.

राष्ट्रीय मतदार सेवा आणि एरोनेट (ERONET) पोर्टलची सद्यस्थिती शोधण्यासाठी त्यांचे सखोल एकात्मीकरण,

**राष्ट्रीय तक्रार निवारण सुविधा पोर्टलमधील तक्रारींचा प्रवर्ग आणि त्या निकालात काढण्याचा कालावधी खालीलप्रमाणे.**

| अनुक्रमांक | उप-प्रवर्ग-मतदान छायाचित्र ओळखपत्र | निकालात काढण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | मतदान छायाचित्र ओळखपत्राच्या तपशीलात दुरुस्ती करण्यास होणारा विलंब | ३० दिवस |
| २ | आधारकार्ड जोडणी व्यवस्था | ३० दिवस |
| ३ | अर्जाचा नमुना नाकारणे | ३० दिवस |
| ४ | समुद्रपार नवीन मतदारांसाठी मतदान छायाचित्र ओळखपत्र तयार करण्यात विलंब | ४५ दिवस |
| ५ | नवीन मतदारांसाठी मतदान छायाचित्र ओळखपत्र तयार करण्यात विलंब | ३० दिवस |
| ६ | मतदारयादीतून नाव वगळणे | ३० दिवस |
| ७ | इतर मतदानकेंद्रावर नाव हस्तांतरित करण्यास होणारा विलंब | ३० दिवस |
| ८ | मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावरील मतदारयादीत नाव उपलब्ध नसणे. | १५ दिवस |
| ९ | स्थलांतरणानंतरही पूर्वीच्या मतदानकेंद्रावरून नाव न वगळणे | १५ दिवस |
| १० | मतदान छायाचित्र ओळखपत्र वितरित न करणे | ३० दिवस |
| ११ | खराब झालेल्या मतदान छायाचित्र ओळखपत्राचे वितरण | २१ दिवस |
| १२ | बनावट मतदारांविरुद्ध तक्रार | ७२ तास |
| १३ | मतदान छायाचित्र ओळखपत्राची दुसरी प्रत मिळण्यात होणारा विलंब | १५ दिवस |
| १४ | | |
| १५ | ई-मतदान छायाचित्र ओळखपत्र (ई-एपिक) | १५ दिवस |
| १६ | इतर | ७२ तास |

त्याचप्रमाणे, वर नमूद केल्याप्रमाणे, राजकीय पक्षांसाठी असलेल्या आणखी एक उप-प्रवर्गासाठी सर्व तक्रारी निकालात काढण्यासाठीचा कालावधी ३० दिवसांचा आहे.

**राष्ट्रीय तक्रार निवारण सुविधा पोर्टल आणि तक्रार निवारणाचा ओघ :**

राष्ट्रीय तक्रार निवारण सेवा पोर्टल निवडणूक अधिकाऱ्यांच्या तक्रारी हाताळण्यासाठी एक आंतरसंवादी बाजू प्रदान करते. राष्ट्रीय तक्रार निवारण सेवा पोर्टलच्या स्क्रीनशॉटमध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे संपर्क केंद्र आणि सर्वसाधारण सार्वजनिक तक्रार या दोन निरनिराळ्या शीर्षकाखाली प्राप्त झालेल्या तक्रारी संपर्क केंद्र आणि इतर ऑनलाईन माध्यमामार्फत नोंदवण्यात येतील.

सर्व निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी/प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारताचे निवडणूक आयोग अधिकारी हे निवडणूक व्यवस्थेचा भाग आहेत. नोंदणी झाल्यावर संबंधित वापरकर्त्याकडे प्रश्न थेट नेमून देण्यात येतील. संबंधित अधिकाऱ्याने भारताच्या निवडणूक आयोगाने ठरविल्यानुसार करारनिविष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत तक्रारींचा निपटारा करणे आवश्यक आहे. अन्यथा आपोआप त्याचे अभिवर्धन होण्याची तरतूद (ऑटो एस्कलेशन) आहे.

खालील प्रक्रियादर्शी तक्ता तक्रार नोंदणी आणि निवारण प्रक्रिया दर्शवितो.

## संपूर्ण तक्रार निवारण प्रक्रियादर्शी तक्ता



## ४.२ नियंत्रण कक्ष

निवडणुकादरम्यान अनेक समस्या उद्‌भवतात त्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयांमध्ये मतदानाच्या दिवसापर्यंत उघडण्यात आलेला नियंत्रण कक्ष सक्रिय भूमिका बजावतो. २०१८-१९ पासून आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी एक नवीन तक्रार ॲप अर्थात सी-व्हिजिल सुरू केल्यामुळे नियंत्रण कक्षाचे महत्त्व खूपच वाढले आहे.

### ४.२.१ सी-व्हिजिल :

वर नमूद केलेल्या व्यतिरिक्त निवडणुकीची अधिसूचना जारी केल्यानंतर आणि आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर, तक्रार निवारणासाठी नागरिकांकडे आणखी एक प्रभावी कालबद्ध (१०० मिनिटे) साधन आहे.

सीव्हिजिल नागरिक ॲप द्वारे तक्रार सादरीकरण

तक्रारदाराची तक्रार वैश्विक स्थाननिश्चिती प्रणालीद्वारे ताबडतोब नियंत्रण कक्षातील सी-व्हिजिल जिल्हा नियंत्रकास दर्शविण्यात येते

तपासक ॲपमार्फत नजीकच्या भरारी पथकाला ५मिनिटात जिल्हा नियंत्रकाद्वारे तपासासाठी नियुक्त केले जाते

सी-व्हिजिल तपासक ॲपद्वारे भरारी पथकाकडे तपास कारवाई अहवाल सादर करण्यासाठी ३० मिनिटे असतील

सी-व्हिजिल तपासक ॲपद्वारे भरारी पथकाकडे तपास कारवाई व अहवाल सादर करण्यासाठी ३० मिनिटे असतील

भरारी पथकाला त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी १५ मिनिटे आहेत

भारताचा निवडणूक आयोग, मुख्यनिवडणूक अधिकारी, आणि जिल्हा निवडणूक अधिकारी सी-व्हिजिल संनियंत्रकाद्वारे अहवालाचे संनियंत्रण करू शकतात

सी-व्हिजिल ॲप गुगल प्ले स्टोअर आणि ॲपल स्टोअर वरून कधीही डाऊनलोड केले जाऊ शकते. मात्र ज्या ठिकाणी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे, तेथेच ते काम करील. सी-व्हिजिलचा संपूर्ण प्रक्रियादर्शी कामाचा ओघ या तक्त्याद्वारे समजू शकतो.

सी-व्हिजिल मोबाईल ॲपमध्ये समाविष्ट असलेल्या वैश्विक स्थाननिश्चिती प्रणाली ठिकाणाशी समन्वय साधील. तक्रार नावानिशी किंवा निनावी केली जाऊ शकते. हे ॲप जागरूक नागरिकाला जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि प्रत्यक्ष तपासणी युनिट (भरारी पथक/स्थिरसंनियंत्रण चमूशी) यांच्याशी जोडेल. त्याद्वारे एक जलद आणि अचूक अहवाल कृति आणि संनियंत्रण प्रणाली तयार होते. सी-व्हिजिल हे एकच ॲप नाही तर त्यासह काम करण्यासाठी विविध कार्याधिकाऱ्यांसाठी विविध डॅशबोर्ड आहेत. जसे पहा नागरिक ॲप, जिल्हा नियंत्रक, तपासक ॲप, डिसायडर ॲप, संनियंत्रण ॲप.

## प्रकरण पाच

## सामाजिक प्रसारमाध्यमासह प्रसारमाध्यम

### ५.१ प्रसारमाध्यम-वर्धिष्णु प्रभावी साधन :

- निवडणूक व्यवस्थापनात, आयोगाने प्रसारमाध्यमांना नेहमीच महत्त्वाचा दुवा मानले आहे. प्रसारमाध्यमातील व्यक्ती हे या क्षेत्रात भारताच्या निवडणूक आयोगाचे डोळे आणि कान असतात आणि लोकशाहीच्या या उत्सवास भोवतीची सकारात्मकता तयार करण्यात मदत करू शकतात. म्हणून निवडणुका घेताना, माध्यमांपर्यंत माहिती प्रसारित करण्यासाठी आयोग, राज्य आणि जिल्हा स्तरावर एक कार्यक्षम यंत्रणा तयार करण्यात आली आहे.
- इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्या अंतर्वेशनामुळे, प्रसारमाध्यमांच्या **वाढत्या विस्तारात गेल्या काही वर्षांमध्ये शास्त्रशुद्ध** बदल होताना दिसत आहेत. सामाजिक प्रसारमाध्यमांच्या निर्देश माध्यम आता लोकशाहीचा पाचवा स्तंभ असा केला जातो. म्हणून येथे हितसंबंधितांसाठी संवाद आणि प्रचाराचे एक शक्तिशाली माध्य म्हणून उदयास येत आहे.
- प्रत्येक वेळी मुक्त, निःपक्ष, पारदर्शक, शांततापूर्ण आणि सहभागात्मक निवडणुका घेण्यात प्रसारमाध्यमे (मुद्रण, दूरचित्रवाणी, सामाजिक प्रसारमाध्यम अशी सर्व प्रकारची व्यासपीठे) सहायक व वर्धिष्णू प्रभावी ठरू शकली आहेत.

### ५.२ कायमस्वरूपी प्रसारमाध्यम कक्ष :

सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी प्रसारमाध्यम कक्ष स्थापन करण्यासाठी पुढील कर्तव्ये पार पाडावी लागतील :—

क. मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या माध्यमकक्षाद्वारे, किमान अतिरिक्त आणि संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी पदाच्या नोडल प्रसारमाध्यम अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली प्रसारमाध्यमांशी सातत्याने वर्षभर संपर्क ठेवील.

ख. राज्य/जिल्ह्यातील निवडणूक व्यवस्थापनासाठी केलेल्या मतदार जागरुकता उपक्रम व सुरू केलेल्या प्रथा, सुरू केलेले अनन्यसाधारण उपक्रम यांबद्दलच्या कथा सांगण्यासाठी स्थानिक/देशी माध्यमांशी नियमित संवाद साधला पाहिजे. विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एस एस आर), निवडणुकीची घोषणा, निवडणूक तयारी विषयक विचारविनिमय इत्यादींचा आढावा घेण्यासाठी मानीय आयोगाला भेट देणे इत्यादी महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी पत्रकार परिषद/सविस्तर सूचना व माहिती देण्याकरिता माध्यमांची सभा आयोजित करणे.

ग. निवडणुकीच्या काळात विश्लेषणासह गंभीर मुद्यांचा समावेश असलेले दैनिक वृत्तांकनाबाबत आयोगाला सहभागी करून घेणे. वृत्तांकनाबाबतची प्रतिक्रिया कोणतीही असल्यास, तिचे सुधारात्मक विश्लेषण करणे.

घ. कोणत्याही बनावट बातम्या आणि चुकीची माहिती देण्यात येत असल्यास, प्रसारमाध्यमांना चुकीच्या माहितीचा प्रसार कमी करण्यासाठी योग्य वेळेत वस्तुस्थितीजन्य तपशील पुरविणे.

ङ. संकेतस्थळ हे प्रसारमाध्यमांसाठीचा माहितीचा एक अधिकृत स्त्रोत आहे. मुख्य निवडणूक अधिकारी यांची संकेतस्थळे राज्याच्या तथ्यांची माहिती, जिल्ह्याच्या तथ्यांची माहिती, मागील निवडणुकांची आधारसामग्री, प्रसिद्धिपत्रक, प्रसारमाध्य गॅलरी, सर्वोत्तम पद्धती, विशेष संक्षिप्त पुनरिक्षणांमधील ठळख मुद्दे, प्रकाशने यांसह प्रसारमाध्यमांसाठी सर्व संबद्ध माहिती असलेला "प्रसारमाध्यमांचा कोपरा" असे शीर्षक असलेल्या विशिष्ट टॅबने अद्ययावत करणे आवश्यक आहे.

च. माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी समाजमाध्यमाच्या मंचाचादेखील विवेकपूर्ण वापर केला जावा.

छ. **इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करण्याशी** संबंधित आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम १२६(१) (ख) आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२६क तरतुदींशी आणि भारताच्या निवडणूक आयोगाच्या पेड बातम्यांवरील मार्गदर्शक तत्त्वे (मौन कालावधी, जनमत, सर्वेक्षण आणि मतदानोत्तर जनमत सर्वेक्षण याविषयीची मार्गदर्शक तत्त्वे) यांच्याशी संबंधित भारताच्या निवडणूक आयोगाच्या अनुदेशांविषयी माहिती देण्यासाठी स्थानिक प्रसारमाध्यामांसोबत कार्यशाळा आयोजित करणे.

## ५.३ निवडणुकीदरम्यान माध्यम सुविधा

- निवडणूकीशी संबंधित माहिती प्रसारित करणाऱ्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालय परिसरात माध्यम केंद्रे (एम सी एस) स्थापन करण्यात यावीत.
- माध्यम केंद्रे निवडणुकीची अधिसूचना काढल्याच्या दिनांकापासून निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत कार्यरत राहतील.
- उपायुक्त किंवा जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांची जिल्हा प्रसार माध्यम कक्षाचे प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल आणि त्यांचा संपर्क पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक पुरेशा आधीच प्रसारित करण्यात यावा.
- या प्रसारमाध्यम केंद्रामध्ये सांख्यिकी अहवालांच्या आणि मागील निवडणुकांच्या कागदपत्रांच्या प्रती, शक्य होतील तोवर, संदर्भासाठी उपलब्ध करून दिल्या जातील. मतदार, मतदान केंद्रे, आदर्श मतदान केंद्रे, कोणत्याही विशिष्ट मतदारांचे शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रम (स्वीप) हस्तक्षेप यांच्याशी संबंधित माहिती देखील प्रसार माध्यमांसोबत शेअर करण्यात यावी.

### ५.३.१ मतदानाच्या दिवशी आणि मतमोजणीच्या दिवशी माध्यम सुविधा

- भारताच्या निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी माध्यमांना जारी केलेल्या 'प्राधिकार पत्राद्वारे' मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रे यांमध्ये माध्यम प्रतिनिधींना प्रवेश देणे ही बाब निवडणूक घेण्याबाबतचे नियम, १९६१ च्या नियम ३२ व नियम ५३ (१) नुसार आहे.
- प्रसारमाध्यमांच्या संबंधात मतदान केंद्राच्या आतील मतदान प्रक्रिया व्यापून घेण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षाकडून प्रसार माध्यमांचा गटनिहाय प्रवेश करून व्यवस्थापित करण्यात येतो. तथापी मताची गोपनियता सुनिश्चित करण्यासाठी माध्यमांना मतदान कक्षाच्या जवळ जाण्याची मुभा देण्यात येऊ नये.
- निवडणुकीपूर्वी मतदान पथके पाठविताना चांगल्या छायाचित्रांची नियमित देवघेव करावी, मतदान पथके अवघड आणि दूर्गम भागातून मार्गक्रमण करतात. घरबसल्या मतदान सुविधेचा लाभ घेणारे मतदार, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील मतदार, पहिल्यांदा मतदान करणारे मतदार, दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक मतदार इत्यादींचे ध्वनिचित्रमुद्रणाचे उदाहरण म्हणून स्थानिक प्रसार माध्यमांना देव-घेव करावी.

## ५.४ समाज माध्यम : बलवर्धक

प्रसार माध्यम हे प्रसारमाध्यमांच्या विस्तृत पटाच्या शिघ्र परिवर्तनासह विकसित होणारे गतिशील क्षेत्र आहे. हे एक वास्तव आहे. विविध पारंपारिक प्रसार माध्यम व्यासपिठांचे एकत्रिकरण आणि सर्व समाज प्रसार माध्यम व्यासपीठावरील त्यांची सक्रीय उपस्थिती, ही समाज प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव आणि परिणाम सूचित करते. कार्यक्षेत्राचा स्तर राखण्यासाठी आणि त्या क्षमतेचा जास्तीत जास्त वापर निश्चितपणे करण्यासाठी, मतदार जागरुकते करिता जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी उपभोगात येणाऱ्या माहितीच्या वापरात (चुकीच्या) माहितीचा प्रसार कमी करण्याचा उपाय करणे, हे उद्दीष्ट असले पाहिजे.

## ५.५ समाज प्रसार माध्यम कक्ष

१. मतदार आणि अन्य भागधारकांसह माहिती प्रसारित करण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी समाज प्रसार माध्यमाची संबद्धता लक्षात घेऊन आयोगाने त्याच्या दिनांक ६ सप्टेंबर २०१६ रोजीच्या पत्रानुसार सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना समाज प्रसार माध्यम व्यासपीठ वापरण्याची क्षमता निर्माण करण्याचे व या प्रयोजनासाठी निपूण असलेल्या पथकाची प्रतिनियुक्ती करण्याचे अनुदेश यापूर्वीच दिले आहेत.

२. अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किंवा सह मुख्य निवडणूक अधिकारी या दर्जाचा समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकारी यांच्या संपूर्ण देखरेखीखाली काम करण्यासाठी समाज प्रसार माध्यम कक्ष असेल.

३. समाज प्रसार माध्यम कक्षाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

- समाज प्रसार माध्यमाच्या व्याप्तीची माहिती प्रसारित करणे :—

  **पोहोचणे-कळवणे-कामावर लावणे :** महत्त्वाचे निर्णय (स्वीप-Sveep) पद्धतशीर मतदार शिक्षण व

निवडणूक विषयक सहभाग याचे उपक्रम, प्रसार माध्यमांच्या व्यक्तींना माहिती देणे, राष्ट्रीय मतदार दिन विशेष संक्षिप्त उजळणी, संमेलने, कार्यशाळा इत्यादीसारख्या विशेष कार्यक्रम व उपक्रमासंबंधी मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या समाज प्रसार माध्यम व्यासपीठांवरून नियमितपणे माहिती देणे आणि ती अद्ययावत करणे, याची सुनिश्चिती करणे.

- समाज प्रसार माध्यामांच्या व्यासपीठावरून वर्षभर मतदार नोंदणी आणि निवडणूकीसंबंधित साक्षरतेवर लक्ष केंद्रित करणारी मतदार जागृती मोहिम राबवावी.
- लोकसहभागातून आशय ठरविणे : विविध ऑनलाईन स्पर्धाद्वारे सहभाग घेण्यास प्रोत्साहन देणे.




- समाज प्रसार माध्यम घटकाच्या विस्तारासाठी राज्यातील/प्रदेशातील राज्य मानसशास्त्रीय संशोधन संस्था (डिआयपी)यांच्यासोबत वृत्तपत्र माहिती विभाग, सार्वजनिक प्रसारक, आकाशवाणी (ए आय आर-All India Radio) आणि दूरदर्शन यांच्या समाज प्रसार माध्यम पथकांनी सहयोग देणे.
- मतदारांना नाव नोंदणीसाठी प्रवृत्त करण्याकरिता आणि मतदानाच्या दिवशी त्यांचे मत देण्यासाठी छोट्या ध्वनिचित्रफिती/राज्यातील आणि जिल्ह्यातील सुप्रसिद्ध व्यक्तीमत्वांशी परस्पर संवाद साधणे. प्रतिकांसह परस्पर संबंध प्रस्थापित करणे.
- मतदानपूर्व दिवस आणि मतदानाचा दिवस हे खूप मोठ्या प्रमाणात माध्यमांचे लक्ष वेधून घेत असतात. संपूर्ण प्रादेशिक व राष्ट्रीय प्रसार माध्यमे निवडणुकांबद्दलच्या बातम्या देत असतात. मतदानपूर्व दिवसाची आणि मतदानाच्या दिवसाची नवीनतम माहिती देण्यासाठी प्रमाण कार्यान्वयन पद्धती खालील तक्त्यात देण्यात येत आहे :—

| मतदानपूर्व दिवस | मतदानाचा दिवस |
|---|---|
| तयारी करण्यासंबंधीची माहिती, छायाचित्रे आणि छोट्या ध्वनिचित्रफिती देण्यात यावेत.<br><br>• कामाच्या व्यापकतेविषयी माहिती (जसे मतदान केंद्राची संख्या, निवडणूक क्षेत्र, विधानसभा मतदार संघ इत्यादी दर्शविणारी, जिल्हा आणि राज्य स्तरावरील दर्शविणारी माहिती). | जिल्हा निवडणूक अधिकारी/मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या विविध समाज प्रसार माध्यम व्यासपीठावर खालील माहिती छायाचित्रे आणि छोट्या ध्वनिचित्रफिती टाकण्यात यावेत.<br><br>• एक मानक राजशिष्टाचार म्हणून, विविध मतदान केंद्रावरील शांततापूर्ण मतदानाच्या बाबतीतील छायाचित्रे/माहिती |

| | |
|---|---|
| • मतदान पथकांना पाठवणे | • भारताच्या निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून दिव्यांग व्यक्ती आणि वृद्ध व्यक्ती यांना मदत केली जात असतानाची छायाचित्रे, महिला मतदार, पहिल्यांदाच मत देणारे मतदार, वयाची शंभर वर्षे पूर्ण केलेला शतायुषी मतदार, तृतीय पंथी मतदार इत्यादींसह विविध श्रेणीतील मतदारांचा सहभाग असणारी छायाचित्रे. |
| • दूर्गम भूभाग आणि भौगोलिकदृष्ट्या सुदूर क्षेत्रांसह विविध ठिकाणी साहित्य पाठवणे, अनन्य मतंदान केंद्र उभारणे इत्यादी.<br>• जिल्हा निवडणूक अधिकारी/मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याद्वारे कोणत्याही असल्यास त्यांच्याद्वारे बैठका घेणे.<br>• इतर संबंधित माहिती<br><br>वरील कामे सकाळी ८-०० वाजता सुरु करावी. | • मतदारांना मतदान केंद्रावर ने-आण करण्याची सुविधा चाकाची खुर्ची (व्हिल चेअर) इत्यादींसारख्या निश्चित किमान सुविधा असाव्यात.<br>• आदर्श मतदान केंद्रे, सर्व महिला केंद्रे, दिव्यांग व्यक्तींद्वारे व्यवस्थापित मतदान केंद्रे, युवकांकडून व्यवस्थापित मतदान केंद्रे.<br>• मतदान केंद्रावर शारिरीक अंतर ठेवणे, हात स्वच्छ करण्यासाठी हँड सॅनिटायझर यासारखे कोविड योग्य वर्तन करणे. (कोणत्याही सूचना असल्यास त्यानुसार व्यवस्था करणे). अशा कोविड प्रतिबंधक वर्तनाच्या व्यवस्थेवरील माहितीचे छायाचित्र.<br>• इतर कोणतेही अनन्य छायाचित्र/माहिती/ध्वनिचित्रफिती इत्यादी.<br><br>वरील कामे सकाळी ७-०० ते ७-३० वाजेपर्यंत सुरु करावीत. |

- समाज प्रसारमाध्यमाच्या अद्ययावत माहितीसह स्थानिक/प्रादेशिक माध्यमांना, प्रत्येक दोन तासांनी, नियमित अंतराने नवीनतम माहिती देण्यात यावी.
- भारताच्या निवडणूक आयोगाच्या पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूकविषयक सहभाग कार्यक्रम आणि भारताच्या निवडणूक आयोगाचा प्रवक्ता यांच्याकडील समाजप्रसार माध्यमावरील माहिती मोठ्या प्रमाणावरील प्रभाव सर्वदूर पोहोचण्यासाठी ती माहिती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचा हॅण्डल्सकडून तात्काळ पुनःप्रसारित करण्यात यावी. (Retweet)
- सर्व समाज प्रसार माध्यम माहिती, भारताच्या निवडणूक आयोगाच्या पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग कार्यक्रम आणि भारताच्या निवडणूक आयोगाचा प्रवक्ता असलेल्या समाज माध्यम (हॅण्डल्स) हाताळणाऱ्या व्यक्ती यांना जोडण्यात (टॅग करण्यात) यावी. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याशी संबंधित ट्विट @spokespersonECI आणि @ECISVEEP यांच्याद्वारे पुनर्प्रसारित करण्यात येईल.
- मुख्य निवडणूक अधिकारी यांची समाज माध्यम (हॅण्डल्स) हाताळणारी व्यक्ती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या समाज प्रसार माध्यमांच्या हॅन्डलवरुन कार्यक्रमांचे पुनर्प्रसारण/ पुनःप्रकाशन होत असल्याची सुनिश्चिती करील.

- फसव्या बातम्या आणि चुकीची माहिती यांचा प्रचार कमी करणे निवडणुकीच्या काळात फसव्या बातम्या देण्याचे प्रमाण प्रचंड वाढते. या बातम्यांनी प्रत्येकांना समान संधी देण्यात अडथळा आणल्यामुळे निर्भय आणि निःपक्ष निवडणुकांच्या संभाव्यतेवर व संचालनावर परिणाम होऊ शकतो. निवडणुकी दरम्यान अशा खोट्या बातम्यांमुळे विविध भागधारक घटकांमुळे निवडणूक प्रक्रियेसंबंधात अविश्वास निर्माण होण्याची शक्यता असते आणि काही बाबतीत कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या देखील उद्भवतात.

समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाधीन असणाऱ्या समाज प्रसार माध्यम पथकाने निवडणूक कालावधी दरम्यान समाज प्रसार माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही फसव्या बातम्यांची वेळेत आणि तात्काळ नोंद घेऊन त्यावर कारवाई निश्चित करण्यासाठी दक्ष राहावे.

एकदा निश्चित करून विश्लेषण केल्यानंतर करावयाची पुढील कार्यवाही :—

(अ) जर बातमी पूर्णपणे फसवी असेल तर : वस्तुस्थिती तपासणे आणि अचूक माहिती प्रसारित करणे. निरसनासाठी वरील मुद्दा क्रमांक (क) मध्ये नमूद केलेल्या प्रमाण कार्यचालन कार्यपद्धतीनुसार भारताच्या निवडणूक आयोगाच्या समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकाऱ्याला कळवणे.

**(ब) जर अधिकाऱ्याच्या माहितीसह मुल्यमापन करायचे असेल तर,** अडथळे नष्ट करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी द्यावयाची अंतरिम प्रतिसाद.

**(क) मूल्यमापन केल्यानंतर :—**

१. माहिती खोटी आढळून आली असेल तर : वस्तुस्थिती तपासणे आणि अचूक माहिती प्रसारित करणे. निरसणासाठी मुद्दा क्रमांक (ग) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यचालन कार्यपद्धतीनुसार भारताच्या निवडणूक आयोगाच्या समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकाऱ्याला कळवणे.

२. जर बातमी अचूक असेल तर : वस्तुतः द्यावयाचा योग्य प्रतिसाद माहिती वेळेत ओळखल्याने आणि त्यास शीघ्र प्रतिसाद दिल्याने अशा अपप्रचारामुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते.

**५.६ प्रत्येकांना समान संधी देण्याची सुनिश्चिती करणे.**

**५.६.१. समाज प्रसार माध्यमांसाठी ऐच्छिक आचारसंहिता (व्ही सी ई)**

अ. समाज प्रसार माध्यम व्यासपीठाचा गैरवापर टाळण्याकरिता आणि निवडणूक प्रक्रियेची निरंतरता राखण्यासाठी चार मूलभूत मुद्यांवर प्रमुख समाज प्रसार माध्यमांमध्ये सहमती झाली असेल तर आयोगाने समन्वयित केलेली ऐच्छिक आचार संहिता.

(व्हि सी ई) ‘आचार संहिते’ अंतर्गत समाज प्रसार माध्यम व्यासपीठाची वचनबद्धता उल्लंघनाची तक्रार नोंदविण्यासाठी उच्च प्राधान्य आणि समर्पित तक्रार निवारण वाहिनी.

शांतता कालावधीत कलम १२६ (१) (ख) अन्वये तीन तासांच्या आत नोंदविलेल्या उल्लंघनाच्या तक्रारी.

**मतदार तक्रारी आणि शिक्षण मोहिमा हाती घेणे**

ख. निवडणुकीच्या (आदर्श आचारसंहिता) कालावधीत जिल्हा आणि राज्य प्रसारमाध्यम प्रमाणन संनियंत्रण समितीला समाज प्रसार माध्यम व्यसपीठावर कोणतेही उल्लंघन झाले असल्याचे आढळून आले असेल तर, ते भारताच्या निवडणूक आयोगाच्या स्तरावरील समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

**संभाव्य उल्लंधनाची आणि संबंधित कलमांची सूची**

| कलम | संहिता | उल्लंघनाविषयी थोडक्यात |
|---|---|---|
| १२६(१) (ख) | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ | मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या तासांसह समाप्त होण्यापूर्वी ४८ तासांच्या कालावधी दरम्यान दूरदर्शनवरून चलचित्रकाच्या किंवा तत्सम उपकरणाद्वारे जनमत सर्वेक्षणासह कोणतीही निवडणुकीशी संबंधित बाब प्रदर्शित करण्यास मनाई करणे. |
| १२६(क) | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ | जनमत चाचणीचे (एक्झीट पोल) निकाल प्रसिद्ध करण्यास व प्रसारित करण्यास निर्बंध असणे. |
| १२३(२) | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ | प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेपाद्वारे भ्रष्टाचार करणे, अनुचित प्रभाव टाकणे. |
| १२३(३) | लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ | गैरवर्तणूक करणे, जनतेच्या विविध वर्गांमध्ये शत्रुत्वाची भावना वाढवण्यास प्रोत्साहन देणे. |

| | | |
|---|---|---|
| १२५ | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ | निवडणुकीशी संबंधित वर्गामध्ये शत्रुत्व वाढवण्यास प्रोत्साहन देणे. |
| १७१(ग) | भारतीय दंड संहिता | निवडणुकीमध्ये अनुचित प्रभाव टाकणे. |
| १७१(छ) | भारतीय दंड संहिता | निवडणुकीशी संबंधित खोटे विधान करणे. |
| २९५(क) | भारतीय दंड संहिता | हेतुपुरस्सरपणे आणि दुर्भावना पूर्वक कृत्ये करणे. धर्माच्या किंवा धार्मिक विश्वास यांचा अपमान करून कोणत्याही वर्गाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा हेतु असणे. |
| ४६४ | भारतीय दंड संहिता | खोटे कागदपत्र तयार करणे |
| ४७१ | भारतीय दंड संहिता | खरी कागदपत्रे म्हणून बनावट दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख वापरणे |
| ५०५ | भारतीय दंड संहिता | जनक्षोभ निर्माण करणारी विधाने |

क. समाज प्रसार माध्यमांची उल्लंघने कळविणारी यंत्रणा




समाज प्रसार माध्यमांवर उल्लंघनाची माहिती देताना पुढील गोष्टींची नोंद घेण्यात यावी

२. निवडणूक कायद्याच्या भारतीय दंड संहिता, आदर्श आचार संहिता इत्यादींच्या उद्धृत केलेल्या संबंधित तरतुदींचे उल्लंघन केले आहे. तसेच पोस्ट/ट्विट/व्हिडीओचे स्क्रीनशॉट आणि ट्रान्सक्रिप्ट यांसह (आवश्यक असेल तेथे) क्लिक करण्यायोग्य दुवे (लिंक)/यु आर एल देखील जोडण्यात येतील.

३. केलेल्या/सुरु केलेल्या कोणत्याही कायदेशीर कारवाईच्या तपशीलाची भारताच्या निवडणूक आयोगाच्या समाज प्रसार माध्यम मध्यस्थ अधिकाऱ्यासोबत देखील देवाण-घेवाण करण्यात यावी.

५.६.२. राज्य आणि जिल्हा स्तरावर घटित केलेल्या **प्रसारमाध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समित्या**. समाज प्रसार माध्यमांशी संबंधित बाबींमध्ये साहाय्य करण्यासाठी जिल्हा आणि राज्य प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीमध्ये, समाज प्रसार माध्यम तज्ज्ञांचाही समावेश करण्यात आला आहे. प्रसारमाध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समितीकडे खालील जबाबदाऱ्या आहेत.

- वर्षभर समाज प्रसार माध्यमांसह इलेक्ट्रॉनिक माध्यमामधील व वृत्तपत्र माध्यमामधील मतदानपूर्व आणि मतदानाच्या दिवशीच्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणीकरण करणे.
- भारताच्या निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पेड न्यूज प्रकरणांवर लक्ष ठेवणे आणि कारवाईचा पाठपुरावा करणे.
- कोणत्याही उल्लंघनासाठी समाज प्रसार माध्यमांसह माध्यमावर (द्वेषपूर्ण भाषण, आदर्श आचार संहिता, फसव्या बातम्या यांवर) लक्ष ठेवणे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या माध्यमाशी संबंधित तरतुदींची अंमलबजावणी करणे.

| | | |
|---|---|---|
| कलम १२६(१) (ख)-मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या तासांसह समाप्त होणाऱ्या ४८ तासांच्या कालावधी दरम्यान दूरदर्शनवरून चलचित्राच्या किंवा तत्सम उपकरणांद्वारे जनमत सर्वेक्षणासह कोणतीही निवडणूकीशी संबंधित बाब प्रदर्शित करण्यास मनाई करणे. | कलम १२६ क हे सर्व राज्यांमध्ये पहिल्या टप्प्यात मतदान सुरू करण्यासाठी निश्चित केलेल्या तासादरम्यान आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान संपण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासापर्यंत जनमत सर्वेक्षण करण्यास व त्याचे निकाल प्रसारित करण्यास मनाई करते. | कलम १२७ क- ज्या तरतुदींद्वारे निवडणूक पत्रिका, भित्तीपत्रके इत्यादीच्या मुद्रणावर व प्रकाशनावर नियंत्रण ठेवण्यात येते त्या तरतुदींद्वारे छापणाऱ्याची व प्रकाशकांची नाव व पत्ते दर्शनी भागावर असणे बंधनकारक केले आहे. |
| भारतीय दंड संहितेचे कलम १७१(छ) हे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या प्राधिकरणाशिवाय खर्च करण्यास प्रतिबंध करते. | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२५ हे निवडणुकीशी संबंधित विविध वर्गांमधील वैरभाव वाढीला लावण्याच्या अपराधाशी संबंधित आहे.<br>भारतीय दंड संहितेचे कलम १५३ क हे, धर्म वंश जन्मस्थान, निवासस्थान, भाषा इत्यादींच्या आधारावर वेगवेगळ्या गटांमध्ये वैरभाव वाढीला लावणाऱ्या अपराधांशी संबंधित आहे. | भारतीय दंड संहितेचे कलम ५०५ हे जनक्षोभ निर्माण करणारी विधाने कोणत्याही वर्गाला किंवा व्यक्तीच्या समुदायाला इतर कोणत्याही वर्गा किंवा समुदयाविरुद्ध कोणताही गुन्हा करण्यासाठी भडकवण्याच्या हेतुने किंवा ज्यांच्याकडून भडकावण्याची शक्यता आहे तो, जो कोणी कोणतेही विधान, अफवा किंवा अहवाल तयार करतो किंवा प्रसारित करतो. |

### ५.६.३ समाज प्रसार माध्यमासाठी निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्वे :

- समाज प्रसार माध्यमावरील सर्व राजकीय जाहिरातींना माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून योग्य पूर्व प्रमाणन करणे आवश्यक आहे.
- व्याख्येनुसार समाज प्रसार माध्यम इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या श्रेणीत येतो. याप्रकारे कलम १२६ (१) (ख) अन्वये समाज माध्यम व्यासपीठाद्वारे घेण्याच्या प्रचारास देखील शांतता कालावधी लागू आहे.
- समाज प्रसार माध्यमावर निवडणूक प्रचारासाठी झालेला खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या खात्यात समाविष्ट करावा.
- राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्याकरिता समाज प्रसार माध्यम संकेतस्थळांसह आंतरजालावर टाकलेल्या साहित्यावर आदर्श आचार संहिता लागू होईल.
- निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरताना आपल्या अधिप्रमाणित समाज प्रसार माध्याम खात्यांचा तपशील द्यावा लागेल.

**प्रसार माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीतील समाज प्रसार माध्यम तज्ज्ञांसाठी पात्रता निकष**

**१. जर तो/ती सरकारी अधिकारी असतील (प्राधान्यतः) तर,**

अ. उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेला.

ब. शासनाचा मा. तं. (आय टी) विभाग/कक्षसमाज प्रसार माध्यम कक्ष यांमध्ये किमान ५ वर्षे कामाचा अनुभव

**२. जर तो/ती खाजगी व्यक्ती असेल तर,**

अ. (आय टी)माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी

ब. सरकारच्या (आय टी) माहिती तंत्रज्ञान विभाग/समाज प्रसार माध्यम कक्ष यांमध्ये किमान १० वर्षे कामाचा अनुभव किंवा समाज प्रसार माध्यम व्यासपीठांची उत्तम जाण असावी.

क. पार्श्वभूमी व तटस्थतेच्या दृष्टीने पात्र.

**समाज प्रसार माध्यम तज्ज्ञाची भूमिका**

- समाज प्रसारमाध्यम मंचावर प्रसिद्ध होणाऱ्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणिकरण आणि संबंधित त्रुटी आणि तक्रारी याबाबतीत प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीस सहाय्य करणे. समाज प्रसारमाध्यम मंचावरील जाहिरातींशी संबंधित बाबींमध्ये निवडणूक कायद्यांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची सुनिश्चिती करणे.
- पेड न्यूजच्या संशयित प्रकरणांच्या बाबतीत समाज प्रसारमाध्यम मंच तपासणीमध्ये प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीला सहाय्य करणे.
- उमेदवाराने समाज प्रसारमाध्यम मंचावरील निवडणूक जाहिरातीवर केलेल्या खर्चाची प्रत, निवडणूक निर्णय अधिकारी आणि खर्च पर्यवेक्षक यांना प्रतीसह लेखा पथकाला सादर करण्यास प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीला मदत करणे.
- उल्लंघनाची नोंद करण्यासाठी प्रसारमाध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती आणि भारतीय निवडणूक आयोग समाज प्रसारमाध्यम मध्यस्थ अधिकारी यांच्यातील समन्वयाची काळजी घेणे.
- समाज प्रसारमाध्यमावरील उल्लंघनाची आणि फसव्या बातम्यांची प्रकरणे हाताळण्यात प्रसारमाध्यम प्रमाणन संनियंत्रण समितीला सहाय्य करणे.
- राज्यस्तरिय प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीचा भाग असल्याने. समाज प्रसारमाध्यमावरील जाहिरातीच्या प्रमाणनाबाबत जिल्हा व अपर/मुख्य कार्यकारी अधिकारी समितीकडून अपील निर्णय घेण्यास सहाय्य करणे आणि जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या निर्णयाविरुद्ध अपिलावर पेड न्यूजची सर्व प्रकरणे किंवा त्यांनी स्वाधिकारे दखल घेतलेल्या प्रकरणांची तपासणी करणे.

## प्रकरण सहा

## मनुष्यबळ व्यवस्थापन

### ६.१ मनुष्यबळाची लेखापरीक्षा

मनुष्यबळ लेखापरीक्षण ही एखाद्या संघटनेची/संस्थेची कामगिरी अधिक चांगली करता यावी म्हणून, मनुष्यबळाची संख्या/कौशल्ये, अनुभव या स्वरूपातील पर्याप्तता निर्धारित करण्यासाठी त्या संघटनेत/संस्थेत उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचे मूल्यमापन करण्याची अत्यावश्यक प्रक्रिया आहे.

संस्थेसाठी, आपले मनुष्यबळ सुसज्ज करण्याचे ते एक उपयुक्त साधन आहे आणि आपली ध्येय आणि उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी योग्य भूमिकांमध्ये योग्य कौशल्ये आणि अनुभव असलेले योग्य लोक त्यांच्याकडे आहेत याची त्याद्वारे सुनिश्चिती केली जाते.

## भारतातील निवडणुकांसाठी मनुष्यबळ लेखापरीक्षा ही, एक चिकित्सक प्रक्रिया असून त्यायोगे निवडणूक प्रक्रिया

**सुरळीतपणे पार पडणे आणि निवडणूक प्रणालीची एकात्मिकता राखण्यास मदत करणे यांची सुनिश्चिती होते.**

भारतातील निवडणुका ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असून निवडणूक प्रक्रियेचे कार्यक्षम व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी विविध पातळ्यांवर मोठ्या संख्येने प्रशिक्षित लोकांची आवश्यकता भासते.

निवडणुकीदरम्यान परिणामकारक मनुष्यबळ लेखापरिक्षण/ व्यवस्थापन यांसाठी काळजीपूर्वक नियोजन, दळणवळण संनियंत्रण आणि मूल्यमापन करणे आवश्यक आहे. राज्य स्तरावरील मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा स्तरावरील जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ४ ते ६ महिने अगोदर सविस्तर मनुष्यबळ लेखापरिक्षा करावी, जेणेकरून,आवश्यकतेनुसार मनुष्यबळाच्या पर्याप्ततेचे पुरेसे निर्धारण करता येईल आणि कमतरता भासल्यास, अतिरिक्त मनुष्यबळाची व्यवस्था करता येईल. अशा कामासाठी पुढील उपाययोजना टप्यांची करण्यासाठी आवश्यकता आहे.

### प्रभावी मनुष्यबळ लेखापरीक्षा

आवश्यक असलेल्या निवडणूक कार्याधिकाऱ्याच्या प्रत्येक प्रवर्गाचे निर्धारण/ निश्‍चिती करणे ;

अशा व्यक्तींच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या विनिर्दिष्ट करणे ;

एक निकोप माहितीसाठा (डेटाबेस) तयार करणे ;

विसंगती आणि कमतरता या बाबतीत त्या (माहितीचे) विश्‍लेषण करणे.

उपलब्ध मनुष्यबळाचा यथोचित वापर करण्याचे नियोजन आणि आकस्मिक परिस्थितीसाठी नियोजन.

वेळोवेळी जारी केलेल्या घटनात्मक/ सांविधिक / कार्यकारी आदेशांनुसार निवडणुका व संबंधित कार्ये करण्यासाठी आवश्यक असलेले निवडणूक कार्याधिकारी/अधिकारी यांचे वेगवेगळे वर्ग आणि त्यांची भूमिका व जबाबदारी निर्धारित करणे हा मनुष्यबळ लेखापरिक्षणातील प्राथमिक टप्पा आहे.

निवडणुकीच्या व्यवस्थापनाच्या उद्देशाने विशेषतः केंद्रीय सशस्त्र पोलीसेत बहुगुणक म्हणून त्यांच्या योगदानाच्या संदर्भात निवडणूक आयोजित करण्याच्या तरतुदीअंतर्गत नमसूचीनुसार खालील प्रवर्गातील अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे.

| अनुक्रमांक | प्रवर्ग | भूमिका व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| | | १. मध्यस्थ अधिकारी |
| १.१ | मनुष्यबळ व्यवस्थापनासाठी मध्यस्थ अधिकारी | जिल्ह्यातील मनुष्यबळाची संपूर्ण गरज, त्यांची उपलब्धा, त्याची माहिती (डेटा) मिळविणे, त्याचे विश्‍लेषण, मतदान कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि यादृच्छिकीकरण करणे, आगाऊ आणि उशिरा होणाऱ्या मतदान संचालन पथकांनी व्यवस्था करणे, यांसाठी जबाबदार आहे. |

| | | |
|---|---|---|
| १.२ | प्रशिक्षण व्यवस्थापनासाठी मध्यस्थ अधिकारी | निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी/ कर्मचारी यांची क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण, प्रशिक्षण स्थळाची व्यवस्था आणि सर्व वाहतूक व्यवस्था पाहणे, प्रशिक्षण साहित्य, त्यांचे वितरण आणि राजकीय पक्ष, उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यासाठी आवश्यकता असल्यास, प्रशिक्षण /प्रशिक्षण साहित्य आयोजित करणे. राज्यस्तरीय मुख्य प्रशिक्षण/ जिल्हास्तरीय मुख्य प्रशिक्षण यांचे व्यवस्थापन, पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी समन्वय साधने यांसारख्या जबाबदाऱ्या आहेत. |
| १.३ | साहित्य व्यवस्थापनासाठी मध्यस्थ अधिकारी | आवश्यकतेचा अंदाज बांधणे (सांविधिक) आणि आसंविधिक नमुने, पक्की शाई, मतपत्रिका आणि इतर सर्व मतदान साहित्य, इत्यादी) आणि जिल्हा स्तरावर निवडणुका घेण्यासाठी लागणारे सर्व साहित्य खरेदी करणे. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाकडून वितरित होणारे साहित्य प्राप्त करणे आणि त्यांचे वितरण करणे, यांसाठी जबाबदार. |
| १.४ | परिवहन व्यवस्थापनासाठी मध्यस्थ अधिकारी | निवडणुकींमध्ये वापर करावायाच्या सर्व प्रकारच्या परिवहनाची आवश्यकता व उपलब्धता यांचे आणि वेळेवर मागणीचे निर्धारण करणे. |
| १.५ | संगणकीकरण सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान यांसाठी मध्यस्थ अधिकारी | जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळाचे कामकाज, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचे संकेतस्थळ यासह स्थानिक बातम्या/ अपलोंडींग हे अद्ययावत करणे, अद्ययावत छायाचित्रे आणि माहिती टाकणे (अपलोड)/ जिल्ह्यात आयोगाच्या आयसीटी उपयोजकाचे कामकाज, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर प्रदान करणे, वेबकास्टसाठी तांत्रिक सहाय्य आणि व्यवस्था प्रदान करणे. |
| १.६ | पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग यासाठी मध्यस्थ अधिकारी | मतदारांची नोंदणी व निवडणुकीतील त्यांचा सहभाग वाढविण्याचे कल्पकमार्ग, पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग कागदपत्रांचे संकलन यासाठी जिल्हा पद्धतशीर मतदान शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग (स्वीप) योजना, केएपी (ज्ञान, वृत्ती, सराव) सर्वेक्षण तयार करणे राष्ट्रीय मतदार दिवस (एनव्हीडी) महोत्सव |
| १.७ | कायदा व सुव्यवस्था, संवेदन-शीलतेचे मापन (व्ही एम) आणि सुरक्षा योजना यासाठी मध्यस्थ अधिकारी | दैनंदिन कायदा व सुव्यवस्थेचा अहवाल संकलित करून तयार करणे, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या (सीएपीएफ) बाबतीत दिशानिदेशनाची व्यवस्था करून त्याद्वारे मार्गदर्शन परिवहन, फिरस्ती, निसंकेतन, इत्यादींची व्यवस्था करणे, असुरक्षितता मापन योजना तयार करणे आणि अतिसंवेदनशील मतदानकेंद्रे शोधणे, जिल्हा पोलीसांशी समन्वय साधणे. |
| १.८ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यवस्थापनासाठी मध्यस्थ अधिकारी | भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीइएल)/इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या अभियंत्याकडून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची योग्य साठवणूक, सुरक्षा, उपलब्धता आणि तपासणी सुनिश्चित करणे, प्रथम स्तरीय तपासणी, इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्राचे (इव्हीएम) अनियत संयोजन, इव्हीएम सोपविणे, पाठवणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे पुनःस्थापन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहरबंद करणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे परिवहन, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे माहिती व्यवस्थापन आणि अहवाल तयार करणे. |
| १.९ | आदर्श आचार संहितेसाठी मध्यस्थ अधिकारी | जिल्ह्यातील अधिकारी/उमेदवार/ राजकीय पक्ष/ प्रसार माध्यम, इत्यादीद्वारे आदर्श आचारसंहितेच्या सूचनांचे अनुपालन करणे. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला आदर्श आचार संहितेचा संदर्भ पाठविणे, आणि त्यांची अंमलबजावणी करणे, आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केल्यावर एटी आर पाठविणे, पहिल्या ७२ तासांसाठी प्रमाण कार्यान्वयन प्रक्रियेची अंमलबजावणी करणे आणि सी-व्हीजिल तक्रारींचा निपटारा करणे. गेल्या ४८ तासांच्या नियम प्रक्रियांची अंमलबजावणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| १.१० | खर्चाच्या संनियंत्रणासाठी मध्यस्थ अधिकारी | मध्यस्थ अधिकारी, निवडणुकीच्या अधिसूचनेपूर्वी, खर्चाच्या संनियंत्रणाच्या कामाच्या विविध पथकांमध्ये कार्यरत मनुष्यबळाला अगोदरच प्रशिक्षण देईल. निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा करणे आणि निवडणुकीची अधिसूचना काढणे या दरम्यानच्या कालावधीत सर्व जाहीर सभा/ मोर्चा राजकीय पक्ष/ संभाव्य उमेदवार यांचे प्रचार मेळे यांचे ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओग्राफी) करण्याची जबाबदारी खर्च संनियंत्रण कक्षाची असेल. व्हिडीओ सीडी/ डिव्हीडी नुसार राजकीय पक्षांनी केलेल्या अशा सर्व खर्चाची गणना कक्षाने करावी आणि राजकीय पक्षाच्या खर्चाचा अंदाज घेण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सोपवावे. विविध मोहिमेच्या वस्तु/ कार्यक्रमाची दरनिश्चिती करावी. |
| १.११ | मतपत्रिका, टपाली मतपत्रिका इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या परिणित टपाली मतपत्रिकाप्रणाली (इटीपीबीएस)साठी मध्यस्थ अधिकारी | अनुपस्थित मतदारांना मतपत्रिकांची वेळेवर वाहतूक, योग्य साठा व वितरण याची सुनिश्चिती करणे, परत आलेल्या मते नोंदविलेल्या मतपत्रिका मतमोजणीसाठी सुरक्षा कक्षात देण्याची व्यवस्था करणे, पात्र मतदारांना घरपोच मतदान, संबंधित सर्व बाबी. |
| १.१२ | समाज माध्यमांसाठी मध्यस्थ अधिकारी | निवडणूकविषयक माहिती, सूचनांच्या प्रसाराची जबाबदारी, खुलासा करणे, प्रसिद्धी पत्रक (प्रेस नोट) पत्रकार परिषदा आयोजित करणे व बातम्यांची कात्रणे) (प्रेस कटींग) सादर करणे, प्रसारमाध्यमांची माहितीशी देवाणघेवाण करणे, दैनंदिन अहवाल ठेवणे, जिल्हा प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीचे सद्स्य आणि पेड न्यूज ची प्रकरणे म्हणून काम करणे. |
| १.१३ | संपर्क/संचार योजनेसाठी मध्यस्थ अधिकारी | संपर्क/ संचार योजना तयार करणे विविध संनियंत्रण यंत्रणांची अंमलबजावणी करणे, संपर्क/ संचार शॅडो क्षेत्राची व्यवस्था करणे आणि निवडणुकीच्या दिवशी मध्येच काही दुरुस्ती उद्‌भवल्यास ती दुरुस्ती करणे. |
| १.१४ | मतदार यादीसाठी मध्यस्थ अधिकारी | विशेष सारांश संशोधन (एसएसआर) दरम्यान मतदारांची नोंदणी आणि मतदार याद्यांचे सातत्याने पुनरावलोकन करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकाऱ्याशी समन्वय साधणे, मतदान छायाचित्र ओळखपत्र (इपीआयसी) च्या वितरणावर देखरेख ठेवणे, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना आणि त्यांच्या उमेदवारांना मतदार याद्यांची चिन्हांकित प्रत पुरविणे आणि वर्णक्रमिक मतदार सहाय्य केंद्रांची (व्हीएबी) उपलब्धता करणे. मतदार याद्या/ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याशी संबंधित सर्व बाबी. |
| १.१५ | तक्रार निवारण आणि तरदार हेल्पलाईन मध्यस्थ अधिकारी | राष्ट्रीय तक्रार सेवा पोर्टलवर नोंदवलेल्या तक्रारींचा वेळेत निपटारा करणे, त्यांचे निवारण करणे याबाबतची सुनिश्चिती करणे, मतदार सहायता 1951 वर प्राप्त दूरध्वनी संदेश घेणे आणि त्यांचा निपाटारा सुनिश्चित करणे. |
| १.१६ | निरीक्षकांसाठी मध्यस्थ अधिकारी | आगमन, प्रस्थान, राहण्याची व मुक्कामाची व्यवस्था संपर्क अधिकारी व्यवस्था यांवर लक्ष ठेवणे, सर्व (निरीक्षकांसाठी वाचन साहीत्य, वाहतूक, सुरक्षा, दूरध्वनी, जोडणी, संगणक, प्रिंटर, इत्यादी. |
| २. | मतदान केंद्राध्यक्ष/ मतदान अधिकारी | मतदान केंद्रावर निवडणूक पार पाडणे. |
| ३. | सूक्ष्म निरीक्षक | निवडणूक प्रक्रियेच्या सचोटीवर लक्ष ठेवण्याच्या आणि मतमोजणी प्रक्रियेचे निरिक्षण करण्याच्या दृष्टीने अतिसंवेदनशील मतदारसंघ म्हणून ओळखल्या गेलेल्या भागातील निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करणे. |

| | | |
|---|---|---|
| ४. | क्षेत्र अधिकारी/दंडाधिकारी | पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूकविषयक सहभाग (स्वीप) असुरक्षिततेचे मापन, मार्ग योजना, आदर्श आचार संहिता (एमसीसी) दंडाधिकारविषयक कार्ये यांसह मतदार संघातील निश्चित भौगोलिक क्षेत्र/खंड यांमध्ये निवडणूक आयोजित करणे आणि समन्वय साधणे. |
| ५. | सहायक खर्च निरीक्षक | खर्च निरिक्षकास सहाय्य करणे आणि भरारी पथक (एफएसटी), स्थैतिक संनिरीशिक्षक (एसएसटी), व्हिडिओ संनिरीक्षण पथक (व्हीएसटी), चित्रिकरण अवलोकन पथक (व्हीव्हीटी) प्रसारमाध्यम प्रमानन व संनियंत्रण समिती (एमसीएमसी), इत्यादींवर देखरेख ठेवणे. |
| ६. | ध्वनि चित्रमुद्रण संनिरीक्षण पथक | निवडणुकीच्या काळात खर्च आणि आदर्श आचार संहिता (एमसीसी) च्या पैलुंशी संबंधित संवेदनशील राजकीय कार्यक्रम आणि सार्वजनिक मेळावे यांमधील महत्त्वाच्या गोष्टी टिपणे. |
| ७. | ध्वनिचित्रमुद्रण अवलोकन पथक | ध्वनिचित्रमुद्रण संनिरीक्षण पथकाने टिपलेल्या ध्वनिचित्रमुद्रणामधून राजकीय पक्ष/ उमेदवाऱ्यांचे आदर्श आचार संहिता आणि खर्चाशी संबंधित पैलू ओळखणे. |
| ८. | लेखांकन पथक | शॅडो निरीक्षण नोंदवही आणि पुराव्यांची संचिका (फोल्डर) तसेच इतर खर्च आणि आदर्श आचार संहितेसंबंधित बाबींची देखरेख करणे. |
| ९. | नियंत्रण कक्ष पथक | जनता, प्रासरमाध्यमे, स्वसंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी, इत्यादींनी ठळकपणे निदर्शनास आणून दिलेले आणि निवडणूक व्यवस्थापन पथके यांच्यात समन्वय साधणे. |
| १०. | प्रसार माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण, समिती | प्रसारमाध्यमांमधील राजकीय घटकांवर लक्ष ठेवणे, प्रमाणित करणे आणि पेड न्यूजच्या बाजूवर नियंत्रण ठेवणे. |
| ११. | भरारी पथके | आदर्श आचारसंहितेशी संबधित तक्रारींची दखल घेणे आणि आचारसंहितेच्या तरतुदींच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे. |
| १२. | स्थैनिक संनिरीक्षण पथक | निवडणूक कालावधीदरम्यान आचारसंहितेची अंमलबजावणी पूर्वनियोजित ठिकाणी सुनिश्चित करणे. |
| १३. | खर्च संनियंत्रण कक्ष | खर्च देखरेख मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यपद्धती यांचा समन्वय साधण्यासाठी लेखा प्रक्रियेची माहिती असलेले वरिष्ठ जिल्हा अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखालील एक युनिट. |
| १४. | वितरण केंद्रे, सुविधा केंद्रे संकलन केंद्रे येथे कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी | मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान संचलन पथकांना सहित्य वाटपाच्या वेळी प्रक्रिया सुरळीत पार पाडणे, मतदान पूर्ण झाल्यावर मतदान पथकांकडून संकलन केंद्रावर मतदान साहित्य प्राप्त निवडणूक कर्मचाऱ्यांकडून निर्धारित दिनांकास टपाली मतपत्रिका आणि यांची सुनिश्चिती करणे. |
| १५. | तज्ज्ञ परिक्षक | निवडणूक प्रक्रियेचे ज्ञान असलेले वरिष्ठ अनुभवी अधिकारी विविध प्रवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यरत आसणे. |
| १६. | पोलीस कर्मचारी (राज्य पोलीस दल आणि राज्य सशस्त्र पोलीस दल) | आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी, कायदा व सुवव्यवस्था राखणे, मतदान कर्मचारी व साहित्य असुरक्षिततेची सुरक्षा निश्चिती आणि चिकित्सक विश्लेषण, इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| १७. | गृहरक्षक (होमगार्ड), औद्योगिक सुरक्षा दल, सामाजिक वनीकरण रक्षक, सीमा शुल्क आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागासह राज्यात पोलासां व्यतिरिक्त इतर उपलब्ध असलेली दले. | आदर्श आचार संहितेची अंमलबाजावणी, पथकासोबत समुपयोजन करणे आणि गरज भासल्यास, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर सुव्यवस्था राखणे. |
| १८. | मतमोजणी पर्यवेक्षक व सहायक | निर्देशित केंद्रामध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार मतदान झाल्यानंतर मतमोजणीची सुनिश्चिती करणे. |
| १९. | मतदार सहायक बूथ कर्मचारी | मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान केंद्राचा योग्य अनुक्रमांक शोधून देण्यासाठी त्यांना सहाय्य करणे आणि अशक्त वृद्ध किंवा दिव्यांग मतदारांना मदतीची आवश्यकता असल्यास त्याबाबतीत सहाय्य करणे. |
| २०. | डिजीटल/ व्हीडीओ कॅमेरा पर्यवेक्षक | प्रचाराच्या वेळी राजकीय स्वरुपाच्या घटना अचूकपणे टिपणे, आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनांच संनिरीक्षण करणे, नियंत्रण कक्ष आणि खर्च व्यवस्थापन पथकांशी समन्वय साधणे आणि मतदानाच्या दिवशी घडलेल्या घटनांचे (रेकॉर्डींग) अभिलेखन करणे. |
| २१. | बूथ स्तरीय अधिकारी | निकोप आणि निर्दोष मतदार यादीचे व्यवस्थापन, पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग फक्रम, मतदान केंद्र सहाय्य मतदार पावती (स्लीप) वितरण, इत्यादी. |
| २२. | वेबप्रसारण (वेबकास्टींग) संनियंत्रण आणि सहाय्य कर्मचारी. | मतदानाच्या दिवशी लक्षात आलेल्या कोणत्याही उल्लंघनासाठी अन्योन्य संदर्भ किंवा अन्योन्य तपासणी याबंद्दलच्या सर्व घटनांची नोंद करण्यासाठी मतदान पूर्ण होईपर्यंत सतत अति संवेदनशील मतदान केंद्रावर मतदानाची कार्यवाही पूर्ण करणे. |

**अंमलबजावणी पथक**

**भरारी पथक (एफएस)**

- प्रत्येक विधानसभा मतदारसंघात क्षेत्रातर्गत तीन किंवा अधिक समर्पित भरारी पथक असतील, जी बेकायदेशीर रोख व्यवहार किंवा मद्य वितरण किंवा मतदारांना लाच दिल्याचा किंवा वापरल्याचा संशय असलेल्या इतर कोणत्याही वस्तूंचा मागोवा घेतील.
- फिरत्या पथकांमध्ये पथकाचा प्रमुख म्हणून एक कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस ठाण्याचा एक वरिष्ठ पोलीस अधिकारी, एक ध्वनिचित्रमुद्रक (व्हिडिओग्राफर) आणि ३ ते ४ सशस्त्र पोलीस कर्मचारी असतील.
- त्यांना एक समर्पित वाहन, भ्रमणध्वनी दिले जावेत तसेच रोख रक्कम किंवा वस्तु जप्त करण्यासाठी आवश्यक असलेला व्हिडीओ कॅमेरा आणि आवश्यक पंचनामा कागदपत्रे दिले जावेत.

**स्थैनिक संनिरीक्षण पथक (एसएसटी)**

- प्रत्येक विधानसभामतदान संघाअंतर्गत तीन किंवा अधिक निरीक्षण पथके असतील. प्रत्येक पथकात एक दंडाधिकारी आणि तीन किंवा चार पोलीस कर्मचारी आणि प्रत्येकाला एक ध्वनीचित्रमुद्रक (व्हीडिओग्राफर) असेल.
- हे पथक तपासणी ताके लावील आणि त्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, अवैध मद्य कोणतीही संशयास्पद वस्तु किंवा शस्त्रे यांच्या हालचालीवर लक्ष ठेवील.
- तपासणीच्या संपूर्ण प्रक्रीयेचे ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओग्राफी) केले जाईल.

**शीघ्र कृती दल / पथक (क्युं आर टी)**

- निवडणुकी दरम्यान विशेष प्रशिक्षित आणि अत्याधुनिक शस्त्रे आणि कोणत्याही दहशतवादी/ हिंसक परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित इतर सामग्रीने सज्ज असलेल्या कमांडोंचा समावेश असलेली शीघ्र कृती पथके कठोर कायदा व सुव्यवस्था/ ओलीस ठेवलेला/ दहशतीचा सामना करण्यासाठी स्थानिक पोलीस/केंद्रींय सशस्त्र पोलीस दल यांना मदतीस तैनात केले जावे.

**६.२ सूक्ष्म निरीक्षक**

नागरी उपाययोजनांपैकी एक उपाय म्हणून मतदानाच्या दिवशी अतिसंवेदनशील मतदान केंद्रासाठी सुक्ष्म निरीक्षकाची नेमणूक केली जावू शकेल. आयोगाचे असे निदेश आहेत की, सुक्ष्म निरीक्षकांच्या नियुक्त्या आणि त्यांच्या तैनाती खालीलप्रमाणे कराव्यात :

(अ) **कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग :** सूक्ष्म निरीक्षक म्हणून नेमणुकीसाठी खालील प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचा विचार केला जाईल :

- भारत सरकारचे/केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांचे गट-क पेक्षा खालील दर्जा नसलेल्या सेवारत अधिकाऱ्यांना, त्यांच्या निवासस्थानाच्या जिल्ह्यातील मतदान केंद्रावर सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्त केले जावू शकेल. तथापि, त्यांचा वापर त्यांच्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघ/खंडामध्ये करू नये.

- भारत सरकार आणि राज्य सरकारचे गट क दर्जापेक्षा खालील दर्जा नसलेल्या, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना त्यांच्या निवासस्थानाच्या जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्त केले जावू शकेल. तथापि, त्यांचा वापर त्यांच्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघात क्षेत्रामध्ये करू नये. अशा व्यक्तींची यादी जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी अगोदर तयार करावी आणि त्यांची उपलब्धता, योग्यता आणि इच्छा निश्चित करावी.

- इतर राज्यांतून आणलेले, गट क दर्जापेक्षा खालील दर्जा नसलेल्या राज्य सरकारच्या सेवेतील सेवारत अधिकाऱ्यांना सुद्धा सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्त करता येईल. त्यासाठी वाहतूक व्यवस्था आणि जमवाजमव आवश्यक असल्याने, क्वचित प्रसंगीच यास पूर्ववत करावे.

(ब) स्वयंसेवक सूक्ष्म निरीक्षक असणे :

- राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि भारत बालवीर आणि वीरबाला/(बालवीर व वरिष्ठ वीरबाला) यांचे सदस्य/ कार्यक्रम अधिकारी/समन्वयक यांना सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्त केले जावू शकेल. मुख्य निवडणूक अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकारी संपर्क साधून त्यांच्या तैनातीची तपशीलवार कार्यपद्धती ठरवू शकतील आणि तशी प्रस्तावित करू शकतील.

- कोणत्याही स्वंयसेवी संस्थेशी निगडित नसलेल्या, अनुभव आणि सचोटी असलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींमधून वैयक्तिक स्वयंसेवकांना आयोगाच्या स्पष्ट मान्यतेने सूक्ष्म निरीक्षक म्हणून नेमणुकीसाठी विचारात घेण्यात यावे.

(क) या प्रयोजनासाठी माहितीसाठी (डेटाबेस) तयार करणे :

जिल्हा निवडणूक अधिकारी (डीईओ), जिल्ह्यातील भारत सरकारच्या आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांचा सर्व माहितीसाठा तयार करील, ह्यात मतदान यादीतील नाव, पदनाम, संघटना मतदार यादीतील तपशील आणि मतदान छायाचित्र ओळखपत्र क्रमांक असेल. याशिवाय, आणखी, सूक्ष्म निरीक्षकाचा टपाल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक आणि ई-मेल आयडी यांचाही त्या डेटाबेसमध्ये समावेश करण्यात यावा. सूक्ष्म पर्यवेक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी जिल्ह्यात भारत सरकार किंवा केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम यांच्या कर्मचाऱ्यांची पर्याप्त संख्या नसल्यास, अशा परिस्थितीत जिल्हा निवडणूक अधिकारी हा, विभागीय आयुक्त/ मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या मदतीने, शेजारच्या जिल्ह्यामध्ये नियुक्त केलेल्या भारत सरकारच्या किवा केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम कर्मचारी यांचा माहितीसाठा (डेटाबेस) मिळवील.

| | | |
|---|---|---|
| अशा सर्व अधिकाऱ्यांचा माहितीसाठा (डेटाबेस) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून सर्व आवश्यक तपशीलासह तयार केला जाईल. | निरीक्षकाशी विचारविनिमय करून जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे मतदान केंद्राच्या असुरक्षिततेचे मापन करून नुसार सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. | सूक्ष्म निरीक्षकाचे समन्वय आणि वाहतूक आनुषंगिक व्यवस्था यांसाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून मध्यस्थ अधिकारी नेमण्यात येईल. |
| सूक्ष्म निरीक्षकासाठी निवडणूक कर्तव्यावर प्रत्येक दिवसासाठी प्रत्येक दिवसासाठी रु १,००० रुपये मानधन | निरीक्षक सूक्ष्म निरीक्षकाला प्रशिक्षण देईल. | निरीक्षकाच्या उपस्थितीत यादृच्छिकीकरण केल्यानंतर सूक्ष्म निरीक्षकांना मतदान केंद्रांचे वाटप करण्यात येईल. |

## ६.३ सूक्ष्म निरीक्षकांसाठी तपासणीसूची

| अनुक्रमांक | मुद्दा | शेरा |
|---|---|---|
| १. | मतदान केंद्रावर दिव्यांगांसाठी रॅम्प, पिण्याचे पाणी, पुरेसे फर्निचर, योग्य प्रकाश योजना/ वीज व्यवस्था, योग्य फलक, स्वच्छतागृहे, सावलीसाठी मंडपाची व्यवस्था इत्यादी यांसारख्या आश्वासित किमान सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| २. | सूक्ष्म निरीक्षकाच्या उपस्थितीत अभिरूप मतदान घेण्यात आले किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ३. | नियंत्रण युनिटकडील अभिरुप मतदानाची माहिती निरंक केली आणि व्ही व्ही पॅटमधून सर्व पावत्या (स्लीप) काढून काळ्या लिफाफ्यात टाकण्यात आल्या आणि अभिरुप मतदानानंतर, आणि प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील गणनांक शून्य करण्यात आला किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ४. | मतदानाच्या वेळी किती मतदान प्रतिनिधी आणि कोणत्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते किंवा कसे ? | होय किंवा नाही आणि संक्षिप्त तपशील. |
| ५. | मतदान केंद्रात एकाच राजकीय पक्षाचे कोणत्याही वेळी एकापेक्षा अधिक मतदान प्रतिनिधी उपस्थित होते काय किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ६. | मतदान प्रतिनिधींना, मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट आणि हिरवे पेपर सील यांचे अनुक्रमांक नोंदविण्याची परवानगी दिली किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ७. | मतदानाची गोपनीयता राखण्याच्या दृष्टीने मतदान कक्षाची योग्य प्रकारे रचना करण्यात आली होती किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ८. | प्रवेश पास प्रणालीची योग्य अंमलबजावणी झाली किंवा कसे ? मतदान केंद्रात कोणत्याही वेळी अनधिकृत व्यक्ती आली होती किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ९. | पक्क्या शाईचे निशाण योग्य प्रकारे लावण्यात आले किंवा कसे? | होय किंवा नाही |
| १०. | मतदार नोंदणीत ओळखपत्र कागदपत्राचा तपशील काटेकोरपणे भरला होता किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| ११. | (अ) टपाली मतपत्रिकां देण्यात आलेल्या मतदारांची माहिती मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान मतदान प्रतिनिधी यांच्याकडे उपलब्ध होती किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| | (ब) आधीच टपाली मतपत्रिका देण्यात आलेली एखादी व्यक्ती पुन्हा प्रत्यक्ष मतदान करताना दिसली किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| | (क) निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्राच्या आधारे एखादया व्यक्तींने मतदान केले आहे किंवा कसे ? | होय किंवा नाही |

| | | |
|---|---|---|
| १२. | मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत वेळोवेळी घटनांची नोंद होत होती किंवा कसे ? | होय किंवा नाही |
| १३. | मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी कोणत्याही सबळ कारणाशिवाय मतदान केंद्राकडे जात होते किंवा मतदारांना गैरवाजवी सूचना देत होते किंवा कसे? | होय किंवा नाही |
| १४. | भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत व्यक्तींच्या यादीतील मतदारांची छाननी मतदान केंद्राध्यक्षाने काटेकोरपणे केली होती किंवा कसे? | होय किंवा नाही |
| १५. | सूचनेनुसार मतदान यंत्रे मोहरबंद करण्यात आली होती किंवा कसे? | होय किंवा नाही |
| १६. | नमुन्या १७ क मध्ये नोंदवलेल्या मतांच्या हिशोबाच्या प्रती मतदान प्रतिनिधीला देण्यात आल्या होत्या किंवा कसे? | होय किंवा नाही |
| १७. | मतदान प्रतिनिधी, निवडणूक प्रतिनिधी किंवा कोणताही राजकीय पक्ष यांच्या कोणत्याही तक्रारी आल्या होत्या किंवा कसे? होय असेल तर त्यांचा संक्षिप्त सारांश | होय किंवा नाही |
| १८. | निदर्शनास आणून देणे आवश्यक वाटेल अशी अन्य कोणतीही घटना किंवा प्रश्न ? | होय किंवा नाही. |

## ६.४ राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध विभागांकडून मिळणाऱ्या मानवी स्त्रोतांचा वापर करून पोलिसांचे सामर्थ्य वाढवणे.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी, आदर्श आचार संहितेचे संनियंत्रण करण्यासाठी, खर्चाचे संनियंत्रण करण्यासाठी आणि निवडणुकांशी संबंधित इतर कर्तव्यांसाठी पोलिसांशी संबंधित मनुष्यबळाची प्रचंड गरज लक्षात घेता, विशिष्ट सुरक्षा/ सुव्यवस्था राखण्यासाठी विशेषतः नियुक्त केलेल्या इतर संस्थांमधील मनुष्यबळाचा वापर निवडणूक काळात राज्य पोलिसांना पाठिंबा देण्यासाठी केला जाणे महत्वाचे आहे जेणेकरून पोलिसांना कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या आणि आदर्श आचार संहितेच्या विनियमांच्या प्राथमिक जबाबदारीसाठी स्वतःला वाहून कर्तव्य बाजावता येईल. मतदानाच्या दिवशी आणि मतदानापूर्वी केंद्रीय निमलष्करी दलाकडे (सीएएमएफकडे) विशिष्ट कामे असल्याने आणि उपलह्धता मर्यादित असल्याने पोलीस आणि प्रशासनाच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही गणवेशधारी दलाचा जास्तीत जास्त वापर करणे महत्वाचे आहे. असे अतिरिक्त दल पुढील प्रवर्गाचे असू शकतात :—

| अनुक्रमांक | प्रवर्ग | कार्ये व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| १. | नव्याने भरती झालेले पोलीस | नव्याने भरती झालेल्या पोलीस दलाला तैनात करण्याक्षम बनवण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येईल. |
| २. | राज्य मार्ग, परिवहन महामंडळाच्या बस चालकांचा वापर | मतदानाच्या दिवसाच्या दोन किंवा तीन दिवस अगोदर बसचालकांना कामावर लावण्यात येईल आणि पोलीसांच्या वाहनांवरील नियमित पेलीस चालकांऐवजी त्यांचा वापर करता येईल. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मतदान केंद्रे आणि अनुषंगिक पथकांवर अशाप्रकारे पोलीस कर्मचारी तैनात केले जाऊ शकतात. |
| ३. | वनरक्षकांचा वापर : | वन विभागाच्या सामाजिक वनीकरण विभागातील वनरक्षकांना प्रशिक्षण देऊन पोलीस शिपायांच्या बरोबरीने तैनात केले जाऊ शकते. |
| ४. | होमगार्डचा वापर : | तिजोरी (चलन पेटी)/ शासकीय कोषागार, इत्यादी ठिकाणी तैनात असलेल्या सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांच्या जागी मतदानाच्या दोन ते तीन दिवस अगोदर सशस्त्र होमगार्ड तैनात केले जाऊ शकतात. त्यामुळे पदमुक्त झालेल्या सशस्त्र पोलीसांचा वापर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केला जाऊ शकतो. |

| | | |
|---|---|---|
| ५. | औद्योगिक सुरक्षा दलाचा वापर : | खनिज तेल व नैसर्गिक वायू महामंडळामध्ये ( ओएनजीसी ) किंवा अशा अन्य संस्थांमध्ये औद्योगिक सुरक्षेसाठी तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्यांऐवजी औद्योगिक सुरक्षा दलाचे जवान तैनात केले जाऊ शकतात. |
| ६. | खाजगी सुरक्षा रक्षकांचा वापर | मोठ्या खाजगी शुद्धीकरणशाला (रिफायनरी), इत्यादींच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या तुकड्यांचे (जर राज्यात असतील तर) खाजगी सुरक्षा आणि त्यांच्या तुकड्या तैनात करून त्यांच्या ऐवजी नेमले जाऊ शकतात जेणेकरून कार्यमुक्त झालेल्या सुरक्षारक्षकांचा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वापर केला जाऊ शकेल. |
| ७. | राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक / राष्ट्रीय छात्र सेना / पीआरडी (प्रांतीय रक्षक दल)/ ग्राम प्रहारी यांचा वापर : | मतदान केंद्रावरील रांगा सांभळण्यासाठी त्यांचा वापर केला जाऊ शकतो. |
| ८. | सीमाशुल्क आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षकांचा वापर : | इतर मनुष्यबळ उपलब्ध नसेल तर, हे केवळ शेवटचा उपाय म्हणून केले जाऊ शकते. त्यांना मतदान केंद्रांच्या गटाचे प्रभारी बनवले जाऊ शकते आणि फिरते म्हणून वापरले जाऊ शकते. |

* ग्राम रक्षक दल / ग्राम प्रहरी/ प्रांतीय रक्षक दल किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक दल, इत्यादीसारखे स्वयंसेवी दल / अभिकरण (एजन्सी) / मंडळाच्या कोणत्याही सदस्याची नेमणूक फक्त आयोगाची पूर्वपरवानगी घेतल्यानंतरच करता येईल.

# प्रकरण सात

## मनुष्यबळ क्षमता उभारणी

मुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण रीतीने निवडणूक पार पाडण्यासाठी वापरण्यात येणारे किंवा नियोजित मनुष्यबळाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सक्रियपणे पार पाडण्यासाठी निवडणूक मुक्त आणि निष्पक्ष रीतीने पार पाडण्यासाठी संबंधित कौशल्ये, क्षमता, ज्ञान विकसित करण्याची आणि वाढविण्याची प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या बिगर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल गुणक ( नॉन सीएपीएफ फोर्स मल्टिप्लायर्स ) म्हणून काम करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करताना अनेकदा यासंबंधातील महत्वाची माहिती/तपशील यांसह सर्व स्तरावरील कर्मचाऱ्याचा काटेकोरपणे समावेश करून केले पाहिजे. बिगर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल गुणक ( नॉन सीएपीएफ फोर्स मल्टिप्लायर्स ) म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या खालील बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत :

| | |
|---|---|
| प्रशिक्षण प्रक्रियेत समन्वय, व्यवस्था आणि संनियंत्रण करण्यासाठी राज्य पोलीस आणि राज्य सशस्त्र पोलीस यांसह बिगर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल गुणक ( नॉन सीएपीएफ फोर्स मल्टिप्लायर्स ) म्हणून संबंधित विविध भागधारकांना प्रशिक्षणासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. | प्रशिक्षणांवर योग्य / प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी नोडल अधिकारी पुरेसा सेवाज्येष्ठ आसावा. राज्य पोलिसांसाठी महानिरीक्षक दर्जापेक्षा कमी नसेल अशा नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करू नये. |
| तयार करण्यात आलेल्या प्रशिक्षण साहित्याचा आशय प्रमाणित असावा, त्यात हस्तपुस्तिका, पॉकेट बुक, फ्लायर्स, तपासणी सूची. इत्यादी, साहित्याचा समावेश असावा आणि तो गरजेवर आधारित असावा. | वैधानिक आणि इतर कार्यकारी बाबी समजावून सांगणारे संदर्भ साहित्य देखील तयार केले पाहिजे आणि सर्व संबंधित कर्तव्ये व जबाबदाऱ्या योग्यरीत्या समजाव्यात यासाठी वितरित केले पाहिजे. |

बिगर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल गुणक ( नॉन सीएपीएफ फोर्स मल्टिप्लायर्स ) पुढील बाबींमध्ये प्रशिक्षण देण्यात यावे :

### ७.१ प्रशिक्षणाचे विषय

| | | | |
|---|---|---|---|
| संवेदनशील क्षेत्र रेखांकन आणि आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपाययोजना करणे. | अतिसंवेदनशील मतदान केंद्र आणि अतिसंवेदनशील समुदाय ओळखणे . | प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता - विशेष मोहीम | प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता - विशेष मोहीम |
| आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी करणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान रोखणे. | नामनिर्देशन प्रक्रिया दरम्यानची शिस्त | सांप्रदायिक सलोखा | मतदानाच्या दिवसाची व मतमोजणीच्या दिवसाची कर्तव्ये |
| केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाशी समन्वय साधणे आणि दल तैनात करणे. | मतदानाची प्रक्रिया | संबंधित कायदेशीर तरतुदी | इतर मुद्दे |

प्रशिक्षण देताना वरील विषयांच्या पुढील बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे :–

( क ) कॉल सेंटर, सी- व्हिजिल, एनजीआरएस, नियंत्रण कक्ष इत्यादींसह राज्याच्या / जिल्ह्याच्या तक्रार व्यवस्थापन प्रणालीचे प्रशिक्षण.

( ख ) प्रसारमाध्यमांच्या संनियंत्रणावरील आणि पैसे किंवा मोबदला देऊन प्रक्षेपितलेल्या बातम्या ( पेड न्यूज ) उल्लंघनाच्या बाबींचे प्रशिक्षण.

( शा.म.मु. ) वाय २६९७–८ ( ५४०–३–२०२४ )

(ग) सार्वजनिक व खाजगी मालमत्तांच्या विद्रूपीकरणांशी संबंधित मुद्यांसह आदर्श आचार संहितेच्या मूलभूत बाबींवरील प्रशिक्षण.

(घ) संवेदनशील क्षेत्र रेखांकन, संवेदनशील भागांची ओळख, संवेदनशील समुदाय आणि अशा असुरक्षित समुदायांच्या बाबतीतील संभाव्य धोके याबद्दल प्रशिक्षण. अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची ओळख आणि कायदा व सुव्यवस्थेचे विश्लेषण.

(ङ) निवडणूक आणि मतदारांशी संबंधित गुन्ह्यांच्या पूर्वेतिहासाविषयीच्या माहितीचे प्रशिक्षण देणे आणि यापूर्वी अशा प्रकारच्या हिंसाचाराचे सूत्रधार ओळखणे.

(च) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून वेळापत्रकानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करताना, नामनिर्देशन मागे घेणे, छाननीच्या वेळी शिस्तविषयक बाबींचे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याशी संबंधित बाबींचे प्रशिक्षण देणे.

(छ) निवडणूक खर्च व्यवस्थापनाच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण देणे ज्यामध्ये उमेदवाराने नोंदवहीची देखभाल ठेवणे. पथकांची स्थापना करणे ( भरारी पथक, स्थैतिक संनिरीक्षण पथक, चित्रीकरण अवलोकन पथक, चित्रीकरण संनिरीक्षण पथक, लेखांकन पथक, इत्यादी) यांचा समावेश असावा आणि उमेदवाराच्या खर्चाचा योग्य हिशेब ठेवण्यासाठी छाया निरीक्षण नोंदवही, पुराव्यांचे पत्रक, इत्यादी ठेवणे.

(ज) मतदानाच्या दिवसाच्या प्रक्रियेचे व मतमोजणीच्या दिवशीच्या प्रक्रियेचे प्रशिक्षण.

(झ) छायाचित्रीकरणाच्या (व्हिडिओग्राफी) आणि वेबकास्टिंगच्या विविध बाबींचे प्रशिक्षण.

(ञ) मतदानाच्या दिवशी संदेश व्यवस्थापनाचे प्रशिक्षण.

(ट) मतदारांना प्रलोभन देण्यासाठी वापरली जाणारी रोकड, दारू व इतर वस्तू जप्त करण्यासंदर्भातील प्रमाण कार्यान्वयन प्रक्रियेचे प्रशिक्षण.

(ठ) प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे, आंतरजाल प्रणाली (इंटरनेट चॅनेल) आणि पैसे किंवा मोबदला देऊन प्रक्षेपित केलेल्या बातम्यांच्या (पेड न्यूजच्या) विविध बाबींद्वारे होणारे उल्लंघन हाताळण्यासाठी प्रमाण कार्यान्वयन प्रक्रियेचे प्रशिक्षण.

(ड) केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि इतर कायदा अंमलबजावणी / सुरक्षा अभिकरणांशी (एजन्सींशी ) समन्वय साधण्याचे प्रशिक्षण.

(ढ) विशेषतः मतदानाच्या दिवशी मतदारांची ओळख, तोतयेगिरी, मतांसाठी आवाहन, राजकीय यंत्रणांची (पदाधिकाऱ्यांची) हालचाल, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे खराब होणे, प्रक्रियेचे उल्लंघन, मतदान केंद्र ताब्यात घेणे सारख्या अपवादात्मक परिस्थितीला सामोरे जाणे, इत्यादी बाबींचे प्रशिक्षण.

(ण) जावक आणि आवक केंद्राशी संबंधित बाबींचे प्रशिक्षण.

## प्रकरण आठ

### राज्य पोलीस मनुष्यबळाचे आदानप्रदान करण्यासाठी त्यांचा आंतरराज्यीय समूह करणे.

केंद्रीय दलांची उपलब्धता ही निवडणुकांचे वेळापत्रक ठरवण्याच्या महत्त्वाच्या घटकांपैकी एक असल्याने, राज्य पोलीस दलांचा जास्तीत जास्त वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे. नक्षल प्रभावित क्षेत्रातील (एल. डब्ल्यू. ई.) बाधित नसलेल्या भागात, राज्य पोलिसांची संसाधने आणि मनुष्यबळ यांचे पूर्वनिर्धारित पद्धतीने आदान प्रदान करण्यासाठी किंवा एकत्रित करण्यासाठी राज्यांचे क्षेत्रनिहाय समूह तयार केले पाहिजेत. जर असे आदान प्रदान केले गेले तर अशा राज्यांमध्ये केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अनुपस्थितीत पूर्णपणे निवडणुका घेणे अखेरीस शक्य होऊ शकते.

सुरक्षा दलांच्या उपलब्धतेसाठी आणि आवश्यक मूल्यमापनासाठी आंतरराज्यीय सल्लामसलतीच्या आधारे, निवडणूक घेणारे राज्य आपल्या तैनाती योजनेची रचना करू शकते. अपवाद वगळता अशा सर्व प्रकरणांमध्ये अभिक्रमासाठी (इंडक्शन) आणि डी. इंडक्शनसाठी प्रमाण कार्यान्वयन प्रक्रियेचे पालन केले जाईल. अशा दलांचे प्रबोधन (संवेदीकरण) प्रशिक्षण हा या व्यवस्थेचा एक भाग असेल.

ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, मुख्य निवडणूक अधिकारी / अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, राज्य पोलीस नोडल अधिकारी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल नोडल अधिकारी, सीमा सुरक्षा दल, एसएसबी, इंडो तिबेटियन सीमा पोलीस (आयटीबीपी), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) आणि इतर सर्व राज्य पोलीस दलांचे राज्य समन्वयक यांचा समावेश असलेली संयुक्त समन्वय समिती समन्वय, दळणवळण आणि आदेश या उद्देशाने स्थापन केली जाऊ शकते.

### ८.१ अतिरिक्त दलाची मागणी करण्याची प्रक्रिया

शेजारच्या राज्याकडून अतिरिक्त बळाची मागणी करण्यासाठी पुढील प्रक्रिया राबविली जाते :–

(१) दलाची कमतरता असणाऱ्या राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी शेजारच्या राज्याकडून त्यांना असलेल्या कमतरते नुसार सैन्याच्या अतिरिक्त गरजेसाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे औपचारिक विनंती पाठवण्यात येते.

(२) भारतीय निवडणूक आयोग दोन्ही मुख्य सचिवांना आवश्यक अतिरिक्त दल तैनात करण्याच्या सूचना देतो.

(३) शिल्लक असलेल्या दलाच्या राज्याचे मुख्य सचिव भारतीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार त्यांना संबंधित राज्यात पाठवून आवश्यक दलाची पूर्तता करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| भारतीय निवडणूक आयोगाकडे मागणी केली जाते. | भारतीय निवडणूक आयोग, राज्य सशस्त्र दलांच्या समावेशासाठी इतर राज्यांना सूचना देतो. | भारतीय निवडणूक आयोगाच्या अनुदेशाची अंमलबजावणी केली जाते. |

**राज्य सशस्त्र दलांचा समावेश**

### ८.२ भारतीय निवडणूक आयोग आणि राज्ये यांमध्ये समन्वय

भारतीय निवडणूक आयोग, दलाची कमतरता असणारे राज्य आणि शिल्लक असलेले दल असणारे राज्य यांच्यातील सुरळीत समन्वय ही या सुविधेच्या यशाची गुरुकिल्ली आहे. हा समन्वय सुनिश्चित करण्यासाठी, दलाची कमतरता असणारे राज्य, भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहिताना शिल्लक असलेल्या दलाच्या राज्यांना देखील मागणी पत्राची प्रत पृष्ठांकित करू शकते.

## ८. ३ शेजारच्या राज्य पोलिसांच्या वापराची पद्धत

शेजारच्या राज्याच्या पोलीस दलासाठी विनंती करता येईल आणि त्याचा वापर पुढील प्रयोजनांसाठी करता येईल :–

(क) प्रतिबंधात्मक कारवाई करणे.

(ख) राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि निवडणुकीच्या तोंडावर उद्‌भवू शकणाऱ्या कोणत्याही घटना घडल्यास, त्यांचा सामना करणे.

(ग) निवडणूक होत असलेल्या राज्यातील सर्व सीमावर्ती राज्ये / संघशासित प्रदेशांमध्ये आंतर राज्यीय नाका बंदी करणे.

(घ) बोगस मतदान रोखण्यासाठी प्रवेशद्वार आणि पूर्ण आंतरराज्य सीमा बंद करणे.

(ङ) सीमेवरून येणारी अवैध दारू, रोख रक्कम, मोफत वस्तू आणि प्रलोभने यांना आळा घालणे.

(च) शेजारच्या राज्यांच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये ड्राय डे घोषित करणे.

(छ) समन्वयासाठी शेजारील राज्ये / संघशासित प्रदेशांच्या पोलीस महासंचालनालय कार्यालयात नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

# प्रकरण नऊ

## तैनात केलेल्या मनष्यबळास (पोलीस दलासह) प्रेरणा देणे व त्यांचे कल्याण

दलांची जमवाजमव करणे आणि निवडणूक पार पाडणे हे पोलीस आणि जिल्हा प्रशासनासाठी एक कठीण काम आणि मोठे आव्हान आहे. सुरक्षा दलांचे मनोबल उंचावण्यासाठी जिल्हा पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वयंप्रेरित मध्यस्थी केल्यास सुरक्षा दलांवरील ताण कमी होण्यास मदत होऊ शकते.

### ९.१ प्रेरणा देण्यासाठीच्या उपाययोजना

#### ९.१.१. लेखापरीक्षण आणि नियोजन

(क) सुरक्षा लेखापरीक्षण केले जाऊ शकते ज्यामुळे निवडणुकीसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणात दलाची मागणी करण्यास मदत होऊ शकते.

(ख) सैनिकी जाळ्यासंदर्भासह मतदान केंद्रांचे ठिकाण व समाजविघातक कारवायांची तीव्रता विचारात घेऊन मार्गाचे नकाशे आगाऊ तयार करून सर्व कार्यान्वित पथकांना उपलब्ध करून द्यावेत.

(ग) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी निवडणूकपूर्व / मतदानादरम्यान / मतदानानंतरच्या दैनंदिन हालचालींच्या आराखड्याची कार्यान्वयन योजना अगोदरच तयार केली जाईल आणि प्रत्येक जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकाद्वारे तिचे वैयक्तिकरित्या पर्यवेक्षण केले जाईल.

(घ) मतदानानंतर आपापल्या संबंधित मूळ छावणीमध्ये सुरक्षित आणि सुरळीतपणे सैन्य भरती करणे आणि त्याची कार्यवाही सुनिश्चित करणे.

#### ९.१.२. प्रेरण आणि प्रशिक्षण

(ङ) सुरक्षा दलांनी आपले काम कोणतीही कसूर न करता पार पाडावे याची सुनिश्चिती करण्यासाठी सुयोग्य पूर्व-प्रेरण प्रशिक्षण दिले पाहिजे; आणि तसेच त्यांना तेथील भूभाग, संस्कृती व चालीरीती त्याचबरोबर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली व्यक्ती (हिस्ट्री शीटर), उपद्रवी, स्थानिक गुन्हेगार आणि त्यांची विचारधारा व डावपेच यांची ओळख करून देणे.

(च) खबरदारीच्या उपाययोजनांबाबत सर्व दलांना अगोदरच माहिती देण्यात यावी व संवेदनशील करावे व संवेदनशील करावे आणि त्याचे पालन करण्याच्या लेखी सूचना देण्यात याव्यात व त्यांना कार्यप्रवृत्त करावे.

(छ) जिल्हा निवडणूक अधिकारी-नि-जिल्हा दंडाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधीक्षक/ पोलीस अधीक्षक यांनी मतदान केंद्राच्या परिघात गस्त घालण्यासारख्या मार्गाविषयी आणि इतर बाबींबद्दल अनिवार्य आणि वैयक्तिक माहिती देणे. मतदार व मतदान अधिकाऱ्यांना सुरक्षा पुरविणे आणि निवडणुकीनंतर त्यांना सुखरूपणे योग्य ठिकाणी पोचविणे.

(ज) प्रकरण अभ्यास (केस स्टडी) पद्धत वापरता येते, छायाचित्रे, चलचित्र आणि चित्रपट प्रदर्शित केले जाऊ शकतात आणि निरीक्षण केले जाऊ शकते.

#### ९.१.३. राज्यांतर्गत समन्वय

(क) राज्य / जिल्हा स्तरावर सहभागी निर्णय प्रक्रिया-समन्वय बैठका.

(ख) प्रत्येक केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या पथकाला स्थानिक पोलिसांचा एक प्रतिनिधी देण्यात यावा जेणेकरून ते त्याच्या भूप्रदेश आणि स्थानिक भाषेच्या ज्ञानाच्या मदतीने आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडू शकतील.

(ग) दलाची काळजी घेण्यासाठी रेल्वे आणि आयआरसीटीसीची प्रभावी भूमिका प्रेरणादायी आहे.

(घ) दुर्गम भागात असलेल्या मतदान केंद्रांवर सुरक्षा कर्मचारी आणि मतदान अधिकाऱ्यांना सोडण्यासाठी हेलिकॉप्टर सेवेचा वापर केला जाऊ शकतो.

(ङ) राज्य शासनाचे जिल्हा स्तरावरील सर्व विभाग निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी त्यांच्या बाजूने दलांना सुविधा देण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

### ९.१.४. असाधारण परिस्थिती

(क) चकमक झाल्यास,जखमींना बाहेर काढणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे नष्ट झाल्यास, ती बदलणे आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत सैन्याचे बळकटीकरण करणे यासारख्या आपत्कालीन योजना अगोदरच तयार करण्यात याव्यात आणि सर्व संसाधने त्याठिकाणी तयार ठेवण्यात यावीत यासगळ्याची माहिती सैन्यदलांना देण्यात यावी.

### ९.१.५. २४×७ (चोवीस तास) तांत्रिक सहाय्य प्रणाली

(क) मतदानाच्या दिवशी सर्व घडामोडींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी जिल्हा मुख्यालय अतिउच्च वारंवारिता, मोबाइल फोन आणि दूरध्वनी सुविधांसह नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा. निवडणूकपूर्व प्रक्रियेपासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नियंत्रण कक्ष २४x७ (२४ तास) कार्यरत ठेवावा लागणार आहे. महत्वाचे संपर्क तपशील दिले जातील.

## ९.२ कल्याण कार्यासाठी आणि प्रोत्साहनासाठी टप्पे

### ९.२.१. नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक

(क) प्रत्येक राज्यातील राज्य शासनामधील पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची निवास, सेनास्थापन तंत्र (लॉजिस्टिक), कल्याणकारी उपाययोजना. नुकसानभरपाई / विमा, हवा बंद जेवण किंवा अल्पोपहारासाठी (रिफ्रेशमेंट चार्जेस) रक्कम प्रदान करणे, इत्यादींसारख्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या सुविधांच्या बाबतीत लक्ष ठेवण्यासाठी राज्य पोलीस नोडल अधिकारी म्हणून तात्काळ नियुक्त केले जावे. अशी आयोगाची इच्छा आहे.

(ख) प्रत्येक जिल्ह्याने कल्याण कार्यासाठी पोलीस उपाधीक्षक पदाच्या दर्जापेक्षा कमी नसेल असा जिल्हास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करावा; आणि त्याचा संपर्क तपशील निवडणुकीसाठी तैनात असलेल्या राज्य आणि केंद्रीय पोलीस दलाच्या सर्व सदस्यांना प्रसारित करणे आवश्यक आहे.

### ९. ३.१ कल्याणकारी उपाययोजना ( वैद्यकीय उपचार आणि सानुग्रह अनुदान भरपाई)

९.३.१.१ निवडणुकीच्या कर्तव्यावर असलेल्या सर्व पोलिसांसाठी विशेषोपचार रुग्णालये, रोकड विरहित (कॅशलेस) वैद्यकीय उपचार, हवाई रुग्णवाहिका (एअर ॲम्ब्युलन्स), हेलिकॉप्टर सुविधा, इत्यादींची योग्य वैद्यकीय सुविधांची तरतूद केली आहे, याची सुनिश्चिती करावी.

९.३.१.२ निवडणुकीच्या कामासाठी तैनात असताना हिंसक हल्ल्यात जखमी झालेल्या किंवा आजारी पडलेल्या अशा सर्व सुरक्षा आणि मतदान कर्मचाऱ्यांच्या रोकड विरहित (कॅशलेस) उपचाराची व्यवस्था सर्वोत्कृष्ट रुग्णालयांमध्ये करण्याची तरतूद करण्यात यावी, व्यवस्था/ करार / रोकड विहित (कॅशलेस) सुविधा या प्रयोजनासाठी, शेवटच्या क्षणी होणारा विलंब टाळता यावा यासाठी अगोदरच सुविधा ठेवावी.

९.३.१.३ राज्याच्या इतर भागातून अधिकाधिक वैद्यकीय अधिकाऱ्यांची (डॉक्टरांची) नेमणूक असलेल्या भागात वैद्यकीय सुविधा वाढविल्याची सुनिश्चिती करावी.

९.३.१.४ अत्यावश्यक औषधी, केंद्रीकृत धारण क्षेत्रात पुरेशा प्रमाणात ठेवावीत जेणेकरून स्थानिक युनिटच्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या निरीक्षणाखाली प्रत्येक व्यक्तीला आवश्यक मात्रा (डोस) देता येईल.

९.३.१.५ रोकड विरहित (कॅशलेस) उपचारांसाठी विशेषतः विशेषोपचरांसाठी रुग्णालयांची आधीच व्यवस्था करावी. जेणेकरून रुग्णाला वैद्यकीय उपचारानंतर कोठे न्यावे लागेल याबाबत संभ्रम निर्माण होणार नाही.

९.३.१.६ सानुग्रह अनुदानाच्या प्रत्येक प्रकरणात, मग ते मृत असो, जखमी / अपंग असो, इजा किंवा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर १० दिवसांच्या आत उपचार प्रक्रिया सुरू करावी आणि कोणत्याही परिस्थितीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १० दिवसांपेक्षा जास्त उशीर करू नये. सानुग्रह अनुदान भरपाईचा निपटारा करण्यासाठी प्रकरण प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी प्रकरणावर प्राधान्याने निर्णय घेतील.

### ९.४.१ मूलभूत सुविधांची हमी

९.४.१.१ अन्नपाकिटांच्या वितरणाचे आधीच नियोजन करावे.

९.४.१.२ योग्य निवास आणि मालवाहतुकीस सहाय्य करावे.

९.४.१.३ जिल्ह्यातील निवासस्थानांच्या ठिकाणी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाला पुरविण्यात आलेल्या सुविधांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी भेट द्यावी.

९. ४.१.४ आयोगाच्या अनुदेशांनुसार तैनात दलांच्या जवानांना मानधन दिले जात नसल्याचे अनेकदा निदर्शनास आणून देण्यात आले आहे. मतदान पथके रवाना करण्यापूर्वी सर्व दलांच्या नाममात्र याद्या व्याव्यात. जेणेकरून नेमकी रक्कम वेळेत वितरित होईल.

### ९.४.२ पुरस्कार व सत्कार

९.४.२.१ चांगल्या कामासाठी आणि चांगल्या पुनर्प्राप्तीसाठी भारताच्या निवडणूक आयेगाकडून मान्यता.

| **निवडणूक कर्तव्यावर तैनात केंद्रीय सशस्त्र पोलीस दल / राज्य सशस्त्र पोलीस / मतदान कर्मचाऱ्यांना विनारोकड (कॅशलेस) उपचार** |
|---|
| • विनारोकड (कॅशलेस) उपचार सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक व्यवस्था/ करार (रुग्णालयांशी/ वैद्यकीय सेवांशी) अगोदरच करणे आवश्यक आहे.<br>• इजा. आजारपण (कोविड- १९ सह), आपत्कालीन परिस्थिती आणि जीवितहानी यांसारख्या दुर्घटनांना उपरोक्त व्यवस्थेअंतर्गत समाविष्ट केले आहेत.<br>• निवडणुकीच्या कालावधीसाठी (अधिसूचनेच्या दिनांकापासून निकाल घोषित होईपर्यंत) वर नमूद केलेल्या सुविधा द्यायच्या आहेत. |
| आणीबाणी / जीवितहानी (उदा.. नक्षल प्रभावित क्षेत्रात) |
| राज्य सशस्त्र पोलीस / केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि इतर दल, नक्षलग्रस्त भागासारख्या जोखमीच्या ठिकाणी निवडणूक कर्तव्यावर तैनात आहेत, जेथे त्यांचा जीव सतत धोक्यात असतो.<br>पुढील नियमांची अंमलबजावणी करायची आहे :–<br>(१) मुख्य निवडणूक अधिकारी आणि पोलीस अधीक्षक, हिंसक हल्ल्यात मार लागलेल्या किंवा इजा झालेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यावर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्वरित उपचार करण्यासाठी सर्व उपाययोजना करतील.<br>(२) वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपरोक्त उपचारांवर देखरेख ठेवावी.<br>(३) संबंधित कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला तात्काळ कळवावे व रुग्णाला भेटण्याची सोय करावी (मुख्य निवडणूक अधिकारी/ पोलीस अधीक्षक यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू ठेवावेत).<br>(४) निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्याचा (नागरी/ नागरीतर) मृत्यू झाल्यास, श्वविच्छेदन व परिवहन/वाहतूक/ मृतदेह सुपूर्द करणे ही कामे विनाविलंब करावीत. मृत कर्मचारी स्थानिक रहिवासी (त्याच जिल्ह्यातील) असल्यास. जिल्हा निवडणूक अधिकारी स्वतः किंवा त्याचा प्रतिनिधी शोकाकुल कुटुंबियांची भेट घेऊन अधिकृत सांत्वन करतील.<br>(५) उपरोक्त शिष्टाचार भेटीतच सानुग्रह अनुदानाची नुकसानभरपाईची रक्कम प्रदान करण्याची सुनिश्चिती करावी. |

| इतर जिल्ह्यातील मृत कर्मचाऱ्यांचे प्रकरण |
| --- |
| (१) शोकाकुल कुटुंबियांना तात्काळ माहिती कळविणे.<br>(२) वरिष्ठ अधिकारी/ समादेशक (कमांडंट) एकाच वेळी मृत कुटुंबापर्यंत पोहोचतील आणि त्यांचे सांत्वन करतील याची खात्री करून मृतदेहाची वाहतूक / स्थलांतर योग्य प्रकारे समन्वयित करणे.<br>(३) मुख्य निवडणूक अधिकारी हे वरिष्ठ अधिकाऱ्याची / समादेशकाची (कमांडंटची) उपरोक्त टप्प्याची अंतिम सुसंगती घडवून आणण्याची सुनिश्चिती करतील; त्याशिवाय भारतीय निवडणूक आयोगाच्या सांत्वनात्मक संदेशाचे वाचन करतील.<br>(४) सानुग्रह अनुदानाच्या नुकसानभरपाईची रक्कम उपरोक्त शिष्टाचारामध्ये योग्यरीत्या अंतर्भूत केली जावी. |

भारत निवडणूक आयोग

Election Commission of India

निर्वाचन सदन. अशोका मार्ग, नवी दिल्ली- ११०००१

संकेतस्थळः *www.eci.nic.in*, दूरध्वनी क्रमांकः ०११-२३०५२०५. फॅक्स : ०११-२३०५२२१०

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई